मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र
(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत)

युगवाणी



कवि 'BEE'

वर्ष २४ अंक ५

सप्टेंबर १९६९

अनुक्रमणिका

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

वर्ष २४] सप्टेंबर १९६९ [अंक ५

संपादक
शं. बा. शास्त्री

मुद्रक व प्रकाशक
मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ

मुद्रणस्थळ
नारायण मुद्रणालय
धनतोली, नागपूर–१

वार्षिक वर्गणी : पांच रुपये

अंतरंग

कोल्हटकरांच्या काही किरकोळ आठवणी

—ग. त्र्यं. माडखोलकर

['कोल्हटकर : व्यक्तिदर्शन' या श्री. माडखोलकर यांच्या आगामी प्रबंधातील हा थोडासा भाग आहे. हे पुस्तक ऑक्टोबरमध्ये प्रसिद्ध होईल.]

गुरुवर्य श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या सहवासात १९२० च्या मेपासून १९३४ च्या एप्रिलपर्यंत एकंदर चौदा वर्षे राहाण्याचे भाग्य मला लाभले. १९२० च्या मे महिन्यात मुंबई येथे, त्यांचे स्नेही 'विविधज्ञानविस्तार' या मासिकाचे संपादक रावसाहेब रामकृष्ण रघुनाथ मोरमकर यांच्या फणसवाडीतील घरी, त्यांच्याशी माझा परिचय झाला. त्या वेळी त्यांचे वय एकुणपन्नास वर्षांचे आणि माझे वीस वर्षांचे होते. म्हणजे त्यांच्या आयुष्याचा अखेरचा टप्पा सुरू झाल्यावर मी त्यांच्याजवळ आलेलो होतो. त्यांच्या पहिल्या शिष्या श्री. हिराबाई पेडणेकर यांच्याशी त्यांची 'जन्माची ताटातूट' १९१७ च्या जूनमध्ये झाली; त्यांचे दुसरे शिष्य श्री. विठ्ठल सीताराम गुर्जर यांच्याशी त्यांचे संबंध १९१८ च्या जूनमध्ये तुटले; व १९१९ च्या जानेवारीत त्यांचे पट्टशिष्य श्री. राम गणेश गडकरी यांचा अंत झाला. १९०१–०२ च्या सुमारास, कोल्हटकर ऐन तारुण्यात असताना, या तीन व्यक्तींशी त्यांचा घनिष्ठ संबंध आलेला होता; व आपल्या 'आत्मवृत्ता'तही या तिघांचाच उल्लेख त्यांनी त्यातल्या त्यात जिव्हाळ्याने आणि विस्ताराने केलेला आढळतो. पण, त्यांचे हे तीनही शिष्य, मी त्यांच्या सान्निध्यात आलो त्या वेळी, त्यांना अशा रीतीने दुरावलेले होते. त्याचप्रमाणे, साहित्यक्षेत्रातील म्हणा किंवा नाट्यक्षेत्रातील म्हणा, बहुतेक जुन्या मित्रांशीही, काही ना काही कारणामुळे, त्यांचे फारसे सख्य उरलेले नव्हते. मोरमकर आणि केळकर या दोन समकालीन मित्रांचाच काय तो अपवाद! म्हणून, १९१८ च्या सप्टेंबरमध्ये, वकिलीच्या धंद्याच्या दृष्टीने, खामगावहून जळगाव-जामोदसारख्या रेल्वेपासून दूर असलेल्या तालुक्याच्या जुनाट आडगावी जाण्याचा जो निर्णय त्यांनी घेतलेला होता, त्यासंबंधी 'आत्मवृत्ता'त असे उद्गार काढले आहेत की, "येथे अनेक गैरसोयी आहेत. . . .पण अलिकडे माझे अनेक स्नेही मृत्यूने किंवा गैरसमजुतीमुळे दुरावले असून, माझ्या हल्लीच्या मन:स्थितीत मला रहावयास जसे ठिकाण पाहिजे होते, तसेच हे मिळाले आहे."

अशा एका परीने उद्विग्न, एकाकी मन:स्थितीत कोल्हटकर असताना मी त्यांच्याजवळ आलो. मुंबईहून जळगावला परत गेल्यानंतर, ता. २० जून १९२० रोजी, त्यांनी माझ्या आभारप्रदर्शक पत्राला उत्तर म्हणून, जे पहिले पत्र मला पाठविले, त्यात असे म्हटले होते की, "मला असामान्य बुद्धीबद्दल पूर्वीपासूनच आदर वाटत आला आहे. आपली बुद्धिमत्ता विशेष असल्याबद्दल आपल्या एक दोन लेखांवरून माझा ग्रह झाला होता; व त्यामुळे आपणांस भेटण्याची उत्कंठाही मला साहजिकच वाटत होती. मी या खेपेस मुंबईस येण्यास निघालो, तेव्हा आपणास भेटण्याचा संकल्प केला होता. तो संकल्प तडीस गेला, याबद्दल मला अत्यंत समाधान वाटले. मला बुद्धिमत्तेबद्दल जितका आदर वाटतो, तितकेच प्रेमळ स्वभावाबद्दल प्रेम वाटते. आपला व माझा जो प्रत्यक्ष परिचय झाला, त्यात आपले हृदय प्रेमळ असल्याबद्दल माझी खात्री

झाली. याप्रमाणे, आपणाबद्दल मला वाटत असलेल्या भावात आदर व स्नेह यांचे मिश्रण झालेले असल्यामुळे, त्याच्या चिरस्थायित्वाबद्दल मला शंका वाटत नाही. मी प्रेमाचा पूर्वीपासूनच भुकेला आहे. गेल्या दोन वर्षांत माझे काही स्नेही विनाकारण गैरसमज उत्पन्न झाल्यामुळे मला अंतरले. तेव्हापासून नवीन स्नेही जोडण्याची मला तळमळच लागून राहिलेली होती, असे म्हणण्यास हरकत नाही. माझ्या वयाच्या मनुष्याचे अनेक स्नेही मृत्युमुखी पडत असल्यामुळे, हृदयात ज्या खिंडी पडतात, त्या तरुण स्नेह्यांची जोड करून घेऊन बुजविणे हेही आवश्यक असते. अलिकडे अनेक स्नेह्यांस अंतरल्यामुळे माझी जी हानी झाली होती, तिची अंदाजापलिकडे भरपाई झाली आहे, हे पाहून अत्यंत समाधान वाटते."

त्या दिवशी मोरमकरांकडील बैठकीतून उठावयाला आम्हाला संध्याकाळचे सात वाजले. तेथून निघताना कोल्हटकर मला म्हणाले, "आपल्याला घरी जाण्याची घाई नाही ना ? मग आपण माझ्याबरोबर माझ्या बंधूंच्या बिऱ्हाडी चला थोडा वेळ." कोल्हटकर त्या काळात, आपले चुलत बंधु श्री. हरि गणेश कोल्हटकर यांच्या गिरगावातील सोमण बिल्डिंगमधील बिऱ्हाडी उतरत असत. त्यांच्याबरोबर जो मी तेथे गेलो, तो रात्री दहा वाजेपर्यंत त्यांच्या सहवासात होतो. त्यानंतर त्यांचा मुक्काम मुंबईत असेपर्यंत दररोज सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ३ ते १० असा सतत मी त्यांच्याजवळ असे. ते कुठेही बाहेर जावयाला निघाले, तरी आपल्याबरोबर मला घेऊन जात असत. त्यामुळे, आमच्या ओळखीच्या या पहिल्याच पंधरवड्यात, श्री. मालतीबाई पटवर्धन, श्री. नाथमाधव, सौ. यशोदाबाई भट, सौ. अवंतिकाबाई गोखले, श्री. गोपाळराव दळवी, डॉ. भालेराव प्रभृति मंडळीकडे जाण्याचा योग आला. हा क्रम १९३१ च्या जानेवारीत ते पक्षघाताने पंगु होईपर्यंत चालू राहिला. पण त्यांच्या खामगाव किंवा जळगाव येथील घरी जाण्याचा योग मात्र कधीच आला नाही. त्यांनी किती तरी वेळा मला या दोन्ही ठिकाणी येऊन दहा पंधरा दिवस रहाण्याचा आग्रह केलेला होता. पण मला काही ते जमले नाही त्यामुळे, त्यांच्या कौटुंबिक आणि व्यावसायिक जीवनाशी माझा संबंध अजिबात आला नाही; व त्याबद्दल मीही कधी त्यांच्याजवळ चौकशी केली नाही. मला जे काय ते माहित आहेत, ते केवळ माझे साहित्यक्षेत्रातील गुरु म्हणून, केवळ साहित्याचार्य म्हणून ! तथापी, मनाच्या एका विशिष्ट विपण्ण अवस्थेत, आयुष्याच्या अस्तमानातील सावल्या त्यांच्याभोवती झपाट्याने पसरत असता, मी त्यांच्याजवळ आल्यामुळेच बहुधा, अगदी सुरवातीपासूनच मुळी माझ्यावर त्यांचा लोभ जडला; व मीही त्यांची शागिर्दी निष्ठेने केल्यामुळे तो शेवटपर्यंत वाढत गेला.

* *

कोल्हटकरांच्या मजवरील या लोभाचा एक परिणाम असा झाला की, आपल्या साहित्यजीवनातील ज्या अनेक घटना त्यांनी कधी कोणाला सांगितल्या नाहीत आणि 'आत्मवृत्ता'तही अजिबात उल्लेखिल्या नाहीत, त्या मला प्रसंगाप्रसंगाने अगदी मोकळेपणाने सांगितल्या. विशेषत:, १९३१ च्या जानेवारीत आजारी पडल्यावर ते नागपुरास आपले धाकटे बंधु श्री. दिगंबर कृष्ण उर्फ अण्णासाहेब कोल्हटकर यांच्याकडे रहावयाला आल्यापासून १९३४ च्या एप्रिलमध्ये त्यांच्याबरोबर पुण्यास रहावयाला जाईपर्यंत, त्या तीन वर्षांच्या काळात त्यांनी आपल्या गत जीवनाचा ग्रंथ जणू माझ्यापुढे उघडून ठेवलेला होता. अर्थातच या विश्वासाने की, त्यासंबंधी कोणत्याही प्रकारची वाच्यता मी, त्यांच्या अनुमतीविना, कधीही करणार नाही. त्यामुळेच, १९३४ सालच्या जूनमध्ये पुणे येथे त्यांचे देहावसान झाल्यावर, सर्वच मराठी नियतकालिकांनी जरी त्यांच्यावर स्मृतिपर लेख लिहिण्याचा आग्रह मला केला, तरी मी त्यांच्या खाजगी जीवनासंबंधी माहिती देणारे एक अक्षरही लिहिले नाही. सुदैवाने, त्यांचा आणि माझा १९२० जूनपासून तो १९३४ मे अखेरपर्यंतचा संपूर्ण पत्रव्यवहार, १९४८ च्या फेब्रुवारीत, गांधीवधानंतर झालेल्या दंगलीतील आमच्या 'शांतानिवासा'च्या विध्वंसात, नष्ट होऊन गेला; व त्यांच्या नाटकांविषयी माझे तत्कालीन विद्यार्थि सहाय्यक श्री. विनायक अंबादास गिजरे

यांच्या सहकारितेने १९३१–३४ साली जी टिपणे मी करून घेतलेली होती, तीही सर्व या उत्पातात नाहीशी होऊन गेली. अशा रीतीने त्यांच्या साहित्यजीवनातील किती तरी हृद्य घटनांवर मनोज्ञ प्रकाश पाडणारा सगळा अस्सल पुरावा आपोआपच निःशेष होऊन गेला. आता ज्या काय शिल्लक उरलेल्या आहेत, त्या फक्त मला त्यांनी आमच्या चौदा वर्षांच्या सान्निध्यात वेळोवेळी इतक्या प्रेमाने आणि विश्वासाने सांगितलेल्या आपल्या आठवणी ! त्याही माझ्या शरीराबरोबरच भस्म होऊन जातील. त्यांपैकी त्यांच्या वैचित्र्यपूर्ण जीवनाची ओझरती कल्पना देणाऱ्या काही किरकोळ आठवणी मी या लेखात सांगणार आहे.

या आठवणी सांगण्यापूर्वी थोडा खुलासा करणे मला अवश्य वाटते. कोल्हटकरांचे सर्व आयुष्य जरी साहित्यनिर्मितीत गेले, तरी त्यांचे जीवन सर्वसामान्य साहित्यिकांहून अगदी भिन्न होते. ते जीवन जरी बैठे असले, तरी विलक्षण व्यग्र आणि व्यामिश्र होते. कारण कोल्हटकर अंतर्मुख आणि आत्मक्रीड होते. केव्हा केव्हा ते सपाटून गप्पा मारीत, तर केव्हा केव्हा अजिबात बोलत नसत. अशा वेळी स्वतःशीच गुणगुणताना किंवा हसताना त्यांना पाहिले,––त्यांचे ते लखलखणारे आत्मलीन डोळे आणि चिंतनशील प्रमाथी मन कोणत्या तरी अज्ञात आलोकांच्या अवलोकनात गुंग झालेले दिसले,––म्हणजे मी गोंधळून जात असे. साहित्ययोग किंवा साहित्यसमाधी म्हणून जर काही असेल, तर ती त्यांच्या रूपाने मी मूर्तिमंत पाहिली. स्वभाव, अभिरुची आणि व्यासंग यांच्या वैचित्र्यामुळे त्यांच्या जीवनातही वैचित्र्य उत्पन्न झालेले होते. म्हणूनच, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्यापासून तो श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांच्यापर्यंत सगळ्या आप्तमित्रांनी त्यांचे वर्णन नादिष्ट आणि छांदिष्ट या विशेषणांनी केलेले आहे. 'आत्मवृत्ता'त त्यांनी असे म्हटलेले आहे की, "मला कोणत्याही गोष्टीचा ध्यास लागला की, तिच्याशिवाय दुसरे काही सुचेनासे होते. माझ्याभोवती चाललेल्या संभाषणाकडे माझे पूर्ण दुर्लक्ष असून, सारे लक्ष चित्तात घोळत असलेल्या दुसऱ्याच विषयाकडे असते. ही माझी एकाग्रता पुष्कळदा दोन दोन चार-चार महिनेही टिकते." 'भारतीय ज्योतिर्गणिता'वरील प्रबंध किंवा 'तोतयाचे बंड' आणि 'प्रेमाभास' या नाटकांची परीक्षणे लिहित असताना त्यांना जो निद्रानाशाचा विकार झाला, तो याच कारणामुळे ! डोक्यात घोळणारे सिद्धांत, प्रमेये, उपपत्ती, संविधानके किंवा चाली ही "समंधाप्रमाणे त्यांना रात्रंदिवस इतकी छळीत असत" की, महिना दोन दोन महिने जागरणे घडून त्यांची प्रकृती बिघडून जात असे.

या सगळ्या कारणांमुळे कोल्हटकरांच्या ठिकाणी जी विलक्षण अनवधानता आलेली होती, ती त्यांच्याविषयी केव्हा केव्हा गैरसमज उत्पन्न करावयाला कारण होत असे; व ते तऱ्हेवाईक, विक्षिप्त किंवहुना वेडसर असावेत, असेही उद्गार अनेकांच्या तोंडून निघालेले मी ऐकले आहेत. 'ज्ञानप्रकाशा' संपादक श्री. वा. मा. आंबेकर आणि श्री. कृ. ग. लिमये, श्री. नी. ब. भवाळकर आणि श्री. ज. कृ. उपाध्ये, श्री. अनंततनय आणि श्री. माधव यांच्यासारखी मंडळी त्यांच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे त्यांच्यावर अतिशय रुष्ट होती. त्यांची आवड–निवड इतकी तीव्र असे की, ज्या व्यक्ती कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळे प्रथमदर्शनी त्यांच्या मनात भरत असत, तेवढ्यांचीच फक्त ओळख त्यांना राहात असे. याचे एक मी पाहिलेले गमतीदार उदाहरण असे की, पुण्यातले सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी श्री. दत्तात्रेय अनंत आपटे ऊर्फ अनंततनय यांच्याशी त्यांचा परिचय श्री. न. चिं. केळकर, प्रो. श्री. नी. चाफेकर, श्री. रा. ग. गडकरी यांच्यासारख्या नामांकित गृहस्थांनी अनेक वेळा करून दिलेला असताना देखील, ते बिचाऱ्या अनंततनयांना केव्हाही ओळखू शकले नाहीत ! आवडता विषय, आवडते प्रमेय, आवडते गाणे, आवडती व्यक्ती, आवडता पदार्थ वगैरे आवडत्या गोष्टींचे मात्र त्यांना जणू वेड असे. त्यामुळे, ते इतके बुद्धिवादी आणि बुद्धिनिष्ठ असून देखील, त्यांच्या वृत्तीत आणि वर्तनात एक प्रकारचा विचित्रपणा आलेला होता. त्यांच्या नाटकातली अत्यंत बुद्धिमान् पात्रे जी पुष्कळदा आचरटासारखी वागताना दिसतात, ती केवळ त्यांच्या

निर्मात्याच्या या अलौकिक गुणावगुणांचा वारसा त्यांना लाभल्यामुळे ! कोल्हटकरांच्या व्यक्तित्वातील या वैचित्र्याच्या छटा मी आता सांगणार असलेल्या या त्रुटित आठवणीतही उमटलेल्या आढळतील.

* *

१९१७ च्या एप्रिलमध्ये, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष या नात्याने, गांधर्व महाविद्यालयाच्या दिवाणखान्यात, कोल्हटकरांचे भाषण झाले होते. त्या समारंभात मी त्यांना प्रथम पाहिले. आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत मी त्या वेळी शिकत होतो. माझे वर्गबंधु श्री. शं. ग. वैद्य आणि मी त्या समारंभाला गेलो असता, आम्हाला दुरूनच त्यांचे दर्शन घडले. मला त्यांचे व्यक्तित्व आकर्षक आणि भव्य वाटले. आपले भाषण त्यांनी वाचून दाखवले. पण त्या वाचनात नाट्य होते. त्यामुळे, ‘ मराठी वाङ्मय आणि स्वावलंबन ’ यासारखा भाषणाचा विषय गंभीर असताना देखील, त्यातील विनोदाच्या छटांमुळे आणि वाचण्याच्या ठसकेदार पद्धतीमुळे, त्यांनी अनेक वेळा टाळ्या घेतल्या. हंशाही मधून मधून होत होता. या पहिल्या दर्शनाच्या वेळी त्यांची जी छाप माझ्या मनावर पडली, ती पुढे १९२० च्या मे महिन्यात त्यांच्याशी जेव्हा माझा परिचय झाला, तेव्हा प्रत्यक्ष साहचर्याने दृढ होऊन गेली. म्हणून ‘आत्मवृत्ता’त त्यांनी केलेले स्वतःच्या विरूपतेचे उल्लेख वाचून मी बुचकळ्यात पडलो. यांना जर विरूप म्हणावयाचे असेल, तर मग सुरूप तरी कोणाला म्हणावयाचे, असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला.

त्यामुळे, १९२० च्या नाताळातील आमच्या दुसऱ्या भेटीच्या वेळी जेव्हा ‘आत्मवृत्ता’विषयी बोलणे निघाले, तेव्हा मी भीत भीतच हा प्रश्न उपस्थित केला. मी त्यांना विचारले, “आपण जर खरोखरच विरूप असता, तर हिराबाई, मालतीबाई, यशोदाबाई, ताराबाई यांच्यासारख्या बुद्धिमान्, सुविद्य, कलाकुशल स्त्रियांना आपल्याविषयी आकर्षण कसे वाटले असते ?” तेव्हा ते म्हणाले, “ते आकर्षण माझ्या गुणांविषयी आहे. स्त्रिया जशा रूपलुब्ध तशाच गुणलुब्धही असतात. डेस्डिमोना आणि ऑथेल्लो यांचे उदाहरण आपणास माहितच आहे.” — “पण गुणलुब्धतेचे पर्यवसान प्रणयात होत नाही, असे म्हणणे आहे का आपले ?” मी विचारले. त्यावरोबर त्यांनी हसून मला प्रतिप्रश्न केला, “मी कुठे असे म्हटले आहे ? मी जे उदाहरण दिले, त्यावरून हे उघड आहे की, गुणलुब्धतेमुळेही प्रेमसंबंध उत्पन्न होतात. माझीच गोष्ट पहा. जोगळेकर हयात असेपर्यंत माझा आणि हिराबाईंचा स्नेह एका मर्यादेपलिकडे गेला नाही. ते जर सुदैवाने जगले वाचले असते, तर आमचा निकट संबंध कधीच आला नसता, याबद्दल माझी खात्री आहे. सुरवातीला हिराबाईंना माझ्याविषयी नाटककार म्हणून आदर होता. पण, चाली देताना त्यांच्या हे अनुभवाला आले की, त्यांनी दिलेल्या चाली “मी काही जशाच्या तशा उपयोगात आणीत नाही; तर त्या चालींवरून माझ्या स्वतःच्या नव्या चालीही केव्हा केव्हा मी बनवतो. त्यामुळे त्यांचा माझ्याविषयीचा आदर वाढत गेला. आणि मला त्या म्हणाल्या, “मी फक्त जुन्या चाली देऊ शकते. पण आपल्या जवळ तर संगीताची सुद्धा प्रतिभा आहे. मी दिलेल्या चालींवरून आपण नव्या चाली तयार करता. ही बुद्धी काही माझ्यापाशी नाही.” त्यावर मी त्यांना म्हटले, “मी नव्या चाली तयार करीत असलो, तरी मी काही संगीतकार नाही. मी चिजांची बंदिशी केलेली नाही. कोटिवरून कोटि सुचावी, तसा प्रकार आहे मी तयार केलेल्या चालींचा. त्याला प्रतिभा लागत नाही. थोडी कल्पकता आणि स्वरांचे ज्ञान असले, म्हणजे पुरे.” पण हिराबाईंना काही माझे हे म्हणणे पटले नाही. त्या म्हणाल्या, “हे खरे नाही. मराठी रंगभूमिवर नवे संगीत फक्त आपलेच आहे. गोविंदराव टेंबे सुद्धा याबद्दल आपल्याला चाहातात.” तेव्हा मी त्यांना म्हटले, “माझ्या बुद्धीचा हा दोष किंवा गुण आहे, की मी कोणाचेच अनुकरण करू शकत नाही किंवा कोणापासून काही उसनेही घेऊ शकत नाही. दुसऱ्यापासून जर काही घेतलेच, तर त्यात स्वतःच्या कल्पनेने काही ना काही तरी भर घातल्याशिवाय आणि त्याला नवे रूप दिल्याशिवाय मला ते मुळी वापरताच येत नाही. त्यामुळे, पार्शी कंपन्यांच्या नाटकातल्या ज्या चाली मी घेतल्या किंवा आपल्यासारख्या मंडळींनी

ज्या चाली मला दिल्या, त्यांना देखील मी माझ्या पद्धतीने नवीन वळण लावले. पण ती काही स्वतंत्र बंदिशी किंवा निर्मिती म्हणता येणार नाही." नाटककार आणि संगीताचा जाणकार अशा दोन्ही नात्यांनी हिराबाईंना माझ्याविषयी आदर होता. तथापि, अशा प्रकारच्या चाहाण्याला काही रूपाचे आकर्षण किंवा प्रणयही म्हणता येणार नाही."

* *

त्यानंतर आणखी एकदा या विषयावर बोलण्याचा योग आला. १९२३ साली मी पुण्यास 'सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटी 'त राहात असता, कोल्हटकर नेहमीप्रमाणे मे महिन्यात तेथे आले. त्यांचा मुक्काम मेहुणपुऱ्यात त्यांचे भाचेजावई श्री. नानासाहेब गोंधळेकर यांच्याकडे होता. एक दिवस सायंकाळी श्री. व. भ. कर्णिक, प्रो. रा. म. मराठे आणि मी अशा आम्हा तिघांना घेऊन ते आपले परम स्नेही श्री. भाऊसाहेब जयवंत यांच्या कन्या सौ. मैना पाटणकर यांच्याकडे गेले. त्यांच्यावरूनच आपल्याला 'जन्मरहस्य' नाटकाची नायिका 'कांता' हिची कल्पना सुचली, असे ते म्हणत असत. त्यामुळे सौ. पाटणकर यांना पहाण्याची आम्हाला उत्सुकता होती. आमचे दीड दोन तास त्यांच्याकडे आनंदात गेले. तेथून परत आल्यावर, रात्री आपल्या नाटकातील कांही प्रसंगावरून बोलताना, त्यांनी मला स्वतःचा एक चमत्कारिक अनुभव सांगितला. ते म्हणाले, "मी एकदा कोर्टाच्या कामासाठी वऱ्हाडात एका गावी गेलो होतो. तेथे माझ्या वडिलांपासून घरोवा असलेले माझे एक मित्र राहात होते. त्यांना माझी नाटके फार आवडत असत. नाटकाचे कथानक आणि पदे यांच्या बाबतीत मीही केव्हा केव्हा त्यांचा सल्ला घेत असे. त्यामुळे त्यांच्या घरी मी उतरलो. त्या दिवशी काही कामानिमित्त ते मुंबईस गेलेले होते. त्यांच्या कुटुंबाने ही गोष्ट मला सांगितली, पण आग्रहपूर्वक ठेवून घेतले. रात्री भोजनोत्तर, दाव्याचे कागद वाचीत मी एकटाच माडीवर बसलेलो असता, त्या बाई अकस्मात् वर आल्या. त्यांना काही बोलावयाचे असेल, अशा समजुतीने माझ्यापुढे असलेले कागद मी बाजूला सारले आणि त्यांना खुर्चीवर बसण्याची विनंती केली. पण त्या काही नेहमीच्या मोकळेपणाने बसल्या नाहीत आणि बोलेनातही. त्यामुळे, मला अवघडल्यासारखे झाले आणि मी त्यांना म्हटले, "उद्याच्या दाव्याच्या तयारीत मी गुंतलो आहे. आपल्याला माझ्याशी काही विशेष बोलावयाचे आहे का? असेल, तर आपण लवकर बोला." पण त्या काही बोलेनात आणि जातहिनात. शेवटी निरुपायाने मी त्यांना स्पष्ट शब्दांनी जाण्याची सूचना केली. या प्रकारामुळे माझे मन इतके काही अस्वस्थ होऊन गेले की, मला रात्रभर झोप आली नाही; व पुन्हा कधी त्यांच्या घरी जाण्याचा प्रसंग येऊ नये, म्हणून मी त्या गावातले कोणतेही काम नंतर घेतले नाही."

ही हकीगत सांगून आपल्या नाटकातले या प्रसंगावरून सुचलेले पदही कोल्हटकरांनी मला म्हणून दाखविले. नंतर मी त्यांना विचारले, "आपण जर खरोखरच विरूप असता, तर आपल्यावर असा प्रसंग कसा आला असता?" तेव्हा ते मला म्हणाले, "त्या बाईच्या या वागण्याचा रूपाशी काही संबंध आहे, असे मला वाटत नाही. मी पूर्वी अनेकदा त्यांच्याकडे उतरलो होतो. माझा त्यांच्याकडे मुक्काम असला, म्हणजे त्यांचे पती, जेवणानंतर तास दीड तास, गाण्याबजावण्याचा कार्यक्रम करीत असत आणि माझ्या नाटकांतली आपली आवडती पदे माझ्याकडून म्हणवून घेत असत. त्या वेळी या बाईही हजर असावयाच्या. ती दोघेही नवराबायको मोठी रसिक आणि देखणी आहेत. तशा त्या बाई फारच चांगल्या आहेत. त्यांच्याविषयी कोणत्याही प्रकारचा प्रवाद नाही. त्याच दिवशी त्यांना असा मोह का पडला, हे सांगणे कठीण आहे. त्यांच्या आयुष्यातला तो बहुधा पहिला आणि शेवटलाच प्रमाद (Lapse) असावा. म्हणूनच मला पराकाष्ठेचे वाईट वाटले. तेव्हापासून मी असा निश्चय केला की, घरातला कर्ता पुरुष जर परगावी गेलेला असला, तर आपण काही त्या घरी उतरावयाचे नाही. असे प्रसंग आणखी दोन वेळा माझ्यावर आले. पण माझ्या मनाच्या निग्रहामुळे मी त्यांतून निभावलो. मला विश्वासघाताविषयी अतोनात चीड आहे. व्यभि-

चार हा विश्वासघाताचाच एक अत्यंत गर्हणीय प्रकार आहे, असे मी समजतो. त्यामुळे अनेक बुद्धिमान् सुस्वरूप स्त्रियांशी माझा स्नेह असतानादेखील माझे वर्तन अतिशय शुद्ध राहिले आहे." कोल्हटकरांचे हे उद्गार ऐकून 'आत्मवृत्ता'तील एका विधानाची मला आठवण झाली. त्यांनी असे म्हटलेले आहे की, "माझ्या मनाची सुखाकडे विशेष प्रवृत्ती आहे. परंतु सुखाकरिता विश्वासघात कधीही करावयाचा नाही, हा मात्र पक्का निर्धार." या निर्धारामुळेच, गणिकामैत्रीचा अपवाद सोडल्यास, त्यांचे वर्तन शुद्ध राहिले, हे उघड आहे.

*　　　*

१९२७ च्या मेमध्ये, कोल्हटकर पुणे येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडून आल्यावर, श्री. गं. दे. खानोलकर यांनी त्यांचे छोटेसेच पण छानदार चरित्र प्रसिद्ध केले. आपल्या गुरूंकडून माहिती घेऊनच त्यांनी हे चरित्र लिहिलेले होते. त्यात, 'फेस–स्टडी' म्हणता येईल, अशा प्रकारचा प्रो. श्री. वा. रानडे यांनी मुद्दाम काढलेला कोल्हटकरांचा फोटो त्यांनी दिलेला होता. आम्हाला सगळ्यांनाच तो नवीन पद्धतीचा फोटो आवडला. पण कोल्हटकरांना मात्र तो मुळीच आवडला नाही. आपल्या चेहऱ्याची विरूपता त्या फोटोमुळे उठून दिसते आणि तो पाहून लोकांचे मत आपल्याविषयी प्रतिकूल होईल, अशी त्यांची समजूत झाली. म्हणून आपल्या भेटीला येणाऱ्या मंडळीजवळ त्या फोटोबद्दल ते सारखे नाराजी व्यक्त करीत असत. शेवटी मी एक दिवस त्यांना विचारले, "आपण विरूप आहात, असा आपला समज आहे ना ? मग ती विरूपता फोटोत उतरल्याबद्दल आपण इतके नाराज का झालात ?" त्यावरोबर ते थोडे रागानेच मला म्हणाले, "त्या फोटोत माझा चेहरा आहे त्यापेक्षा जास्त विरूप दिसतो, असे मत अनेक लोकांनी मजजवळ बोलून दाखवले, हे आपण पाहिलेच आहे. मी विरूप असलो, म्हणून काय माझे मित्र म्हणवणाऱ्या इसमांनी अशा रीतीने माझ्या विरूपतेचे प्रदर्शन करावयाचे ?" स्वतःच्या सगळ्याच मर्यादांची आणि वैगुण्यांची त्यांना इतकी तीव्र जाणीव होती की, त्या बाबतीत ते पराकाष्ठेचे हळवे आणि सावध होते. लोकांना मात्र ते विरूप आहेत, असे कधी वाटले नाही.

*　　　*

कोल्हटकरांच्या संयमाचा आणि सहृदयतेचाही एक अत्यंत हृदयंगम प्रसंग त्यांच्या 'मतिविकार' नाटकातील एका सुंदर पदात ग्रथित झालेला आहे. १९०४ च्या डिसेंबरात, ते तेल्हारा येथे वकिली करीत असता, त्यांच्या एका पक्षकाराने, तेथील कोर्टाचे न्यायाधीश स्त्रीलंपट असल्याची समजूत करून घेऊन, त्यांच्याकडे पाठवण्यासाठी एक तरुणी 'नजर' म्हणून बरोबर आणली. कोल्हटकरांना जेव्हा त्याने आपला हा बेत सांगितला, तेव्हा ते प्रथम रागाने उद्गारले, "फार शहाणा आहेस तू. असल्या मार्गाने जर तुला दावा जिंकावयाचा होता, तर तू माझ्याकडे कशाला आलास ? आपले कागदपत्र आणि पैसे घेऊन तू आत्ताच्या आत्ता चालता हो !" त्यांचा तो रुद्रावतार पाहून पक्षकाराने त्यांची जेव्हा गयावया करून माफी मागितली, तेव्हा ते शांत झाले. पण, तत्क्षणीच त्यांची विनोदबुद्धी आणि सौंदर्यपिपासा जागृत होऊन ते त्याला म्हणाले, "अरे, न्यायाधीशाला जे काय सादर करावयाचे असते, ते सर्व वकिलामार्फत पाठवले पाहिजे, हे माहित नाही का तुला ? मग तू 'नजर' परस्पर जजसाहेबांकडे पाठवावयाचे कसे ठरवलेस ?" त्यावर तो काही बोलला नाही. आपल्या तरुण वकिलांचा राग इतक्या लवकर शांत झाला आणि न्यायाधीशांसाठी आपण आणलेली 'नजर' स्वतःच्या नजरेखाली घालण्याची इच्छा त्यांनी शेवटी व्यक्त केली, हे पाहून त्या पक्षकाराचा जीव भांड्यात पडला.

म्हणून, रात्री नवाच्या सुमारास तो पुन्हा आला आणि अदबीने म्हणाला, "साहेब, मी जजसाहेबांसाठी आणलेली 'नजर' दप्तरात बसवून ठेवली आहे. आपण तिथे चलता की मी इथे घेऊन येऊ तिला ? आपण एकदा पाहून तर घ्या मी आणलेली 'नजर' किती मुलाम आहे ते !" या वेळेपर्यंत कोल्हटकर त्याच्याशी सकाळी केलेला विनोद, आपल्या स्वभावानुसार, विसरून गेलेले होते. त्याचे ते बोलणे

ऐकून ते चमकले. त्यांची सौन्दर्यपिपासा जागृत झाली आणि ते म्हणाले, " तू पुढे हो. मी आलोच दप्तरात." ते तिथे जातात, तो तोंडावर झुकता पदर घेऊन कोपऱ्यात उभी असलेली तरुणी त्यांच्या दृष्टीस पडली. त्यांनी तोंडावरला पदर मागे घेण्याविषयी तिला सूचना करण्यास पक्षकाराला सांगितले. तोच त्या खाली मान घालून उभ्या असलेल्या तरुणीचा दावलेला हुंदका त्यांच्या कानावर पडला. तत्क्षणी कोल्हटकर विरघळून जाऊन तिला कळवळयाने म्हणाले, " बाई, तू मुळीच घाबरू नकोस. तू मला बहिणीसारखी आहेस. मी याला सकाळीच झाडून टाकले अशा ओंगळ कामासाठी याने तुला इथे आणल्याबद्दल ! " त्याबरोबर, त्या तरुणीने तोंडावरला पदर मागे घेतला, भरल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांच्या पायांवर मस्तक ठेवले. त्यांनीही तिची विचारपूस केली, भाऊभेट म्हणून तिच्या हातावर पंधरा रुपये ठेवले आणि तिला सुखरूप घरीं पोचवून देण्याबद्दल पक्षकाराला ताकीद दिली. पण त्यांच्या डोळ्यांपुढून तो प्रसंग काही केल्या हलेना. शेवटी पहाटे त्यांनी त्या प्रसंगावर हे सुंदर पद लिहिले,—

सुंदर वदन नसेल कसे ? ॥
अवयव इतर जरी सुरुचिरसे
लावण्ये खचलेसे ॥ ध्रु ॥
ऐसी अवयवपंक्तिसमस्या ।
दिधली जरि रसिका उकलाया ॥
पुरविल कल्पुनि मोहक आस्या ।
संशय यांत न भासे ॥१॥
सुंदर वदन नसेल कसें ?

हे पद त्यांनी पुढे 'मतिविकार' नाटकात 'विहारा'च्या तोंडी घातले.

कोल्हटकरांचा हा विनोदी स्वभाव अनेकदा त्यांच्या अंगलट येत असे. त्याचा एक अनुभव १९२८ सालच्या नाताळात, त्यांचा मुक्काम नागपूर येथे त्यांचे जिवलग मित्र रा. ब. हरि शिवराम मुंजे यांच्याकडे असताना, मला आला. माझे श्वशुर श्री. विश्वनाथराव नवाथे यांनी त्यांना आणि रावबहादुरांना आमच्या घरी जेवावयाला बोलाविले होते. श्री. दादासाहेब नवाथे हे डॉ. मुंजे यांचे अनन्य भक्त होते. त्या काळात ते डॉक्टरसाहेबांबरोबर केव्हा केव्हा शिकारीला जात असत आणि मांसाहारही करीत असत. त्या दिवशी जेवणात घेवडयाच्या शेंगांचे जे लोणचे वाढलेले होते, ते कोल्हटकरांना फार आवडले. त्यावरून निरनिराळ्या प्रकारच्या लोणच्यांविषयी बोलणे चालू असता श्री. नवाथे यांनी त्यांना अगदी सहजगत्या विचारले, " तात्यासाहेब, आपण हरणाचे लोणचे खाल्ले आहे का कधी ?" तेव्हा, कोल्हटकर एकदम चमकले आणि म्हणाले, " नाही, माझ्या तोंडाला लकव्याचा उपद्रव झालेला असताना मी वैद्यकीय उपचार म्हणून मांसाहार केलेला आहे. पण त्याविषयी मला रुची नाही. हरणाचे लोणचे तर मी कधीच खाल्लेले नाही." त्यावरोबर श्री. नवाथे उद्गारले, " त्या लोणच्यापुढे आपली ही सगळी ब्राम्हणी लोणची काहीच नाहीत. आपण एकदा जरूर चव घेऊन पहा त्याची !" त्यावर कोल्हटकरांनी विचारले, " असे ? आपण स्वतः चव घेतली आहे का त्याची ?"—" हो, हो, मला फार आवडते ते लोणचे आणि आपल्यालाही ते फार आवडेल, अशी खात्री आहे माझी ! "—श्री. नवाथे यांनी उत्तर दिले. तत्क्षणी कोल्हटकरांनी उत्सुकतेने विचारले, " मग आपल्याकडे असेलच ते लोणचे, दादासाहेब? आपण आत्ताच चव घेऊन पाहू य त्याची !"—" छे, छे ! आमच्या मंडळीचे सोवळे मोठे कडक आहे. आमच्या घरी अजिवात चालत नाही असले काही !"—माझ्या श्वशुरांनी खुलासा केला. तो ऐकून कोल्हटकर मनापासून हसले; व तेवढयावरच ते बोलणे थांबले.

पण श्री. नवाथे काही तो विषय विसरले नाहीत. हरणाच्या लोणच्याची चव घण्याची जी उत्सुकता कोल्हटकरांनी त्या दिवशी जेवताना दाखविली, ती त्यांच्या मनात पक्की बसलेली होती. म्हणून त्यांनी मुद्दाम ते लोणचे आणले. आणि, दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्याबरोबर, ते रा. ब. मुंजे यांच्या धंतोलीतील बंगल्यावर आले.

रावबहादुर हे डॉ. मुंजे यांचे धाकटे बंधु असल्यामुळे दादांची त्यांच्याशी चांगलीच घसट होती. आम्ही गेलो, त्या वेळी हरिभाऊ पेटी वाजवीत होते आणि कोल्हटकर गात होते. नमस्कार वगैरे झाल्यावर श्री. नवाथे यांनी पिशवीतून बरणी काढून ती कोल्हटकरां-पुढे ठेवली. त्याबरोबर त्यांनी विचारले, "हे काय आहे, दादासाहेब ?" -- "हरणाचे लोणचे ! आपण त्या दिवशी त्याची चव घेण्याची इच्छा दर्शविलीत, म्हणून मुद्दाम आणले आहे मी ते !"—श्री. नवाथे यांनी हसत हसत उत्तर दिले. तोच रावबहादुरांनी त्यांना विचारले, "काय दादासाहेब, आपण आमच्या तात्या-कडून आणलेले दिसते हे लोणचे ?" तात्या म्हणजे डॉ. मुंजे ! "नाही हरिभाऊ, मी ते राजवाड्यातून आणले मुद्दाम. आपले फत्तेसिंगरावमहाराज असल्या सगळ्या पदार्थांचे किती शौकी आहेत, हे माहितच आहे आपल्याला. त्यांनी स्वत: शिकार केलेल्या हरणाचे लोणचे आहे हे !"—श्री. नवाथे यांनी उत्तर दिले. कोल्हटकरांनी या भेटीबद्दल त्यांचे आभार मानले आणि आम्ही घरी परत आलो.

सायंकाळी ४ च्या सुमारास मी जेव्हा कोल्हट-करांना भेटण्यासाठी धंतोलीवर गेलो, तेव्हा साह-जिकच पहिला प्रश्न त्या लोणच्यासंबंधी केला. मी त्यांना विचारले, "आपल्याला कसे काय आवडले ते लोणचे ?" तत्क्षणी त्यांचा चेहरा एकदम गंभीर झाला आणि त्यांनी मला प्रतिप्रश्न केला, "गजाननराव, आपण माझी 'गरीब बिचारे पाडस' ही गोष्ट वाच-लेली आहे ना ?" -- 'हो,' मी उत्तर दिले. "मग मला कसे खाणे शक्य आहे ते लोणचे ?" त्यांनी मला विचारले. त्यावर मी प्रतिप्रश्न केला, "असे जर आहे, तर आपण त्याची चव घेण्याची इच्छा कशी काय दर्शवलीत त्या दिवशी ?" तेव्हा, कोल्हटकर म्हणाले, "मी केवळ गमतीने बोललो ते आपल्या श्वशुरांचा उत्साह पाहून ! आपल्या घरात ते लोणचे असणे शक्य नाही, याबद्दल पक्की खात्री होती माझी. पण, नवाथेसाहेबांनी इतका उत्साह दाखवल्यावर त्याचे चीज करणे अवश्य होते. म्हणून मी गंमत केली थोडीशी !"—"पण मी आता सांगू काय दादांना ? ते लोणचे आपल्याला कसे काय आवडले, हे विचारून घ्यावयाला त्यांनी तर मला बजावून सांगितलेले होते,"—मी त्यांना म्हटले. त्यावरोबर, रावबहादुरांकडे पहात कोल्हटकर हसत हसत उद्गारले, "त्यांना सांगा, हरिभाऊंना ते फार आवडले आणि त्यांनी भाजीसारखे खाऊन सगळे संपवून टाकले ! त्यामुळे माझ्या वाट्याला ते मुळी आलेच नाही !" कोल्हट-कर विनोदाच्या लहरीत अशी काही विधाने करीत आणि मग ती त्यांना निस्तरावी लागत असत.

*   *

कोल्हटकरांची विनोदबुद्धी आणि शिष्टाचार-प्रियता यांचा मेळ पडूनही अनेक गमतीचे प्रकार नेहमी घडत असत. त्यांच्या शिष्टाचारासंबंधीच्या कल्पना बऱ्याच निराळ्या होत्या. हिंदी लोकांची भाषा आणि रीतिरिवाज यांची जी छाप विदर्भावर पडलेली आहे, तिच्यामुळे एकंदर महाराष्ट्रीय लोकांपेक्षा वैदर्भीय लोकात अदब, अगत्य आणि आतिथ्य ही तिन्ही जास्त आहेत. महाराष्ट्र राज्यात विदर्भाचा समावेश झाल्यापासून अलिकडे या तिन्ही गुणांचा झपाट्याने ऱ्हास होत चाललेला आहे, हा भाग निराळा ! विद-र्भात 'तुम्ही', 'तुमचा' यासारखे अनेकवचनी प्रयोग सहसा कोणी करीत नाही. त्याऐवजी 'आपण', 'आपला' असे शब्दप्रयोग अजूनही प्रचलित आहेत. महाराष्ट्रात अनेकवचन फक्त समक्ष बोलतानाच काय योजले जात असेल, तेवढेच ! पाठीमागे सामान्यत: सर्रास एकवचनच ! मग ती व्यक्ती किती का मोठी असेना ! उलट, विदर्भातील डॉ. मुंजे, लोकनायक डॉ. अणे, श्री. बाबासाहेब खापर्डे, न्या. डॉ. सर भवानीशंकर नियोगी, न्या. काकासाहेब पुराणिक, न्या. अण्णासाहेब मंगळमूर्ती प्रभृती बड्या मंडळीला देखील कधीच कोणाचा एकवचनी निर्देश करताना मी ऐकले नाही. कोल्हटकरांनी तर, "नोकरास मी बहुधा एकेरी नावाने हाक मारीत नाही", असे 'आत्मवृत्ता'त लिहूनच ठेवलेले आहे. आमच्या परिचयाच्या अगदी पहिल्या दिवसापासून त्यांनी मला जे 'आपण' म्हणून संबोधिले, ते शेवटपर्यंत कायम राहिले. माझ्या कुटुं-बातल्या सगळ्या व्यक्तींना आणि प्रो. वि. ह. कुळकर्णी

प्रभृती माझ्या सर्व विद्यार्थिमित्रांनाही 'आपण' म्हणूनच ते संबोधित असत. त्यांच्या सहवासामुळे, नागपूरला जाण्यापूर्वीच, माझ्या मनाला अशा रीतीने आदरार्थी भाषा वापरण्याचे वळण लागून गेले.

कोल्हटकरांची शिष्टाचाराच्या बाबतीत एक तऱ्हा अशी होती की, कोणीही नवा माणूस भेटावयाला आला, म्हणजे शक्य तो त्याची आपली ओळख असल्याचा किंवा त्याला पूर्वी कुठे तरी पाहिला असल्याचा आभास उत्पन्न करावयाचा ! या तऱ्हेवाईकपणामुळे अनेकदा हास्यास्पद आणि क्वचित् उद्वेगजनकही प्रसंग घडत असत. श्री. माधव केशव काटदरे ऊर्फ कवी माधव यांच्या ऐतिहासिक कवितांविषयी त्यांनी मजजवळ अतिशय अनुकूल उद्गार काढलेले होते. म्हणून मी माधवरावांचा त्यांच्याशी परिचय करून देण्याचे ठरवले; व १९२१ च्या नाताळात त्यांचा मुक्काम मुंबईस असताना एक दिवस सकाळी माधवरावांना त्यांच्याकडे घेऊन गेलो. मी ओळख करून देताच कोल्हटकर हसून म्हणाले, "यांची आणि माझी भेट तर पूर्वीच झालेली आहे, गजाननराव !" हे त्यांचे विधान ऐकून आम्ही दोघेही गोंधळून गेलो. श्री. काटदरे त्यांना म्हणाले, "आपली भेट यापूर्वी कुठेच झालेली नाही. मी आज प्रथमच आलो आहे आपल्याकडे."--"नाही हो. मी आपल्याला पाहिलेले आहे कुठे तरी,— आता आठवत नाही नक्की मला !" कोल्हटकरांनी उत्तर दिले. असे बोलणे आणखी थोडा वेळ चालले; व माधवराव चिडल्यासारखे होऊन गेले. शेवटी मी, त्या शिष्टाचारजन्य संकटातून मार्ग काढण्यासाठी, म्हटले, "मला असे वाटते तात्यासाहेव, आपण यांचा जो फोटो आमच्या घरी पाहिलात ना, त्यावरून कदाचित् यांना पूर्वी बघितल्यासारखे वाटत असेल आपल्याला !" तत्क्षणी ते हसून उद्गारले, "हो, हो, बरोबर ! आपल्याकडे यांचा फोटो मी पाहिलेला असल्यामुळेच माझा असा समज झाला !" श्री. काटदरे यांना त्यांचे हे वर्तन मुळीच आवडले नाही; व ते पुन्हा कधीही त्यांना भेटले नाहीत.

पण, शिष्टाचाराचे पालन करण्याच्या बाबतीत इतकी काळजी घेऊनही, अनवधानतेमुळे कोल्हटकरांची अनेकदा फसगंमत होत असे. १९२८ च्या नाताळात, नागपुरास रा. ब. मुंजे यांच्याकडे त्यांचा मुक्काम असताना, एक तरुण गृहस्थ आपल्या नाटकाचे हस्तलिखित घेऊन त्यांच्या भेटीला आले. कोल्हटकरांनी त्यांचे म्हणणे मोठ्या आस्थेने ऐकून घेतले; व हस्तलिखित ठेवून घेऊन त्यांना दोन दिवसांनी येण्याची सूचना केली. दरम्यान त्यांच्या स्वभावानुसार, गप्पाष्टकांच्या आणि गाण्यावजावण्याच्या कार्यक्रमात, ते गृहस्थ आणि त्यांचे नाटक या दोहोंचा त्यांना विसर पडून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना भेटावयाला एक तरुण गृहस्थ आले. कोल्हटकरांचा समज असा झाला की, काल आलेले नाटककारच आज आपल्याला भेटावयाला आलेले आहेत ! म्हणून, नाटकाचे हस्तलिखित उघडूनही पाहिलेले नसताना देखील, त्यांनी त्यावद्दल मोघम बोलावयाला सुरवात केली. ते गृहस्थ साहजिकच गोंधळून गेले. माझ्या लक्षात तत्क्षणीच कोल्हटकरांची चूक आली. पण, त्यांना कशा रीतीने सूचना द्यावी, हे मला कळेना. शेवटी ते गृहस्थ स्वतःच म्हणाले, "आपला काही तरी गैरसमज झालेला दिसतो आहे, तात्यासाहेव. मी नाटककार तर नाहीच, पण लेखकसुद्धा नाही. मी केवळ आपला एक चाहाता म्हणून भेटावयाला आलों आहे, इतकेच." हा खुलासा त्यांनी केल्यावर तरी कोल्हटकरांनी थांबावे की नाही ? पण, त्या गृहस्थांची समजूत घालण्यासाठी ते त्यांना म्हणाले, "आपण माफ करा मला. काल सकाळी जे नाटककार आलेले होते, त्यांच्या आणि आपल्या चेहऱ्यात साम्य असल्यामुळे माझा असा गैरसमज झाला." पण, योगायोग असा की, ते नाटककार या गृहस्थांच्या ओळखीचे निघाले. त्यामुळे, त्यांनी तुटकपणाने कोल्हटकरांना असे उत्तर दिले की, "माफ करण्यासारखे काय आहे त्यांत, तात्यासाहेब ? पण हाही आपला समज पुन्हा चुकीचाच आहे. ते नाटककार माझे मित्र आहेत. त्यांच्या आणि माझ्या चेहऱ्यात कोणत्याच प्रकारचा सारखेपणा नाही !" ते गृहस्थ गेल्यावर मी कोल्हटकरांना सरळच विचारले, "आपण जो हा अनोळखी माणसांना ओळख असल्याचे भासवण्याचा प्रयत्न नेहमी करीत असता, तो कशासाठी ? त्यामुळे

उलट अडचणीत मात्र येता आपण." त्यावर कोल्हटकर म्हणाले, "मी मुद्दाम काही प्रयत्न करीत नाही. भेटीला येणाऱ्या माणसांचे चेहरे आणि नावे ही दोन्ही माझ्या लक्षात रहात नाहीत. त्यामुळे एकाचा चेहरा आणि दुसऱ्याचे नाव यांची गल्लत होऊन असे प्रकार घडतात. शिवाय, माणसांना ओळख असल्यासारखे जर आपण भासवले, तर त्यांना बरे वाटते, असाही अनुभव आहे माझा. म्हणून मी अंदाजाने खडे मारून पहात असतो. एकादे वेळेस अंदाज असा चुकतो!"

कोल्हटकरांच्या शिष्टाचाराविषयीच्या या चमत्कारिक कल्पनांमुळे केव्हा केव्हा अप्रशस्त प्रकारही घडत असत. १९२७ च्या मे महिन्यात पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अधिवेशनानंतर, नेहमीप्रमाणे जुन्या नव्या परिचितांच्या भेटीगाठी घेण्याचा त्यांचा कार्यक्रम सुरू झाला. तदनुसार एक दिवस सकाळी पुण्यातल्या एका जुन्या सुप्रतिष्ठित दैनिकाच्या ज्येष्ठ संपादकांच्या भेटीला ते गेले. श्री. खांडेकर आणि मी दोघे बरोबर होतो. कोल्हट-करांच्या अध्यक्षीय भाषणावर त्यांनी अनुकूल अग्रलेख लिहिला होता. त्याबद्दल त्यांचे आभार मानताना उत्साहाच्या भरात कोल्हटकरांनी त्यांना विचारले, "माझ्या भाषणात मी अनेक जुन्या नव्या लेखकांचा उल्लेख केलेला आहे, तो आपण पाहिलात ना? त्यातली एक उणीव आपल्या लक्षात आली का?" ते संपादक म्हणाले, "नाही, मला तर काहीच उणीव आढळली नाही त्यात."— "हे आपले सौजन्य आहे खरोखरी. कारण आपला स्वतःचाच उल्लेख मुळी त्यात करावयाचा राहून गेला आहे. आपले नाव त्यात आणण्यासाठी मी खूप खटपट केली. पण, जुन्या लेखकांत आपला निर्देश करावा, तर आपण अलिकडेच लेखक म्हणून प्रसिद्धीस आलेले आहात. आणि, नव्या लेखकांत आपला निर्देश करावा, तर आपण आमचे समकालीन आहात! त्यामुळे, आपला निर्देश कशा रीतीने करावा, हेच मुळी मला समजेना. या अडचणीपायी तो करावयाचा राहून गेला शेवटी! आपला गैरसमज तर नाही ना झाला माझ्याविषयी?" त्याबरोबर ते वृद्ध संपादक किंचित् उपरोधाने आणि तुच्छतेने हसून उद्गारले, "छे, छे! आपली अडचण लक्षात आली माझ्या, तात्यासाहेब. पण मी कोठे लेखक किंवा ग्रंथकार आहे माझा निर्देश साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षाच्या भाषणात यावयाला? मी बोलून चालून एक सामान्य वर्तमानपत्री लेखक. माझा उल्लेख आपण केला असतात, तर आपलेही हसे झाले असते आणि माझेही झाले असते!" त्या दिवशी दुपारी जेव्हा मी रोजच्या-प्रमाणे त्या दैनिकाच्या कचेरीत गेलो, तेव्हा ते संपादक मला म्हणाले, "काय गुरु आहेत गजाननराव, तुमचे? वा रे वा! आम्हाला काय गाढव समजतात का ते अशा रीतीने बनवावयाला? परमेश्वराने त्यांना उदंड अक्कल दिली असेल. पण आम्हा पामरांनादेखील थोडीशी अक्कल दिलेली आहे त्याने यांची असली बोलणी सम-जण्यापुरती! अहो, त्यांनी आमचा उल्लेख आपल्या भाषणात करावा म्हणून आम्ही थोडेच सुजलो होतो? अशा रीतीने बोलून आपण दुसऱ्याचा पाणउतारा करतो, हे कसे ध्यानात येत नाही या बड्या धेंडांच्या?"

असल्या सगळ्या प्रकारांतून जो विनोद उत्पन्न होत असे, त्याची मजा कोल्हटकर निःशंक मनाने घेत असत, याचे मात्र मला नवल वाटावयाचे. त्यांचे सौजन्य एरवी इतके निरुपम होते की, गंभीर मनः-स्थितीत असताना, ते अवाक्षरानेही कधी कुणाला दुखवीत नसत. पण, एकदा का विनोदाची लहर त्यांना आली,—आणि ती केव्हा, कुठे, कशी येईल, याचा काही नेम नसे!—म्हणजे आपल्या बोलण्याने कोणाचा अपमान किंवा उपहास होईल, याचे भान त्यांना राहात नसे. त्या विनोदाच्या तावडीत साप-डून कोणाची केव्हा, कशी राळ उडेल, हे सांगणे कठीण! रावसाहेब मोरमकर यांच्या घरच्या बैठकीत एकदा दुपारच्या चहाफराळाच्या वेळी, मी त्या दिवशी वेळेवर येऊ न शकल्याबद्दल माझी कुचाळी करण्याच्या भरात, काही अर्वाच्य कोटचा माझ्यासंबंधी करण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी प्रो. ना. के. बेहरे यांनी त्या कोटचा मुद्दाम माझ्याकडे येऊन मला सांगितल्या. कोल्हटकरांशी

माझा परिचय त्या वेळी नुकताच झालेला असल्यामुळे, त्यांच्या विनोदाचे चटके वारंवार बसून, मी अद्याप निर्ढावलेलो नव्हतो. म्हणून त्या कोटया ऐकून मला फार वाईट वाटले. दुपारी तीन वाजता आमची भेट झाल्यावर, मी जेव्हा त्या प्रकाराबद्दल त्यांच्यापाशी तक्रार केली, तेव्हा त्यांनी मला हसत हसत विचारले, "कोणी सांगितले आपल्याला आम्ही अशा कोटया केल्या म्हणून? नारायणरावांनी कळ लावलेली दिसते. आपण त्या दिवशी वेळेवर आला नाहीत, म्हणून थट्टा केली आम्ही आपली थोडीशी!"—"कोणीही सांगितले असेल, पण आपण माझ्या-संबंधी कोटया केल्यात, हे तर खरे ना?" मी अतिशय नाराजीने विचारले. तथापि, त्यांनी हसून उत्तर दिले, "आपल्याला फार वाईट वाटलेले दिसते. पण बैठकीत गप्पाष्टके झडताना अशा कोटया नेहमीच चालतात. मला काही आता नक्की आठवत नाही त्या कोटया कोणी केल्या ते!"—"मी तर ऐकलें आपणच त्या केल्यात म्हणून!"–मी म्हटले. "केल्याही असतील कदाचित, अशा कोटया आणि थट्टामस्करी ही तिथल्या तिथेच नेहमी विसरून जावयाची असते, हे माहीत नाही आपल्याला. म्हणून तर मी म्हणत असतो सारखा आपण अगदी मनमोकळेपणाने विनोदात भाग घ्यावयाला आणि हसावयाला शिका. पण आपण ऐकत नाही माझे!"—आमच्यापैकी कोणीही त्यांच्या विनोदाच्या आणि वक्रोक्तीच्या तावडीतून सुटला नाही. पण आमच्या गुरूंचे हे सगळे वाग्बाण आम्ही मुकाट्याने मस्तकी झेलीत असू. श्री. खांडेकर हे एवढे कोटिबाज! पण, त्यांनी कधीही, गडकऱ्यां-प्रमाणे, आपल्या गुरूंच्या कोटिवर प्रतिकोटी करून त्यांची अवज्ञा केल्याचे मला आठवत नाही. खानोल-करांना आणि मला मुळी विनोदाचे अंगच नव्हते. त्यामुळे प्रतिकोटी करण्याचा प्रश्नच नव्हता. पण आम्ही उलट उत्तरही त्यांना कधी दिले नाही.

* *

कोल्हटकरांच्या साहित्यविषयक संभाषणात विनोद आणि टीका यांचा नेहमी मोठा मनोरंजक मेळ पडलेला दिसत असे. 'जन्मरहस्य' या त्यांच्या नाटका-वर आलेल्या प्रतिकूल टीकेबद्दल बोलताना ते एकदा गमतीने म्हणाले, "दुसऱ्याच्या पुस्तकावर जर झण-झणीत टीका आली, तर ती आपल्याला मोठी मार्मिक वाटते. पण आपल्या स्वतःच्या पुस्तकावर जर अशी प्रतिकूल टीका कोणी केली, तर ती मात्र मर्मभेदक वाटते आपल्याला. मार्मिक आणि मर्मभेदक यात एवढाच फरक आहे!" कोल्हटकरांच्या या विधानाचा अनुभव खुद्द त्यांच्याच बाबतीत एकदा येऊन गेला. १९२५ साली, त्यांचे 'शिवपावित्र्य' हे नाटक प्रसिद्ध झाल्यावर, मी त्यावर 'महाराष्ट्रा'त अननुकूल अभि-प्राय दिला. तो वाचून 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. दादासाहेब ओगले यांनी मला हटकले, "का हो, तुम्ही शिष्य ना तात्यासाहेबांचे? मग असा अभिप्राय कसा लिहिलात त्यांच्या नाटकावर? त्यांना काय वाटेल हा अभिप्राय वाचून?" तेव्हा मी त्यांना उत्तर दिले, "विशेष काही वाटणार नाही, दादा. हे नाटक एका नाटक मंडळीच्या चालकांना त्यांनी मुंबईस वाचून दाखविले, त्या वेळी मी हजर होतो. त्यातले सगळे दोष मी त्याच वेळी त्यांना सांगून टाकले होते. ते जरी माझे गुरु असले, तरी त्यांच्याशी माझे अनेक बाबतीत मतभेद आहेत. मी त्यांच्यापासून काही ते लपवले नाहीत कधी. तेही कधी रागावत नाहीत माझ्यावर. मला त्यांची नाटके आवडत नाहीत, हे माहित आहे त्यांना." पुढे तो अभिप्राय वाचल्यावरोबर कोल्हटकरांचे जे पत्र मला आले, त्यात त्यांनी, "गुरुभक्तीला बळी न पडता, अभिप्रायलेखकाचे कर्तव्य चोखपणाने बजावल्याबद्दल" माझे प्रथम अभिनंदन केले होते; व मग असे लिहिले होते की, "येथील माझ्या अनेक मित्रांनी हा अभिप्राय लिहिणारा लेखक माझा विरोधक आणि शत्रु असावा, असा आपला ग्रह करून घेतलेला आहे. पण, मी त्यांना असे परोपरीने सांगितले की, अभिप्रायलेखक हा माझा आवडता शिष्य असून, त्याची माझ्यावर दृढ भक्ति आहे; व त्या भक्तीमुळेच त्याने माझ्या नाटकातले दोष इतक्या विस्ताराने दाखविलेले आहेत. पण, त्या माझ्या मित्रांचा आपल्याविषयी झालेला गैरसमज मी काही दूर करू शकलो नाही, याबद्दल खेद होतो." या पत्रातील खोच अगदी उघड होती.

१९२१ च्या मे महिन्यात कोल्हटकरांचा मुक्काम मुंबईस असताना नागपूरचे विख्यात लोकप्रिय कवी श्री. आनंदराव टेकाडे हे त्यांना भेटावयाला आले. श्री. टेकाडे यांना थोडे कमी ऐकावयाला येत असे. उमरेडी जरीकाठी धोतर, डोक्यावर जरीच्या फुलांची किनार असलेली मखमली टोपी, कानात पाचूचा खडा असलेली भिकबाळी, हातात सोन्याची सलकडी आणि बोटात हिऱ्यांच्या अंगठ्या असा त्या वेळी या तरुण वैदर्भीय कवीचा थाट असे. त्यांचा 'आनंदगीत' हा पहिला काव्यसंग्रह त्या सुमारास नुकताच प्रसिद्ध झालेला होता. तो त्यांनी कोल्हटकरांना भेट म्हणून पाठवला, पण व्ही. पी. ने! त्यावरून बोलताना कोल्हटकर त्यांना हसत हसत म्हणाले, "आनंदराव, आपण इतक्या अगत्याने आपल्या कवितांचे पुस्तक मला भेट म्हणून पाठवले, याबद्दल मी आपला फार आभारी आहे. पण, ही भेट मजकडे रवाना करण्यापूर्वी, आपण जर एक कार्ड पाठवून व्ही. पी. केल्याचे मला कळवले असते, तर मी त्याच्या स्वागताला तयार राहिलो असतो!" पण आनंदरावांनी हे त्यांचे बोलणे ऐकले न ऐकल्यासारखे केले. तेव्हा कोल्हटकर म्हणाले, "माणूस जर शहाणा असला, तर आपल्या व्यंगाचादेखील त्याला चांगला उपयोग करून घेता येतो. लकव्याच्या विकारामुळे माझ्या डोळ्यांना जे सारखे पाणी येते, ते एकादे विरहकाव्य ऐकताना किंवा शोकपर्यवसायी नाटक पाहाताना उपयोगी पडते. मी मधून मधून डोळ्यांना उपरणे लावून त्यातल्या करुण रसाचा मजवर फार परिणाम झाला असल्याचे भासवू शकतो. तसा आनंदरावांनी आपल्या बहिरेपणाचा उपयोग आता करून घेतला आणि माझ्या बोलण्याला उत्तर देण्याचे टाळले." श्री. टेकाडे यांच्या 'आनंदगीता'त वृत्तदोष आणि भाषादोष पुष्कळच होते. त्यावरून बोलताना नंतर कोल्हटकर म्हणाले, "टेकाडे आणि बेहरे हे आमच्याकडले दोन मोठे खंदे तरुण कवी आहेत. मराठी मासिकांना ते सारखा कवितांचा पुरवठा करीत असतात. केशवसुत, रेंदाळकर वगैरे कवींनी निर्यमक काव्यरचनेचा पायंडा पाडला. पण व्याकरण आणि वृत्त यांच्या वाटेला मात्र अजून कोणीही कवी गेलेला नाही. भवभूतीने आद्यऋषींच्या वाणीबद्दल असे म्हटले आहे की, "ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति." आद्यऋषींच्या वाणीमागून जसा अर्थ धावत सुटत असे, तसे या कवींच्या वाणीमागून विचारे व्याकरण आणि वृत्तशास्त्र धावत सुटलेले आहे. फरक इतकाच की, त्यांच्या कवितेची आणि या शास्त्रांची गाठ कधीच पडत नाही!"

* *

भाषादोषांइतकेच मुद्रणदोषांच्या बाबतीतही कोल्हटकर विलक्षण काटेकोर होते. १९२१ च्या जानेवारीतली गोष्ट. माझ्या आग्रहावरून कोल्हटकरांनी मुंबईच्या 'नवयुग' मासिकाला लेखनसहाय्य करण्याचे मान्य केले होते. पण, ते कबूल करीत असतानाच, 'नवयुगा'चे त्या वेळचे संपादक श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांना त्यांनी असे निक्षून सांगितले होते की, ते जो लेख त्या मासिकाला देतील, त्याची पहिली मुद्रिते मी तपासावीत आणि शेवटली मुद्रिते जळगावला त्यांच्याकडे तपासण्यासाठी पाठवण्यात यावीत. तदनुसार त्यांनी आपला 'आमच्या गावातील पाण्याचे दुर्भिक्ष' हा विनोदी लेख 'नवयुगा'च्या जानेवारीच्या अंकाला देण्यासाठी माझ्याकडे पाठवला. श्री. वैद्य यांच्या स्वाधीन तो करताना मीही त्यांना बजावून सांगितले होते की, त्याची पहिली मुद्रिते माझ्याकडे आणि शेवटली कोल्हटकरांकडे पाठवण्याची दक्षता जर त्यांनी घेतली, तरच 'नवयुगा'ला कोल्हटकरांचे लेखनसहाय्य नेहमीसाठी मिळेल. तथापि, छापखान्याच्या अडचणीमुळे, आम्हा दोघांकडेही मुद्रिते पाठवणे श्री. वैद्य यांना काही शक्य झाले नाही. पुढे 'नवयुगा'चा जानेवारीचा अंक बाहेर पडल्यावर मला कोल्हटकरांची अचानक तार आली. तीत त्यांनी असे कळविले होते की, "लेख वाचून मनस्ताप झाला,—पाठोपाठ पत्र येत आहे." (Pained to read article. letter follows.) ती तार वाचताच, आपल्यापुढे आता कोणते ताट वाढून ठेवलेले आहे, याची मला कल्पना आली. त्यानंतर तीन चार दिवसांनी माझ्याकडे रजिस्टर्ड लेटरचे भले जाडजूड पाकीट आले. तेही शीघ्र डाकेने! ते उघडून पाहिल्यावर, छपाईच्या प्रत्येक चुकीवर लाल शाईने काट मारून चिताड

केलेला कोल्हटकरांचा 'नवयुगा'तील लेख, त्याचे काळजीपूर्वक तयार केलेले मोठें थोरले शुद्धिपत्र आणि त्यांचे स्वतःचेही पत्र एवढे साहित्य माझ्या हाती पडले. पत्र तसे त्रोटकच होते. आपला लेख अत्यंत अशुद्ध छापल्याबद्दल जरी त्यांना अतिशय चीड आलेली होती, तरी आपल्या संयमी, सावध स्वभावानुसार, त्याबद्दलचा सगळा संताप गिळून टाकून, त्यांनी ते पत्र अगदी सौम्य भाषेत लिहिलेले होते. त्यात श्री. वैद्य यांनी मुद्रितांच्या बाबतीत आपला शब्द न पाळल्याबद्दल मला जबाबदार धरून दोष दिलेला होता; व यापुढे माझ्या शिफारशीवर कोणालाही लेखनसहाय्य करणे आपल्याला शक्य होणार नाही, असे स्पष्ट शब्दांनी कळवलेले होते. ते सर्व साहित्य श्री. वैद्य यांना मी दाखवले. त्यांनाही ते वाचून फार वाईट वाटले. पण त्यांचा खरोखरीच त्या बाबतीत अगदी निरुपाय होऊन गेलेला होता. कारण, 'नवयुगा'चे संचालक श्री. डी. काशिनाथ यांच्या अकालनिधनामुळे ते अल्पावधीत लोकप्रिय झालेले सुंदर मासिकही मृत्युपंथाला लागून, त्या वेळी शेवटले आचके देत होते. त्यामुळेच श्री. वैद्य यांना मुद्रिते पाठविणे शक्य झाले नाही. आम्ही दोघांनीही कोल्हटकरांना पत्रे पाठवून त्यांची तावडतोब क्षमा मागितली.

पुढे उन्हाळ्याच्या सुटीत कोल्हटकर मुंबईस आले, त्या वेळी मुद्रिते पाठवणे शक्य न झाल्याबद्दल समक्ष दिलगिरी व्यक्त करावी आणि त्यांची मर्जी पाहून शक्य तर पुन्हा लेखनसहाय्यही मागावे, अशा दुहेरी उद्देशाने श्री. वैद्य हे माझ्याबरोबर त्यांना भेटण्यासाठी एक दिवस सकाळी आले. कोल्हटकरांनी आपल्या शिष्टाचारशील स्वभावानुसार लेखाविषयी एक चकार शब्दही काढला नाही. श्री. वैद्य यांनी मुद्रिते न पाठवता आल्याबद्दल माफी मागितली; व आपल्या अडचणीहि त्यांना सांगितल्या. पण, त्यासंबंधी काही न बोलता, कोल्हटकरांनी फक्त 'नवयुगा'च्या परिस्थितीची कळकळीने चौकशी केली. त्यामुळे, श्री. वैद्य यांना धीर येऊन, त्यांनी 'नवयुगा'-साठी लेख देण्याबद्दल त्यांना विनंती केली. त्यावरोवर, कोल्हटकर हसत हसत माझ्याकडे पहात उद्गारले, "लेख ? लेख तर तयारच आहे आणि तो यांच्यापाशीच आहे. आपण मागून घ्या यांच्याकडून !" हे त्यांचे उत्तर ऐकून मी बुचकळ्यात पडलो. श्री. वैद्य यांनी माझ्याकडे पाहिले. म्हणून, शेवटी मी कोल्हटकरांना विचारले, "मजजवळ कोणता लेख आहे आपला, तात्यासाहेब ? मला तर काही आठवत नाही आपण मला लेख देऊन ठेवल्याचे." त्यावर ते अगदी गंभीरपणाने म्हणाले, "आपण थोडा विचार करा म्हणजे आपोआप आठवेल आपल्याला, गजाननराव !"—"नाही, मला तर काही आठवत नाही. आपण काही पाठवलेच नाही माझ्याकडे, तर आठवणार कसे ?" मी किंचित् नाराजीनेच उत्तर दिले. त्याबरोबर ते हसून म्हणाले, "मी आठवण देतो आपल्याला. यांनी छापलेल्या माझ्या लेखाचे मी जे तपशीलवार शुद्धिपत्र तयार करून पाठविले होते ना, ते जसेच्या तसे छापा 'नवयुगा'त ! म्हणजे विचाऱ्या वाचकांना एक नवा विनोदी लेख वाचल्याचा आनंद लाभेल !" कोल्हटकरांचे हे उपरोधिक उत्तर ऐकून श्री. वैद्य अगदी खजील झाले; व मुकाट्याने त्यांना नमस्कार करून निघून गेले.

छपाईच्या शुद्धतेवर कोल्हटकरांचा हा जो विलक्षण कटाक्ष होता, त्यामुळे ते केव्हा केव्हा स्वतःला हास्यास्पद करून घेत असत. त्यांच्या कवितांचा 'गीतोपायन' हा संग्रह, १९२२ साली दादर येथे तरुण उत्साही गडकरीभक्तांनी स्थापन केलेल्या 'गोविंदाग्रज मंडळा'ने, प्रसिद्ध केला होता. त्यात काही मुद्रणदोष राहून गेले होते. तेव्हा, कोल्हटकरांनी त्या मंडळाला शुद्धिपत्राच्या चिठ्ठ्या छापावयाला भाग पाडले; व विक्रीसाठी काढलेल्या सर्व प्रतींना त्या त्याच्याकडून चिकटवून घेतल्या. दरम्यान अभिप्रायाच्या आणि भेटीच्या प्रती 'गोविंदाग्रज मंडळा'कडून रवाना झालेल्या होत्या. म्हणून, कोल्हटकरांनी, आपले सगळे स्नेही आणि संपादक यांच्याकडे, शुद्धिपत्राच्या चिठ्ठ्या पाठवल्या; व पुस्तकात त्या चिकटवून घेण्याची विनंती त्यांना केली. श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याकडे जेव्हा ती चिठ्ठी आली, तेव्हा ती मला दाखवून ते म्हणाले, "तुमचे गुरु जुन्या कर्मठ म्हाताऱ्यांसारखे मंत्रचळे आहेत खरोखरी. पुस्तक प्रसिद्ध होऊन ते बाजारात गेल्यावर महिना दीड महिन्याने त्याचे शुद्धिपत्र छापून काढावयाचे आणि ते सगळ्या मित्रांकडे पोस्टाने पाठवावयाचे,

असला अजब खटाटोप त्यांनीच करावा!" नंतर केळकरांनी त्या शुद्धिपत्राची पोच देण्यासाठी मला लगेच कार्ड डिक्टेट केले. त्यात असे म्हटले होते की, "तुमच्या पुस्तकाचे नाव 'गीतोपायन' म्हणजे— 'गीत–उपाय–न' असे आहे. अर्थात् तुमच्या कविता वाचल्याशिवाय उपाय नाही. आणि त्यात आता पुन्हा हे वराती मागून आलेल्या घोड्यासारखे शुद्धिपत्र चिकटवून घ्यावयाचे! कोण चिकटवणार ते! तुमचे शिष्यच कदाचित् ते भक्तिभावाने चिकटवतील, तर चिकटवोत! बाकी तुम्ही पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर दीड दोन महिन्यांनी या शुद्धिपत्राच्या चिठ्ठ्या छापून घेऊन, मुद्रक आणि प्रकाशक यांच्यावर मात्र खासा सूड घेतलात! पण, तुमच्या या कृतीतला उपरोध त्यांना कळला की नाही, कोण जाणे!"

१९३२ च्या ऑगस्टमध्ये कोल्हटकर लेखसंग्रह प्रसिद्ध झाल्यावर कोल्हटकरांच्या या मंत्रचळेपणाचा मलाही त्रास झाला. त्या ग्रंथाची मुंबईहून आलेली ताजी प्रत त्यांच्या हाती देऊन मी त्यांच्या पायांवर डोके ठेवले, तेव्हा तो उत्कृष्ट रीतीने छापलेला ग्रंथ पाहून त्यांना फार आनंद झाला. तथापी तो आनंद फार थोडा वेळ टिकला. आपल्या चिकित्सक स्वभावानुसार, त्या वेळी त्यांचे डोळे अधू झालेले असताना देखील, जाड भिंगांच्या चष्म्यातून त्यांनी तो समग्र ग्रंथ काळजीपूर्वक वाचून काढला. तेव्हा त्यांना सुमारे वीस छपाईच्या चुका त्यात आढळल्या. त्या चुकांचे शुद्धिपत्र त्यांनी तयार केले आणि मी नेहमीप्रमाणे रविवारी दुपारी तीनच्या सुमारास त्यांच्याकडे गेलो असता, ते मला म्हणाले, "गजाननराव, मला कल्पना नव्हती लेखसंग्रहाच्या छपाईत इतक्या चुका असतील अशी!" त्यावरोबर मी चमकून विचारले, "कुणी दाखवल्या चुका आपल्याला छपाईच्या?"–– "कुणी कशाला दाखवावयाला पाहिजेत? मी स्वतःच संपूर्ण ग्रंथ वाचून काढला. एवढे करण्यापुरती नजर शाबूत आहे माझी अजून सुदैवाने! हे पहा, मी शुद्धिपत्रसुद्धा तयार करून ठेवले आहे त्याचे!" त्यांनी मला उत्तर दिले. आणि तो कागद माझ्यापुढे ठेवला. ते शुद्धिपत्र वाचल्यावर माझ्या लक्षात आले की, त्यातल्या सात आठ चुका या केवळ काना, मात्रा, वेलांट्या वगैरे उडाल्यामुळे झालेल्या होत्या; व उरलेल्या चुकांत देखील अर्थाच्या दृष्टीने महत्त्वाची अशी एकही चूक नव्हती. ही गोष्ट मी त्यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी मला विचारले, "पण इतक्या तरी चुका का रहाव्यात या ग्रंथात? आपल्याला या चुका क्षुल्लक वाटत असतील, पण मला वाटत नाहीत. साखरभात खाताना वेलदोडचाचा दाणा दाताखाली आला, तर बरे वाटते. पण त्याच्याऐवजी तेवढाच जर खडा आला, तर मात्र अगदी विरस होऊन जातो. छपाईच्या या चुका साखरभातातल्या खड्यांसारख्या आहेत!" तेव्हा मी त्यांना म्हटले, "पण, तात्यासाहेब, साडे आठशे पानांच्या ग्रंथात छपाईच्या पंधरा वीस चुका काही फार नाहीत." त्यावर ते विषादाने उद्गारले, "आपल्याला नसतील फार वाटत, पण मला वाटतात. हे शुद्धिपत्र आपण छापून काढून सर्वांकडे पाठवले, तर निदान पुढील आवृत्ती तरी शुद्ध निघेल!"

पण मी काहीच उत्तर दिले नाही. प्रो. नी. ब. भवाळकर, डॉ. के. ल. दप्तरी, डॉ. वा. वि. मिराशी, प्रो. ना. के. बेहेरे, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ह. ना. नेने प्रभृती जी नागपुरातील विद्वान मंडळी मधून मधून त्यांना भेटावयाला जात, त्यांच्याजवळ ते या चुकांबद्दल तक्रार करीत. पुढे एक दिवस प्रो. बेहेरे माझ्याकडे काही कामानिमित्त आले असता मला म्हणाले, "काय गजाननराव, तुम्ही एवढ्या देणग्या गोळा करून आणि इतकी मेहनत घेऊन आपल्या गुरूंचा ग्रंथसाहेब प्रसिद्ध केलात, पण ते तर सारख्या येणाऱ्या जाणाऱ्या जवळ कागाळ्या करीत असतात तुमच्याविरुद्ध! हे शोभते का तात्यासाहेबांना? तुम्ही म्हणत का नाही त्यांना याबद्दल?" त्यावर मी प्रो. बेहेरे यांना विचारले, "मी काय म्हणू त्यांना? त्यांचा आग्रह, मी ते शुद्धिपत्र छापून काढून सगळ्या देणगीदारांकडे पाठवावे, असा आहे. ते काही मी मान्य केले नाही. त्यामुळे हा राग झालेला आहे त्यांचा माझ्यावर. तो निमूटपणाने सोसणे भाग आहे मला!"

* *

मुद्रणदोषांपेक्षासुद्धा भाषादोषांच्या बाबतीत कोल्हटकर अधिक चिकित्सक आणि अतिशयच काटेकोर होते. माझ्या चिपळूणकरांवरील निबंधात

'एकमेव लेखक' असा शब्दप्रयोग मी केलेला होता. निबंध तपासताना ते 'एकमेव' या शब्दावर अडले आणि मला त्यांनी विचारले, "आपल्याला संस्कृत चांगले येते ना ? मग हा 'एकमेव' शब्द कसा वापरलात इथे आपण ? 'एकं एव' असा हा मूळात नपुंसकलिंगी संस्कृत शब्द आहे. म्हणून 'लेखक' या पुल्लिंगी शब्दाला तो लावणे बरोबर नाही. शुद्ध शब्द 'एक एव' असा होईल. 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' हे ठीक आहे. पण 'एकमेव लेखक' हे मात्र चूक आहे. आपण तरी अशा चुका करता कामा नयेत." व्याकरणाच्या दृष्टीने कोल्हटकरांचे म्हणणे योग्य होते. पण, मी त्यांना म्हटले, "एकमेव हा प्रयोग व्याकरणाच्या दृष्टीने सदोष आहे, ही गोष्ट खरी. पण मराठीत तो रूढ झालेला आहे ना ?"--"असेल. पौर्वात्य, दास्यत्व, साम्यत्व, प्रस्थापित यासारखे अत्यंत सदोष शब्द आगरकर, टिळक, खाडिलकर यांच्यासारख्या लेखकांनीही वापरलेले आहेत. पण म्हणून काय ते योग्य ठरतात का ? आपण तरी असे सदोष शब्द टाळले पाहिजेत. या वयात जर भाषा शुद्ध लिहिण्याची खबरदारी घेतली नाही, तर पुढे शुद्धाशुद्धतेची चाड अजिवात राहाणार नाही !"—ते मला कळकळीने म्हणाले. तरी देखील, 'एकमेव' हा शब्द मी काही वदलला नाही आणि वापरण्याचेही सोडून दिले नाही, हा भाग निराळा !

तथापि, भाषा आणि मुद्रण यांच्या शुद्धतेच्या बाबतीतील कोल्हटकरांच्या या काटेकोरपणाचा माझ्यावर अत्यंत इष्ट परिणाम झाला. माझ्या मनाला, व्यासंगाला, विचारसरणीला, लेखनाला आणि जीवनालाही जी एक प्रकारची शिस्त त्या सुरवातीच्या काळातच लागली, ती केवळ त्यांच्या या बेसुमार चिकित्सकपणामुळेच ! त्यांचे असले सगळे दोष हे, माझ्या समजुतीने, गुणातिरेकजन्य होते. त्यामुळे त्यांच्यापासून होणारा अशा प्रकारचा त्रास मला नेहमी शिक्षणप्रद वाटत असे. केव्हा केव्हा तर सुखप्रदही !

* *

श्री. मामासाहेब वरेरकर यांच्यापासून तो श्री. चिंतामणराव कोल्हटकर यांच्यापर्यंत कोल्हटकरांशी संबंध आलेल्या अनेक व्यक्तींनी त्यांच्या खाण्यापिण्याविषयी रसभरित आख्यायिका प्रसिद्ध केलेल्या आहेत; व त्यांचे एक शिष्य श्री. का. ना. पटवर्धन यांनीही आपल्या 'नाटक्याचे तारे' या विनोदी पुस्तकातील 'नाटचगुरु' या प्रकरणात त्यांच्या खाद्यलोलुपतेची पर्यायाने कुचाळी केलेली आहे. त्यावरून असा ग्रह होतो की, कोल्हटकर हे खवय्ये होते. पण तो बरोबर नाही. साहित्य आणि संगीत यांच्या बाबतीतील रसिकतेइतकीच कोल्हटकरांची खाद्यपेयांच्या बाबतीतील रसिकताही काटेकोर आणि चोखंदळ होती. मुंबईच्या पाठारे प्रभु, दैवज्ञ ब्राम्हण इत्यादि स्थानिक समाजात 'तेलपोळी' हा प्रकार लोकप्रिय आहे. इतका की, गिरगावात या पोळचा तयार करून विकणारे एक दुकान असून, त्याला बाहेर गावच्यादेखील ऑर्डरी येतात. पुरणाची पोळी आणि मांडा या दोन प्रकारांचे मिश्रण करून हा पोळीचा प्रकार बनवलेला असावा, असे मला वाटते. माडखोलकर हे मुंबईतील पाठारे प्रभु समाजाचे उपाध्याय असल्या कारणाने, त्यांच्या निकट संबंधामुळे ही पोळी आम्हालाही फार आवडत असे. कोल्हटकरांजवळ मी सहज एकदा या तिची तारीफ केली. तेव्हा त्यांनी तिची चव घेण्याची इच्छा दर्शविली. म्हणून मी त्यांना आमच्या घरी बोलावले. अगदी ताजी गरम तेल पोळी त्यांना वाढण्यात आली. तुपावर परतून किंवा दुधात कुस्करून ती खाण्याची पद्धत आहे. पण कोल्हटकरांना काही ती आवडली नाही. त्यांनी पानात वाढलेली अर्धी पोळी जेमतेम कशी बशी संपविली. मी जेव्हा त्यांना नंतर विचारले, तेव्हा ते म्हणाले, "तशी ती पोळी खुसखुशीत आणि खमंग वाटली मला. पण, गव्हाचा पदार्थ तुपातला जितका चांगला लागतो, तितका तेलातला चांगला लागत नाही. गहू हा तूप किंवा दूध यांच्यावरोबरच खाल्ला पाहिजे. त्याचा तेलाचा गोड पदार्थ तर कसासाच वाटतो !" त्यांचा हा 'तेलपोळी' विषयीचा अभिप्राय मला मार्मिक आणि योग्य वाटला.

कोल्हटकरांच्या चोखंदळपणाचे माझ्या पहाण्यातले आणखी दोन प्रसंग देण्यासारखे आहेत. १९२४ च्या मे महिन्यात, गंधर्व नाटक मंडळीचा मुक्काम पुणे येथे असताना, त्यांना मेजवानी देण्यात आली. तात्यासाहेब केळकर, वीर वामनराव जोशी, नारायणराव वामणगावकर प्रभृती मंडळी पंक्तीला होती. वासुंदीचा बेत होता; व स्वत: श्री. बालगंधर्व आग्रह करीत होते. त्यांनी विचारले, "कशी काय झाली आहे

वासुंदी ?" तेव्हा सर्वांनीच संतोषाने माना डोलावल्या. पण कोल्हटकर मात्र काही बोलले नाहीत. म्हणून, बालगंधर्वांनी त्यांना विचारले, "काय तात्यासाहेब, वासुंदी आवडलेली दिसत नाही आपल्याला ?" त्याबरोबर कोल्हटकर हसून उद्‌गारले, "वा ! आवडली ना. चांगली झाली आहे." पण या त्यांच्या उत्तराने काही बालगंधर्वांचे समाधान झाले नाही आणि त्यांनी विचारले, "तात्यासाहेब, आपल्या आवडीचा पदार्थ म्हणून आम्ही वासुंदी केली मुद्दाम आज. पण आपण काही पुन्हा वाढू दिली नाही ती. असे का ? काही चुकले का आमचे ?" त्यावर कोल्हटकर म्हणाले, "तशी चांगलीच झाली आहे वासुंदी, नारायणराव. पण तिला किंचित् आंबुसपणा आल्यासारखा वाटतो. कदाचित् बेदाणे जास्त पडले असतील किंवा आदल्या दिवशी वासुंदी कढवतानाच ते घालण्यात आले असतील. त्यामुळे चवीत फरक पडला आहे थोडा !" बालगंधर्वांनी तावडतोब चौकशी केली. तेव्हा आचाऱ्याने आदल्या दिवशीच वासुंदीत बेदाणे घातल्याचे कबूल केले.

असाच प्रकार १९२८ च्या मे मध्ये, त्यांचा मुक्काम नागपूर येथे रा. ब. मुंजे यांच्याकडे असताना, घडला. त्या दिवशी हरिभाऊंनी कोल्हटकरांबरोबर आपल्या काही मित्रांना जेवावयाला बोलावले होते. पानावर बसताना ते त्यांना म्हणाले, "तात्यासाहेब, आज आपल्या आवडीचा पदार्थ आहे बरे का. मुंबईहून मुद्दाम मागवलेल्या हापूसच्या आंब्यांचा रस आहे हा !" तेव्हा, कोल्हटकर ताटातल्या चांदीच्या द्रोणाकडे पाहून उद्‌गारले, "असे का ? रसाचा रंग तर छान आहे." पुढे रसाचे दोन तीन घोट घेतल्यावर त्यांनी हरिभाऊंना विचारले, "खरेच का हा रस हापूसचा आहे, हरिभाऊ ?"—"हो, हो. का ? आपल्याला काही शंका आहे का ?"—रावबहादुरांनी त्यांना प्रतिप्रश्न केला. त्यावर ते हसून म्हणाले, "तशी शंका नाही म्हणा. पण, मला वाटते, रसात थोडी भेसळ असावी. कारण, स्वाद आणि रुची यांच्यात फरक वाटला." रावबहादुरांनी लगेच आपल्या दिवाणजींना बोलावून विचारले, "का हो, हा रस हापूसचा आहे ना ?" दिवाणजींनी अदबीने त्यांना उत्तर दिले, "हो, साहेब. पण, रस कमी पडेल, असे वाटल्यामुळे थोडे पायरीचे आंबे घ्यावे लागले." दिवाणजी असा खुलासा करून गेल्यावर श्री. अण्णासाहेब कोल्हटकर यांनी त्याना विचारले, "का रे तात्या, आमच्या कुणाच्याही लक्षात या रसात पायरीच्या आंब्याची भेसळ आहे, हे काही आले नाही. आम्हाला तर रस उत्तम वाटला. आणि तुझ्याच कसा रे, हा फरक नेमका लक्षात आला ?" तेव्हा कोल्हटकर हसून त्यांना म्हणाले, "अरे, हाच तर फरक आहे अण्णा, तुमच्यात आणि माझ्यात. म्हणून हरिभाऊ सतार किंवा पेटी वाजवीत असले, म्हणजे मला त्यांना सारख्या सूचना कराव्या लागतात. गाण्यावजावण्यात जे सुराला महत्त्व, तेच खाण्यापिण्यात चवीला महत्त्व ! बेसूर गाणे आणि बेचव अन्न ही दोन्ही मला चालत नाहीत. केवळ कानाला गोड लागते म्हणून गाणे जसे उत्तम ठरत नाही, तसेच जिभेला गोड लागते म्हणून अन्नही उत्तम ठरत नाही !"

खाद्यपेयांच्या रसिकतेच्या बाबतीत कोल्हटकर जितके चोखंदळ होते, तितकाच त्यांचा अनुभवही विविध होता. त्याचे श्रेय ते आपल्या संसारदक्ष पत्नी श्री. रमाबाई ऊर्फ माई यांना देत असत. त्यांच्या सुग्रणपणामुळेच आपण खाण्यापिण्याच्या बाबतीत इतके चोखंदळ आणि चोचलेखोर झालो आहोत, असे ते म्हणावयाचे. 'पांडुतात्यांची निर्जळी एकादशी' या विनोदी लेखात त्यांनी जे फराळाच्या नाना प्रकारच्या पदार्थांचे तपशीलवार वर्णन केलेले आहे, ते वाचताना एकनाथमहाराजांच्या 'रुक्मिणी-स्वयंवरा'तील पक्वान्नांच्या वर्णनांची आठवण होते. त्याबद्दल मी त्यांना एकदा विचारले, "तात्यासाहेब, मी सुद्धा जुन्या कुटुंबात जन्मलेलो आहे. आमच्या घरी सोमवार, गुरुवार, शनिवार, संकष्टी चतुर्थी, एकादश्या इत्यादी सगळे उपास सारखे चालू असतात आणि त्यामुळे फराळाचे पदार्थही नेहमी तयार होत असतात. पण आपल्या या विनोदी लेखात अशा अनेक पदार्थांची माहिती आहे की, ज्यांची चव मी अद्याप घेतलेली नाही. आपण कुठून गोळा केलीत, ही सगळी माहिती ?" त्यावर ते हसून मला म्हणाले, "आपण एकदा खामगावला आमच्या घरी दहा पंधरा दिवस राहाण्याच्या बेताने या. म्हणजे आपल्याला कळेल आमचे घर हे 'रॉयल हिंदु हॉटेल' असल्याचे ! माझ्या कुटुंबाइतकी सुग्रण स्त्री मी तरी अद्याप पाहिलेली नाही. ती खरोखुरी अन्नपूर्णा आहे. 'भोज्येषु माता' हे वर्णन तिला

उत्तम रीतीने लागू पडते. तिला बनवता येत नाही, असा एकही पदार्थ नसेल. कर्व्यांनी बायकांसाठी स्वतंत्र युनिव्हर्सिटी काढल्यावर मी तिला एकदा गमतीने म्हटले, "त्या युनिव्हर्सिटीत तुला पाकशास्त्राची प्रोफेसर नेमण्याची शिफारस मी अण्णासाहेबांना करतो!" 'निर्जळी एकादशी' या लेखात वर्णन केलेले सगळे पदार्थ मी आमच्या घरीच खाल्लेले आहेत. उपास ती करते आणि फराळाचे मात्र आम्ही सगळे खातो, अशी पद्धत आहे आमच्या घरची! माझ्या 'निर्जळी एकादशी' या लेखाची सामुग्री आमच्या घरातच मिळाली मला सगळी!"

अन्नसेवन हा सुद्धा एक रसास्वादाचाच प्रकार आहे, अशी कोल्हटकरांची भावना होती. ते केव्हा केव्हा असे म्हणत असत की, "आपल्या साहित्यशास्त्रात 'रसा'पासून 'चर्वणे'पर्यंत जे अनेक पारिभाषिक शब्द योजलेले आहेत, ते सर्व अन्नसेवनाच्या प्रक्रियेवरून सुचलेले दिसतात. पाश्चात्य साहित्यशास्त्राची परिभाषा अशा प्रकारची नाही. आपल्याकडे साहित्यापासून होणाऱ्या आनंदाच्या उपभोगालाही 'आस्वाद' किंवा 'आस्वादन' हे शब्द सर्वत्र योजलेले आहेत. साहित्यातील करुण रसापासून होणाऱ्या आनंदाची मीमांसा करताना अरिस्टॉटलने 'कॅथार्सिस'ची उपपत्ती प्रतिपादन केलेली आहे. पण, पाश्चात्य साहित्यकोविदांनी त्या ग्रीक शब्दाच्या 'पर्गेशन' म्हणजे 'रेचन,' या मूलार्थासाठी, 'मनोरेचन', 'मन:शुद्धि', 'अंत:शुद्धि' इत्यादि पर्याय योजून, त्या उपपत्तिमुळे मनात उत्पन्न होणारी जुगुप्सा त्यातल्या त्यात कमी करून टाकली. पण, कलाकृतीची निर्मिती आणि तिचा आस्वाद या दोहोंपासून निर्मात्याला आणि रसिकाला जो आनंद होतो, त्याच्या विशुद्धतेला, सुंदरतेला आणि उदात्ततेला यत्किंचितही अपकर्षक होईल, अशी कोणतीही उपपत्ती, उपमा किंवा परिभाषा आपल्या साहित्यशास्त्रात वापरलेली दिसणार नाही. काव्यास्वादाला, ब्रम्हास्वादाप्रमाणे, रत्यास्वादाचीही उपमा काही आलंकारिकांनी दिलेली आहे. पण, रत्यास्वादानंतर जी ग्लानी किंवा जो निर्वेद येतो, तेथपर्यंत ती उपमा काही त्यांनी ताणलेली नाही. माणूस आणि इतर प्राणी यांच्या शारीरिक क्रिया आणि त्यांना प्रेरक होणारे मनोधर्म मूलतः सारखेच आहेत. म्हणूनच, साहित्य-संगीत-कला-विहीनाला पशु म्हटलेले आहे. ही गोष्ट ध्यानात घेऊन, आपल्याकडील आलंकारिकांनी, रसास्वादाला अन्नसेवनाची परिभाषा लागू करताना किंवा त्याला रत्यानंदाची उपमा देताना, सौंदर्यहानी होऊ नये, यावद्दल पराकाष्ठेची काळजी घेतलेली आहे."
अर्थात् खाद्यपेयांच्या बाबतीतील कोल्हटकरांच्या रसिकतेचे वर्णन 'जिव्हालौल्य' या शब्दाने करणे सर्वथैव अयोग्य होईल. उलट, जेवताना एकादा पदार्थ जरी चांगला न झाल्यासारखा त्यांना वाटला, तरी तसे अजिबात न दर्शविता, ते मुकाट्याने जेवीत असत. ग्रंथपरीक्षणाच्या वेळी जसे कोल्हटकरांच्या सूक्ष्म आणि तीक्ष्ण दृष्टीला ग्रंथातले अगदी बारीकसारीक दोष आणि उणिवा दिसत असत, तसेच अन्नसेवनाच्या वेळीही खाण्यापिण्यातले दोष आणि उणिवा त्यांना जाणवत असत. मनाचा विरस करणारी कोणतीही गोष्ट त्यांना कधी सहन झाली नाही. मग ती साहित्यातली असो, संगीतातली असो, आहारातली असो की मुद्रणातली असो! जणू कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये यांनी घ्यावयाचा रसास्वाद हा त्यांनी सारखाच संवेद्य आणि सेवनीय मानलेला होता!

* *

कोल्हटकरांच्या अभिरुचीचा हा विलक्षण चिकित्सकपणा संगीताच्या बाबतीत तर विशेषच अनुभवाला येत असे. १८९६ च्या मे महिन्यात 'वीरतनय' नाटक रंगभूमीवर आले, त्या वेळी त्यांचे वय पंचवीस वर्षांचे होते. किर्लोस्कर नाटक मंडळीचे मालक श्री. भाऊराव कोल्हटकर यांचा लौकिक त्या काळातील अद्वितीय संगीत नट म्हणून अखिल महाराष्ट्रात दुमदुमत होता. त्यामुळे कोल्हटकरांसारख्या नव्या उदयोन्मुख नाटककाराकडून चालींची संथा घेण्याची गरज त्यांना साहजिकच वाटली नाही. पण कोल्हटकरांच्या तोंडून त्या नाटकांतली पदे ऐकल्यावर मात्र भाऊरावांची अशी खात्री झाली की, त्यांच्याकडून संथा घेतल्याशिवाय गत्यंतर नाही. 'आत्मवृत्ता'त भाऊरावांना आपण पदांची संथा कशी दिली आणि आपले संगीतातील नैपुण्य पाहून ते कसे संतुष्ट झाले, याची माहिती आलेली आहे. श्री. गोविंदराव टेंबे यांनी तर, कोल्हटकर हे प्रथम सांगीतिक आणि नंतर साहित्यिक होते, असे त्यांचे वर्णन केलेले असून, मराठी रंगभूमीवर नवीन पद्धतीच्या ललित संगीताचे युग त्यांनीच सुरू केले, असे म्हटलेले आहे.

कोल्हटकर चालींची संथा कशी देतात, हे प्रत्यक्ष पहाण्याचा सुयोग दोन वेळा आला. १९२४ च्या मे महिन्यात श्री. गोविंदराव टेंबे यांनी मुंबईस डॉ. मालेराव यांच्या निवासस्थानी, आपल्या 'पटवर्धन' नाटकातील पदांचे परिष्करण, रचना आणि चाली या दोन्ही बाबतीत, त्यांच्याकडून करवून घेतले. चार पाच दिवस चाललेल्या या कार्यक्रमाचे गोविंदरावांनी आपल्या 'जीवनविहारा'त असे वर्णन केलेले आहे की, "या वेळी माझ्या भाग्याने श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर ८–१० दिवस मुंबईस होते. तेव्हा पदांच्या गुरुलघूंच्या वगैरे तंत्राबाबत व इतर काव्यकला–मंत्रोपदेश त्यांच्यापासून घेण्याचा मी निश्चय केला. त्यांनी उदार मनाने रुकार दिला. मी नित्य त्यांना पदे म्हणून दाखवी व त्यातील तांत्रिक चुका मला ते समजावून देत." १९२२ साली माझा चिपळूणकरांवरील निबंध कोल्हटकरांनी जितका तात्यापंतोजीच्या काटेकोरपणाने तपासला होता, तितक्याच बारकाईने त्यांनी 'पटवर्धन' नाटकातील पदे दुरुस्त करून आणि चालीवर बसवून दिली. श्री. टेंबे यांनी प्रत्येक पद पेटीवर वाजवून दाखवावयाचे आणि कोल्हटकरांनी गेयतेच्या दृष्टीने त्यात दुरुस्त्या सुचवून ते त्यांच्याकडून म्हणवून घ्यावयाचे, असा क्रम रोज तीन चार तास चालत असे.

असाच अनुभव मला श्री. शंकरराव सरनाईक यांच्याही बाबतीत आला. १९२६ सालच्या एप्रिलमध्ये यशवंत संगीत नाटक मंडळीचा मुक्काम वर्धा येथे असताना, त्यांच्या आग्रहाच्या निमंत्रणावरून, आपल्या नाटकांविषयी बोलणे करण्यासाठी कोल्हटकर मंडळीच्या बिऱ्हाडी आले होते; व मलाही त्यांनी नागपूरहून बोलावून घेतले होते. या संधीचा फायदा घेऊन श्री. सरनाईक यांनी आपली गळी तानांची अद्वितीय कला त्याच्याकडून घटवून घेतली. विलक्षण कोमल, तरल आणि सूक्ष्म अशा गळी ताना हे शंकररावांच्या गायकीचे वैशिष्ट्यच होते. त्यामुळे लोकांनी त्यांना 'महाराष्ट्रकोकिळ' ही पदवी दिलेली होती. 'वद जाउ कुणाला शरण', 'किति किति सांगू तुला', 'पुष्पपरागसुगंधित', 'शांत वा हो मानसा', 'प्रेम तुझे नितांत खरे', 'गोजिऱ्या कळ्या फुलांनो', 'अपने दाता की मैं तो दासी बनी' इत्यादी पदांतील आपल्या खास ताना त्यांनी म्हणून दाखवाव्यात व कोल्हटकरांनी, त्यांच्या आवाजीला आणि पद्धतीला अनुकूल अशा रीतीने, नवीन खटके, मुरक्या, हरकती वगैरे सुचवाव्यात, असा क्रम तीन दिवस चालू होता. कोल्हटकरांचा आवाज किनरा पण विलक्षण लवचिक आणि सुरेल होता. त्यामुळे त्यांची संथा श्री. सरनाईक यांना विशेष लाभदायक वाटली असावी. कारण ते शेवटी निरोप देताना कोल्हटकरांना म्हणाले, "शिवराज संगीत मंडळीत आल्यापासून गेल्या सात आठ वर्षांत मी अनेक दर्दी माणसांकडून संथा घेतली. पण, माझी आवाजी आणि तानांची पद्धत ध्यानात घेऊन, मला संथा देणारे मात्र आपणच भेटलात!"

● ●

१९३१ च्या जानेवारीत कोल्हटकर आजारी पडून नागपुरास रहावयाला आल्यापासून तो १९३४च्या एप्रिलमध्ये ते पुण्यास जाईपर्यंत मी त्यांचा अंतेवासी होतो. बुधवार आणि रविवार हे दोन दिवस तर मी त्यांच्याकडे नेमाने जातच असे; पण एरवी देखील सुटीच्या प्रत्येक दिवसाचा जास्तीत जास्त वेळ मी त्यांच्या सान्निध्यात घालवीत असे. पक्षघातामुळे शरीराला आलेली अक्षमता आणि काचबिंदुमुळे दृष्टीला आलेली मंदता या दोन कारणांनी ते या वेळी परावलंबी होऊन गेलेले होते. आम्ही त्यांना केव्हा केव्हा फिरावयालाही घेऊन जात असू. या विकलावस्थेत गतजीवनाच्या स्मृती हाच त्यांचा विरंगुळा होऊन बसलेला होता. त्यामुळे, आम्ही केव्हाही गेलो, म्हणजे नाना प्रकारच्या आठवणी ते सांगत असत. त्यातल्या बऱ्याच आठवणी श्री. गिजरे यांनी लिहून काढून त्यांना दाखवल्या. पण त्या प्रसिद्ध करावयाला काही त्यांनी परवानगी दिली नाही. आम्ही त्यांच्याकडून शिशुकथा लिहून घेतल्या; त्यांच्या नाटकांसंबंधी टिपणे करून घेतली; इतर कोणाहीपेक्षा चिपळूणकरांचा परिणाम त्यांच्यावर जास्त का झाला हे विशद करून घेतले; व त्यांच्या साहित्यजीवनावर परिणाम करणाऱ्या इतरही काही महत्त्वाच्या घटनांची नोंद करून घेतली. ते सांगतील तो मजकूर श्री. गिजरे लिहून घेत असत; व तो सगळा पुन्हा लिहून काढून त्यांना दाखवीत असत. यांपैकी त्यांच्या शिशुकथा त्याच वेळी 'रत्नाकर', 'संजीवनी', 'विहंगम' इत्यादी नियतकालिकांच्या अंकांतून प्रकाशित झाल्या. काही निवडक आठवणी

त्यांच्या निधनानंतर श्री. गिजरे यांनी 'पारिजात' वगैरे मासिकात दिल्या; व त्यांच्या इच्छेनुसार श्री. हिराबाई पेडणेकर यांच्या संबंधीची माहिती मी १९६२ साली 'तरुण भारता'तून द्यावयाला सुरवात केली. ही माहिती संकलित आणि प्रकाशित करण्याची जबाबदारी त्यांनी दोन कारणांमुळे माझ्यावर टाकलेली होती. एक तर, हिराबाईविषयी पुरेशी सूचक माहिती त्यांनी स्वतःच मुळी 'आत्मवृत्ता'त दिलेली होती; व दुसरे, त्यांचा आणि आणि बाईंचा श्री. वि. सी. गुर्जर यांच्यापाशी असलेला पत्रव्यवहार किंवा बाईंच्या हितसंबंधी व्यक्तींनी लिहिलेले त्यांचे चरित्र जर पुढे मागे प्रसिद्ध झाले, तर त्यामुळे आपल्यावर कोणत्याही प्रकारचा मिथ्यारोप किंवा दोषारोप करण्याची संधी मिळू नये, असा त्यांचा उद्देश होता. एरवी, त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयी मी काही बोलू किंवा लिहू नये, असेच ते वारंवार मला सांगत असत. म्हणून अंशतः त्यांचे व्यक्तित्व आणि अंशतः त्यांचे साहित्य यावर ओझरता प्रकाश पाडणाऱ्या या कांही किरकोळ आठवणी मी 'युगवाणी'त दिलेल्या आहेत.

तो पराभव झालाच नाही

प्रा. ना. सी. फडके यांच्या 'माझे जीवन एक कादंबरी' या आत्मचरित्राचे प्रकाशन वास्तविक आचार्य अत्रे यांच्या हस्ते होणार होते. याचा उल्लेख करून प्रा. फडके म्हणाले "मागच्या वर्षी आचार्य अत्रे यांचा वाढदिवस माझ्या अध्यक्षतेखाली झाला. तेव्हा अत्रे गमतीने म्हणाले होते, 'वाढदिवस आमचा पण कौतुक मात्र तुमचे झाले. आता पुढच्या वर्षी तुमच्या वाढदिवसाला मी येतो व उत्तम भाषण करून तुमचा पराभव करतो!' पण आचार्य अत्रे यांच्या दुःखद निधनामुळे तो योग आलाच नाही."

[**प्रा. ना. सी. फडके**--भाषण
आत्मचरित्र प्रकाशन समारंभ.]

*

प्रा. ना. सी. फडके लेखन प्रेरणा

"जीवनात मी अनेकविध प्रकारचे अनुभव घेतले. मोठमोठ्या लेखकांचे ग्रंथ वाचले. क्रिकेटचे सामने, कुस्त्या पाहिल्या, संगीताच्या मैफली ऐकल्या. जे पाहिले, जे वाचले आणि जे अनुभवले, ते ते वाचकांपर्यंत पोचवणे हे माझे कर्तव्य मानून मी लेखन केले. जिच्या वाचनाने वाचकांचा अनुभव समृद्ध होतो; ती कादंबरी मी श्रेष्ठ मानतो. माझी कादंबरी वाचताना माझे अनेकविध अनुभव वाचकांनाही मिळाल्याने त्यांचेही जीवन समृद्ध अनुभवांनी व्यापून त्यांना आनंद मिळावा, हीच लेखनामागील माझी प्रेरणा आहे."

[**माझे जीवन--एक कादंबरी**
आत्मचरित्र प्रकाशन समारंभ].

अनुक्रमणिका

लोकमान्यांचे सन्मान्य सहयोगी

—श्री. काका कालेलकर

[लोकनायक बापूजी अणे यांचा जन्मदिन दि. २९ ऑगस्ट म्हणजे याच महिन्यात येतो. त्या निमित्ताने, श्री. काकासाहेब कालेलकर यांनी १ जुलै १९६९ च्या 'मंगल प्रभात' या हिन्दी नियतकालिकांत प्रसिद्ध केलेला लेख त्यांच्या अनुमतीने 'युगवाणी'च्या वाचकांसाठी अनुवादित करून येथे देत आहोत. —संपादक]

लोकनायक श्री. माधव श्रीहरि अणे महाराष्ट्राच्या श्रेष्ठ नेत्यांपैकी एक होते. जनतेने त्यांना 'लोकनायक' ही पदवी दिली. त्यामागचा इतिहास समजून घेण्यासारखा आहे.

कोणत्याही गृहस्थाला पत्र लिहितेवेळी त्याच्या नावाच्या अगोदर 'बाबू' हा शब्द लिहिण्याचा जसा बंगालमध्ये प्रघात आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्रात कोणा एखाद्याला पत्र लिहायचे झाले तर त्या माणसाच्या नावाच्या अगोदर 'रा. रा.' ही अक्षरे लिहिण्याचा प्रघात होता. 'रा. रा.'चा अर्थ आहे 'राजमान्य राजश्री.' राजभक्तीच्या काळात ही प्रथा सुरू झाली असावी. महाराष्ट्रात जेव्हा इंग्रजांच्या विरुद्ध स्वराज्यासंबंधी आंदोलन सुरू झाले, तेव्हा मग कोणालाही 'राजमान्य' म्हणणे सोपे राहिले नाही. पुढे पुढे तर प्रत्येकच माणसाच्या नावामागे 'दे. भ.' (देशभक्त) अशी अक्षरे लिहिली जाऊ लागली. ही झाली सर्वसामान्य प्रथा. महाराष्ट्राचे पुढारी होते बाळ गंगाधर टिळक. इंग्रजांनी त्यांची रवानगी दीड वर्षासाठी कारागृहात केली, आणि त्यावेळी मग त्यांना 'राजमान्य' म्हणणे अशक्यच होऊन बसले. लोकांनी त्यांना राजमान्याऐवजी 'लोकमान्य' म्हणायला सुरुवात केली. सर्वच लोकांना ही गोष्ट आवडली, आणि मग, पाहता-पाहताच आमचे पुढारी टिळक 'लोकमान्य' झाले. आम्ही सारे बाकीचे साधारण लोक होतो नुसते 'देशभक्त.' प्रत्येकाच्या नावाबरोबर 'लोकमान्य' शब्दाचा प्रयोग करणे म्हणजे त्या शब्दाचा दुरुपयोग करण्यासारखेच झाले असते.

लोकमान्यांच्या नंतर त्यांच्याच एवढे आमच्या आदराला पात्र झालेले दुसरे आमचे पुढारी होते बापूजी अणे. त्यांच्यासाठीही 'लोकमान्य' पदवीसारखीच दुसरी एखादी पदवी आवश्यक होती. तेव्हा लोकांनी त्यांच्यासाठी 'लोकनायक' या पदवीची निवड केली. हा किताब पुढे इतका रूढ होऊन बसला की, 'लोकमान्य' म्हणताच ज्याप्रमाणे टिळकांची जाणीव मनाला होई, तशीच 'लोकनायक' शब्दाचा उच्चार होताच बापूजी अण्यांची मूर्ती डोळ्यापुढे उभी राही.

माणसाच्या नावाशी जोडल्या जाणाऱ्या उपाधी कधी-कधी कशा प्रकारे निर्माण होतात त्याचा इतिहास संग्रहीत केला जावा, आणि टिळकांनंतर बापूजी अण्यांचे स्थान टिळकांइतकेच महत्त्वाचे होते ह्या गोष्टीची जाणीव आजच्या पिढीला व्हावी, एवढ्यासाठीच ह्या साऱ्या गोष्टी मी सांगितल्या.

बापूजी अणे मुळात महाराष्ट्रीय नसून आंध्र प्रदेशातील होते, ही गोष्ट इतर प्रांतातील लोकांना कदाचित् ठाऊक नसेल. आंध्रप्रदेशातील जी अनेक घराणी विदर्भात जाऊन पुरेपूर महाराष्ट्रीय बनून गेली, त्यापैकीच बापूजी अणेही एक. मुळात आंध्राचे रहिवाशी असल्यामुळे बापूजींच्या ठायी महाराष्ट्रीयत्वाचे मान उणे होते असे कोणाही महाराष्ट्रीय

माणसाला कधी वाटलेच नाही. लोकमान्यांनी जे जे कार्य हाती घेतले त्या प्रत्येक कार्याचे पुरेपूर समर्थन दादासाहेब खापड व बापूजी अणे यांनी विदर्भ-नागपूरकडच्या भागात सतत केले. माझ्यावर त्यांच्या जीवनाचा आणि चारित्र्याचा जो प्रभाव पडला, त्याचे रूप तीन प्रकारचे आहे. (१) ते उच्च कोटीचे देशभक्त होते. (२) ते अध्ययनशील आणि चिंतनशील विद्वान गृहस्थ होते. (३) नम्रपणा आणि सरळपणा व त्यांच्या सुगंधाने दळवळणारे चारित्र्य त्यांच्या ठायी होते. त्यांच्याबरोबर चर्चा करीत असताना त्यांच्या व्यक्तित्वातील ही तीन्ही अंगे अगदी पुरेपूर अनुभवास येत असत. निरनिराळ्या विषयांवर अगदी मोकळ्या मनाने चर्चा करण्याचा मला दोन तीन वेळा प्रसंग आला. त्यांपैकी एका प्रसंगाची आठवण तर मी कधीच विसरणे शक्य नाही. मुंबई येथील सरदारगृहात लोकमान्य टिळक मृत्युशय्येवर पडलेले होते. महात्माजींची भेट घेऊन मी लोकमान्यांचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी सरदारगृहात पाऊल ठेवले. आजूबाजूच्या लोकांनी मोठ्या उदार मनाने मला लोकमान्यांच्या खोलीत जाऊ दिले. या दुर्लभ दर्शनाचा लाभ इतर लोकांनाही मिळायला हवा, अशा विचाराने मी त्या खोलीत फार वेळ थांबलो नाही. विद्यार्थीदशेपासूनच मी जेव्हा जेव्हा लोकमान्यांच्या भेटीसाठी गेलो होतो ते सारे प्रसंग मला आठवले. त्या आठवणींची प्रेरणा हृदयात भरून घेऊनच मी खोलीतून बाहेर पडलो. पलीकडच्याच खोलीत महाराष्ट्रातले जवळ जवळ सर्वच पुढारी चिंतातुर अवस्थेत बसलेले होते. पैकी खाडिलकर आणि गंगाधरराव देशपांडे या दोहोंशी माझा संबंध अधिक. पण मी त्यावेळी जाऊन बसलो तो बापूजी अण्यांच्या शेजारी.

त्या दुःखपूर्ण वातावरणातही लोकनायकांनी माझ्याशी गांधींच्या विचारप्रणालीबद्दल आणि अहिंसेच्या राजनैतिक बाजूबद्दल चर्चा केली. त्या चर्चेत ते स्वतःचे विचार अगदी स्पष्ट शब्दात पुढे मांडीत होतेच. पण त्याबरोबरच, गांधींच्याबद्दल त्यांच्या मनात आदर आहे हेही अगदी स्पष्टपणे निदर्शनास आले होते.

दुसराही एक लहान प्रसंग मला आठवतो. पुण्याच्या नवयुवकांसमोर माझे व्याख्यान होते. बापूजी त्या सभेचे अध्यक्ष होते. सनातन धर्माचे आणि सनातन संस्कृतीचे भावी रूप कसे असावे या विषयावर माझे भाषण चालू होते. या संदर्भात मी एक व्याख्या श्रोत्यांपुढे मांडली,—"सनातन धर्म म्हणजे नित्यनूतन !"

या व्याख्येच्या अनुषंगानेच बापूजींनी आपले अध्यक्षीय भाषण केले. माझी व्याख्या त्यांना आवडली की नाही, ते मला कळू शकले नाही. ते म्हणाले, "काकासाहेबांनी सनातनाची जी व्याख्या केली आहे ती 'नित्यनूतन' अशा नवयुवकांसाठी फारच उपयोगाची आहे." एवढ्याच मोजक्या शब्दांत त्यांनी आपल्या मनातला सारा भाव प्रगट केला. माझ्या विचाराचा मान केला आणि त्यावर टीकाही केली.

तीन–चारदा त्यांच्याशी मोकळ्या मनाने चर्चा करण्याची संधी मला मिळाली हे मी वर म्हटले आहे. चर्चा काय झाली, कशाविषयी झाली ते सारे आज काही आठवत नाही, आणि ते सांगायचे हे स्थानही नाही. एका प्रसंगाचा उल्लेख मात्र अवश्य करावासा वाटतो.

स्वराज्यप्राप्तीनंतर बापूजींना राष्ट्रीय सरकारची सेवा करण्याचीही संधी मिळालेली होती. एकदा ते भारत-सरकारचे प्रतिनिधी ह्या नात्याने सिलोनला गेले होते. दक्षिणेकडचे जे किती तरी भारतीय लंकेत जाऊन स्थायिक झालेले होते त्यांना तेथले नागरिकत्वाचे अधिकार हवे होते. काम होते नाजुक. आपले सारे कौशल्य अण्यांनी त्या कामी लावले होते. स्वराज्य मिळाल्यानंतर, इंग्रजांनी निर्माण करून ठेवलेली अव्यवस्थित प्रांतरचना मोडून, लोक-जीवनाला अनुकूल होईल अशा प्रकारची राज्य-निर्मिती नेहरू-सरकारने केली. सारी राज्ये भारताच्या भाषा-प्रदेशांना अनुकूल होतील अशा प्रकारचीच बनविली गेली. स्वराज्याचा मूलभूत सिद्धांत असा आहे की, प्रजासत्ताक राज्यात राज्य-व्यवहार चालायचा तो प्रजेच्या भाषेच्या माध्यमातूनच चालायचा हवा. पण त्यासाठी, एक भाषा बोलणारे सारे लोक एकाच राज्यात अंतर्भूत झाले पाहिजेत हे काही आवश्यक नाही. एकभाषीय प्रदेश जर विस्ताराने फार मोठा असेल तर त्याची दोन किंवा त्यापेक्षाही अधिक अशी राज्ये असू शकतात. विदर्भाचे निराळे राज्य असावे, अशी सूचना बापूजींनी मांडली. श्री. वियाणीचेही मत असेच होते. मी तर तीन महा-

राष्ट्र आणि तीन गुजरात असावे अशी सूचना मांडली होती. भारताचे लहान-लहान असे चाळीस प्रांत असावे असे माझे मत होते. ह्या कारणामुळे आम्ही तिघे जण एकमेकांच्या काहीसे अधिक जवळ आल्यासारखे झालो. महाराष्ट्राच्या अधिकांश लोकांना ही सूचना काही पसंत पडली नाही. ह्या बाबतीत मतभेद होते ह्यात काही नवल नाही. पण काही लोक, मतभेद होताच, दुसरा माणूस म्हणजे जणू काय कोणी आपला शत्रूच असे म्हणून टीका करू लागतात. ज्या धैर्याने आणि उदारतेने एखादा बाप किंवा आजा आपल्या मुलाच्या किंवा नातवाच्या तोंडचे अर्वाच्य शब्द ऐकून घेतो, त्याच, तशाच धैर्याने आणि उदारतेने त्या वेळी महाराष्ट्राच्या ह्या वयोवृद्ध बापूजींनी ती सारी टीका त्या वेळी ऐकून घेतली.

काही का असे ना ? लोकनायक माधव श्रीहरि अण्यांनी स्वराज्य येण्यापूर्वीच्या काळात आणि स्वराज्य मिळाल्या नंतरच्या काळातही देशाची अत्यंत उत्कृष्ट सेवा केली ह्यात शंकाच नाही. लोकमान्य टिळकांच्या आणि त्यांचाच एक आदरणीय सहयोगी असलेल्या ह्या देशभक्ताला आपली श्रद्धांजली अर्पण करणे हे राष्ट्राचे कर्तव्य आहे. आजच्या ह्या पक्षोपक्षांच्या हमरी-तुमरीच्या काळात बापूजी अण्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा विचार ज्यांना सुचला त्यांचे अभिनंदन अवश्य करायला पाहिजे.

अबोल व अखंड ज्ञानसाधनेचा आदर्श

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध विचावंत ग्रंथकार प्रा. द. के. केळकर यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. ते बरेच दिवस रुग्णशय्येवर होते. परंतु त्यांची अबोल व अखंड ज्ञानसाधना चालूच होती. मृत्यूपूर्वी अठ्ठेचाळीस तास आधी त्यांनी आपल्या 'उद्याच्या संस्कृतीचा ध्रुवतारा' या नवीन ग्रंथाच्या हस्तलिखिताचे नामकरण केले.

बींच्या तीन चिंतनिका

—प्रा. भवानीशंकर पंडित
प्रा. भवानीशंकर

बींची प्रतिभा चिंतनशील होती. आध्यात्म हा तिच्या आवडीचा आणि गोडीचा विषय होता. त्यांच्या सतत चिंतनात तिची समाधी लागे. त्या भावसमाधीतून त्यांची बहुतेक कविता उगम पावली आहे. त्यामुळे तिच्यात त्यांच्या भावगर्भ विचारांचे मोठे मनोवेधक प्रतिबिंब उमटले आहे. त्यांची एकूण कविता सोज्ज्वळ असून, तिच्यात जागोजाग उदात्त विचारांची आणि भव्य कल्पनांची पखरण आहे. बींच्या बहुतेक कवितांत चिंतन असले, तरी 'वेडगाणे', 'चाफा' व 'पिंगा' या तीन कवितांत ते अतिशय गहन, गाढ व गूढ आहे. त्यामुळे या कवितांना 'चिंतनिका' हे विशेषण यथार्थ ठरेल. या चिंतनिकांचा आशय गहन, गाढ व गूढ असला, तरी तो अनाकलनीय, दुर्बोध अथवा कूटासारखा निरर्थक नाही. बी या चिंतनिकांना 'गूढ गुंजन' म्हणण्यास तयार नाहीत. ते सांगतात,— "सत्कल्पनांच्या नादाने,...Unconscious दशेत जाण्याच्या अभ्यासाशिवाय भावनांचा उत्कट परिपोष होऊ शकत नाही,.... उच्चप्रतीच्या ओजस्वी कवितेलाही मनाची स्थिती पाहिजे. अशा कवितेत कल्पनेची रम्यता, विचारांची उदात्तता आणि नादमाधुर्याची उत्कटता यांपैकी निदान एक तरी असले म्हणजे मग वाचकाला.... गुंगविण्याला ती समर्थ होते..... काव्य आणि शास्त्र यांत भेद फक्त मार्गाचा आहे. एकाचा मार्ग emotion चा, दुसऱ्याचा reason चा. एखाद्या अधिकारी कवीची जर अशी कविता असेल तर ती अर्थशून्य वडवड किंवा गूढगुंजन आहे असे म्हणण्यास मी तयार नाही."*

बींचे म्हणणे खरे आहे. त्याबद्दल वाद नाही. परंतु सर्वच वाचकांची पातळी सारखी नसते. त्यांनाही या चिंतनिकांचा आस्वाद घ्यावा असे वाटते. त्यासाठी हा रसास्वादनाचा अल्प प्रयत्न आहे.

[१] 'वेडगाणे' ही चिंतनिका प्रथम एकोणिसशे अकराच्या जुलैच्या 'मासिक मनोरंजना'त आली. या चिंतनिकेत कल्पना शक्तीचे-प्रतिभेचे संकेतांच्या साहाय्याने केलेले वर्णन आहे सर्वसाधारण लोक समजतात की, टला ट आणि रीला री जुळवली की, कविता तयार झाली. परंतु तिच्या अलौकिक शक्तीची त्यांना कल्पना नसते. ती अज्ञात शक्ती स्वतः तेजोमय असून, तिच्या ठिकाणी नवीन आणि अद्‌भुत निर्माण करण्याची क्षमता आहे. ती प्रतिभा आपल्या अपूर्व सामर्थ्याने शून्यात म्हणजे आकाशात चौदा भुवनांच्या समूहाच्या घरांची वसाहत निर्माण करते. त्या घरांना चैतन्याची म्हणजे प्रकाशकिरणाच्या अंशांची दारे लावते. त्यांच्या तेजात विश्वाचा हा अजस्र पसारा उजळून निघतो. त्या दारांना ती ग्रहांच्या कक्षेतील लांब आणि वाटोळ्या ताऱ्यांच्या समूहांच्या घट्ट अडसरी घालते. बींच्या या साऱ्याच कल्पना रम्याद्‌भुत आणि भव्योदात्त आहेत.

त्या देदीप्यमान आकाशात या प्रतिभाशक्तीचा अनिरुद्ध संचार आहे. तिथे तिचा तेजात झळकणारा प्रासाद आहे. त्या प्रासादाच्या भोवताली तिचे विलासवन आहे. त्या वनात लावण्याच्या जलाने शिपडलेल्या पाचेच्या वेली वहरल्या आहेत. तिच्या दाराच्या सोनेरी उंबऱ्यावर स्वर्गांगना आपापल्या प्रियतमांसह उभ्या आहेत.

ही प्रतिभादेवी साऱ्या विश्वाची राणी आहे. तिला कुठेही मज्जाव नाही. तारकासमूहाच्या

---

* प्रतिभा १२ जुलै ३५; 'राम गणेश गडकरी'–चिंतामणराव कोल्हटकर. पृ. १३३; [वा. ना. देशपांडे यांना पाठविलेले पत्र]

विमानात बसून ती साऱ्या विश्वाला प्रदक्षिणा घालीत आहे. त्या दिव्य शक्तीला दिशांचे आणि कालाचे बंधन ठाऊक नाही. अंतरिक्षातून तिचा संचार स्वच्छंद चालू असतो.

चंद्र आनंदाने हासत असतो. स्वैर वारा उगाच काही तरी बरळतो. ही प्रतिभाशक्ति सृष्टीच्या त्या नैसर्गिक सुरात आपला सूर मिसळत असते. त्यामुळे त्या सुरांना एक नवा निराळेपणा प्राप्त होतो. ते तेजस्वी व ओजस्वी बनतात.

ही शक्ती कुणाच्याही आधीन नाही. तिची स्वतःवर देखील सत्ता नाही. हिचा सारा वेळ ब्रह्मांडाच्या घडामोडी करण्यात जात असतो.

स्वर्गीचे दिव्य भोग भोगताना त्या देवीला जो अनिर्वचनीय आनंद होत असतो, त्याचे गाणे ती मनातल्यामनात गात असते. सर्वसाधारण माणसाची राठ आणि रुक्ष वैखरी ते आनंदाचे गाणे कसे बरे गाऊ शकेल ?

बींच्या या चिंतनिकेच्या पहिल्या तीन कडव्यात प्रतिभा देवीच्या वैभवाचे व सामर्थ्याचे वर्णन आहे. पण पुढे चवथ्या व पाचव्या कडव्यात स्वतः प्रतिभाच बोलत असल्याचे दाखवले आहे. चवथ्या कडव्यात 'सृष्टि सुरात सुर मी भरी' हा चरण आहे. बींना त्या द्वारे All art is but imitation of nature हा सर्वपरिचित विचार अधिक प्रभावी रीतीने व्यक्त करावयाचा होता की काय, ते कळत नाही. चिंतनिकेचे पालुपद व तिची शेवटची ओळ सर्वसाधारण मनुष्याची अगतिकता व्यक्त करतात. प्रतिभासंपन्न विरळाच. बहुधा सर्वसाधारणच फार. परा, पश्यंति, मध्यमा आणि वैखरी असे वाणीचे चार प्रकार आहेत. वैखरी हा अगदी शेवटचा व खालचा प्रकार. तोच फार करून आढळतो. बी हे अलौकिक प्रतिभेचे. या चिंतनिकेत तिचे दर्शन घडते, परंतु 'कशि वदेल राठ वैखरी ?' हा शेवटी प्रश्न करून त्यांनी आपला स्वाभाविक विनय सूचित केला आहे.

ही चिंतनिका वाचून रे. टिळक अत्यंत प्रसन्न झाले. त्यांनी बींना अनुलक्षून एक गीत लिहिले व ते आक्टोबरच्या 'मनोरंजना'त प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी पुढील शब्दांत बींच्या प्रतिभाशक्तीचा गौरव केला आहे:—

गुं गुं गुं गुं चालू दे ।
विश्व झुलो ह्याच्या नादे !
तूच वसंताची आई
खेळव म्हण त्या अंगाई ।
रसज्ञ होशी
तू मधमाशी ।
विस्मरणाचा मी प्याला !
डुलव ! खुलव ह्या कमलाला !

ही बींची चिंतनिका 'अम्ही काय कुणाचे खातो ? तो राम अम्हांला देतो' या समर्थांच्या गाण्याच्या चालीवर आहे. या गाण्यातील वर्णांचे उच्चार मराठी आहेत. त्यांच्या मात्रा मोजावयाच्या झाल्या, तर मराठी उच्चारानुसार त्या मोजणे आवश्यक आहे. बींनी चिंतनिकेला 'वेडगाणे' म्हटले आहे. कारण ते सांगतात त्याप्रमाणे "कवीला दिसलेले स्वप्न असेच असते की, ते शब्दांनी धरू जाता नीट धरले जात नाही" तेव्हा त्या स्वप्नावरले काव्य इतरे जनांना 'वेडगाणे' वाटल्यास नवल नाही. हे 'गाणे' गाताना बींची 'कल्पनाशक्ती' (Creative Power) पराकाष्ठेला पोचली आहे. शेक्सपियरने ज्या प्रतिभेला 'काव्यदृष्टी' (The poets eye), 'सुखद संभ्रम' (a fine frenzy) आणि 'कल्पकता' (imagination) या निरनिराळ्या नावांनी संबोधिले आहे, त्या 'दिव्य शक्ती'चे बींनीही अनेक कवितांतून स्तुतिस्तोत्र आळविले आहे. त्यांनी आपली ही चिंतनिका सर्वस्वी तिलाच समर्पण केली आहे.*

---

* १. राहे सत्कविकल्पनेत, सवितातेजात, जी दिव्यता. (प्रमीला) फुलांची ओंजळ, भा. १, पृ. १३.

२. गोड इंदूचा आणि पिसाटाचा । सिद्ध आहे संबंध अनादीचा. (निवेदन) पृ. ४०.

(The lunatic, the lover and the poet
Are of imagination all compact)
A mid summer-Night's Dream, V, I.

(पुढे चालू)

या चिंतनिकेत बींनी 'ईश्वरीय प्रतिभे'चे चिंतन केले आहे. तिचे प्रकाशमय सुंदर स्वरूप दृष्टीत पडल्यामुळे त्यांची वृत्ति उल्लसित झाली आहे. आणि अन्तर्बाह्य स्फुरण चढून त्यांचा अन्तरात्मा उन्नत झाला आहे. रात्रीच्या सौन्दर्याचे वीक्षण करून त्यांचे मन तन्मय झाले आहे. ज्या सृष्टिकर्त्याने आपल्या अपार शक्तीने, कौशल्याने व चातुर्याने, जिच्यात असे सहस्त्रावधि रमणीय देखावे आहेत, अशी सृष्टी सहज निर्माण केली, त्याचे ऐश्वर्य व चातुर्य काय असेल या विचाराने त्यांचे मन थक्क झाले आहे. त्या विस्मयाच्या आनंदात त्यांना हे 'वेडगाणे' स्फुरले आहे.

[२] **'चाफा'** ही बींची दुसरी चिंतनिका. ती फेब्रुवारी एकोणिसशे बाराच्या 'मासिक मनोरंजना'त आहे. नंतर ती रेव्हरंड टिळकांनी 'अभिनव काव्य-माले'च्या दुसऱ्या भागात घातली आहे. या दोन्ही ठिकाणी 'अंब्याच्या' हा शब्द अवतरण चिन्हात नाही एखाद्या लोकविश्रुत काव्यातील शब्द विशिष्ट अर्थाने योजण्यात येतात तेव्हा ते अवतरणात असतात. अशा वेळी मूळ काव्यातील संदर्भाच्या छटा त्यात दिसाव्या अशी अपेक्षा असते. बींच्या ही गोष्ट लक्षात आली असावी म्हणून त्यांनी 'फुलांची ओंजळ' प्रसिद्ध केली तेव्हा हा शब्द अवतरण चिन्हात छापला असावा. त्यामागे 'अंबा पिकतो । रस गळतो। कोकणीचा राजा बाई ! झिम्मा खेळतो' या मुलींच्या झिम्मा या खेळातील लोकविश्रुत गीतातील विशिष्ट अर्थच्छटा रसिकांच्या लक्षात याव्या हा हेतु असावा.

'वेडगाण्या' प्रमाणे 'चाफा' हेही गीत आहे. ते वर दिलेल्या झिम्म्याच्या गीताच्या चालीवर आहे. त्या चालीवर ते तालासुरात म्हणता येते. या परंपरागत लोकगीतात यतिभंग, मात्रादोष इत्यादींचा शोध घेणाऱ्यांना उद्देशून ते म्हणतात;—"यतिभंग, मात्रादोष माझ्या हातून निष्काळजीपणाने झाले नाहीत. मला मात्रा मोजता येत नाहीत, मात्रा कळत नाहीत, असे कसे बरे म्हणता येईल ? येवढेच की, दुसऱ्या कशाच्या पेक्षा तरी मी त्यांना जास्त महत्त्व देत नाही.... प्राचीन काळापासून तो आजपर्यंत जी लोकगीते आहेत त्यात ज्याला साधारणतः मात्रा म्हणतात, त्यांचा नियम नसतो. कारण ज्या चालींवर ती गीते म्हटली जातात, त्या चालींप्रमाणे ह्रस्व अक्षर दीर्घ होईल, किंवा दीर्घ अक्षर ह्रस्व होईल.....मात्रांची मर्यादा दोन ते चार पर्यंत कमीजास्त झाल्यास ते गीत अशुद्ध होणार नाही."*

बींनी या गीतात्म चिंतनिकेत 'विषय व इंद्रिये यांच्या संयोगापासून उत्पन्न होणारे भोग सुखरूप भासत असले तरी, दुःखमूलच होत; त्यांना उत्पत्ती व नाश असल्यामुळे ज्ञानी त्यात रमत नाही' हा अध्यात्माचा विषय काव्यमय केला आहे.† त्यांच्या प्रतिभेवर अमृतानुभाव, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इत्यादि अध्यात्मिक वाङ्मयाचा संस्कार आहे. 'डंक्या'त त्यांनी ज्ञानेश्वर व अनुभवामृत यांचा स्पष्ट निर्देश केला आहे. परंतु ही चिंतनिका अगदी स्वतंत्र आहे. बी स्वतः सांगतात,—"कवीचा विशेष व्यासंग कोणत्या ग्रंथावर आहे हे समजले असता त्या अनुरोधाने कवितांची संगती लावता येते. पण, हे नेहमीच खरे नाही. माझ्या मनाचा ओढा अध्यात्मपर जुन्या मराठी कवितेकडे (डफावरील कलगीतुऱ्याच्या

(मागील पानावरून)

३. भौतिक शास्त्रीं वा काव्यीं। कल्पनाच वैभव मिरवी
अभेद मज दोहोत दिसे। कोण शहाणे, कोण पिसे ?
जे जे विश्वी ज्ञेय असे। त्यात कल्पना मात्र वसे
करा कल्पना वजा वरे। म्हणजे बाकी शून्य उरे.
(विचारतरंग) पृ. ७७.

४. वोसंडे दुथडी भरूनि सरिता सत्कल्पना पावन.
(काव्यानंद) पृ. १००.

५. The poet's eye, in a fine frenzy rolling,
Doth glance from heaven to earth, from earth to heaven;
And as imagination bodies forth
The forms of things unknown, the poet's pen
Turns them to shapes, and gives to airy nothing
A local habitation and a name.
—Shakespeare A Midsummer Night's Dream. V, I.

---

* युगवाणी, जानेवारी १९४६

† "ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।
आद्यन्तवन्तः कौन्तेय न तेषु रमते बुधः" गीता ५–२२

भांडणातील भारुडांकडेसुद्धा) आहे, तरीदेखील माझ्या कवितेत कुणी अध्यात्म अथवा वेदान्त स्वतंत्रपणे पाहू नये."* अर्थात् एक स्वतंत्र चिंतनिका या दृष्टीने 'चाफ्या'चा विचार करणे योग्य होईल.

'चाफ्याच्या अर्थासंबंधी समीक्षकांत वेगवेगळी मते आहेत. याला कारण ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, कबीर इत्यादी संतांच्या वाणीप्रमाणे 'चाफ्या'चीभाषा, अटपट व तोकडी आहे. साधारण रसिकांना तिचा आशय एकदम उकलत नाही. 'चाफ्या'च्या अर्था-संबंधी स्वतः बींनी एका ठिकाणी स्पष्टीकरण केले आहे. ते अतिशय महत्त्वाचे आहे. ते म्हणतात,– "निसर्गसिद्ध शुद्ध 'प्रेमभावने'चे निघालेले निःशंक आतुर उद्गार चाफा या कवितेत आहेत. प्रेमीभूत ध्येयविषयाची गाठ पडली असता,–प्राप्ती झाली असता–सबंध देहस्वभाव पालटून निखळ प्रेम हाच एक स्वभाव बनून जातो."† याच कवितेसंबंधी दुसऱ्या एका ठिकाणी ते लिहितात,– "चाफा ही एक रूप-कात्मक कविता आहे. चाफा म्हणजे आत्मा आणि तरुणी म्हणजे जीव होय. जीव कितीही विलासप्रिय आणि व्यापारप्रिय असला, तरी त्याला आपल्या सच्चिदानंदरूपाची ओळख होणारच. हरपलेले श्रेय मिळविण्याकरिता त्याला हुरहुरही लागणारच. चाफा फुली फुलून आला असता–त्याला आत्मप्रसाद झाला असता– 'तेजी दिशा आटून जाणे', आनंदार्णवात सारे जग बुडाल्याचा प्रत्यय येणे साहजिक आहे. केशव-सुताने म्हटले आहे की, 'हृदय आत्म्याला जधी खेळवीते। हृदय आत्म्याला जधी आळविते' त्या-प्रमाणे चाफ्यात 'हृदयाने आत्म्याला खेळविले आहे. हृदयाने आत्म्याला आळविले आहे.'‡

बींच्या या दोन्ही स्पष्टीकरणांचा एकत्र विचार केल्यास 'चाफा' हे निसर्गसिद्ध विशुद्ध प्रेमभावनेवर स्फुरलेले चिंतनपर गीत आहे हे उघड होईल. या गीतात चाफ्याचा उल्लेख असला, तरी तो आरंभा-पासून अंतापर्यंत 'मुखस्तंभ राणा' आहे मात्र त्याची 'राणी' बोलत आहे. बी सांगतात त्याप्रमाणे ती 'निसर्गशुद्ध प्रेमभावनेचे निःशंक आतुर उद्गार' काढीत आहे. ते तिचे आत्मगत भाषण (soliloquy) आहे. ती स्वतःशीच बोलत आहे. बी सांगतात त्या-प्रमाणे 'हृदय आत्म्याला खेळवीत आहे. हृदय आत्म्याला आळवीत आहे.'

गीताची सुरुवात चाफ्याच्या राणीच्या गोड तक्रारीने झाली आहे. चाफा बोलत नाही, चाफा हालचाल करत नाही, मनातल्या मनात खंत करतो, कुढतो, आणि परोपरींनी रिझविले तरी फुलत नाही असे तिच्या तक्रारीचे पालुपद आहे. ते पुन्हा पुन्हा कानांवर पडते. त्यामुळे गीताचा गोडवा दुणावला आहे. बी म्हणतात,—"अशा कविता बहुधा सांके-तिक असतात. संकेत कळल्यावर साध्य शब्दांचा, वस्तूंचा अंतरात्मा कळतो"* सर्व फुलांतला रस चाखणारा भ्रमर चाफ्याला मात्र वर्ज्य समजतो असा चाफ्याच्या बाबतीत संकेत आहे. त्याचा या ठिकाणी बींनी उपयोग केला आहे.

नंतर ती त्याने फुलावे म्हणून आपण योजलेल्या निरनिराळ्या उपायांची माहिती सांगते. ती त्याला घेऊन आंबेवनात गेली, त्याच्या गळ्यात गळा घातला; मैनेबरोबर गोड गळ्यावर रास विलासांची गाणी म्हटली. पण त्याची कळी फुलली नाही. कारण त्याला प्रेमाचे बाह्य प्रदर्शन नको होते. 'आंब्याच्या वनात' म्हणण्याचे कारण झिम्म्याच्या खेळात 'अंबा पिकतो' असा चरण आहे. आंब्याला 'सहकार' असे नाव आहे. 'गळ्यात गळे घातले' मध्ये सहकाराने खेळ-ण्याचा प्रयत्न केला हा भाव आहे. मैनेचा उल्लेख साभिप्राय आहे. वस्तुतः 'आंब्या'चा संबंध कोकिळेशी आहे. पण बी तिचा निर्देश करीत नाहीत. कारण मैनेच्या निर्देशाने 'उनाड प्रेमा'वरील कटाक्ष जसा व्यक्त झाला आहे, तसा तो कोकिळेच्या निर्देशाने झाला नसता. नंतर ती त्याला गंध दरवळत असलेल्या केतकीच्या वनात नेते. आणि नागाबरोबर देहभान विसरलेल्या केतकीकडे अंगुलिनिर्देश करते. गंध-विषयाने उन्मत्त होऊन गाढ आलिंगनात रमलेल्या त्यांच्या त्या बाह्यात्कारी प्रेमात चाफ्याला काही अर्थ वाटत नाही. तेव्हा ती त्याला पशुपक्ष्यांच्या कोला-हलाने गलबललेल्या रानामधील माळावर नेते; तिथे

* प्रतिभा. १२ जुलै, १९३५.

† वासंती, सं- वि. स. सुखठणकर.

‡ वेचलेले क्षण– वा. गो. मायदेव. पृ. ७८.

* प्रतिभा. १४ जुलै १९३५.

ती दोघे हुंबर घालत क्रीडनात रत झालेले पशू पाहतात. पण या आलिंगन क्रीडनादी श्रृंगाराच्या बाह्य चेष्टांचा चाफ्यावर काही परिणाम होत नाही. त्याला शब्दविषय मनोरंजक वाटत नाही. आता तो नदी आणि कडा यांच्या प्रणयलीलेकडे त्याचे लक्ष वेधते. नदीस कडा आपल्या बाहुपाशात कवळण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. परंतु ती निसटून उन्मादाने गर्जना करीत स्वैरविहार करीत आहे. वींनी हे शब्दचित्र अत्यंत भावपूर्ण, प्रसादयुक्त व शृंगारिक पद्धतीने चितारले आहे. त्यात तिच्या उसळत्या चुंबनांच्या वर्षावाचा आणि रस या विषयाचा ध्वनी आहे. परंतु चाफा या वरवरच्या चुंबनविधीला महत्त्व देत नाही. तो आंतरिक प्रेमासाठी आसुसलेला आहे. ती त्याला मोठ्या आशेने व हौशीने विजेचे हात आपल्या हातात धरू पाहणाऱ्या मेघाकडे पाहण्यास सांगते. वीज त्याला झुळकांडी देऊन चटकन् निसटून जाते. आणि जाताजाताना रागाने प्रचंड गडगडाट करते. त्यांच्या या प्रणय चेष्टितात चाफ्याला अंतर्गत प्रेमाचे दर्शन होत नाही. या रूपरंगाचे व प्रणयकेलीचे त्याला कौतुक वाटत नाही. शेवटी ती त्याला लोकलज्जा गुंडाळून कलिकेच्या अंगाला बिलगणारा वारा दाखवते. ते त्यांचे सहवाससुख व स्पर्शसुख चाफ्याला व्यर्थ वाटते.

इतके करूनही जेव्हा चाफ्याची कळी खुलत नाही, तेव्हा ती त्याची राणी त्याच्यामागे लागते. त्याला चिडवते आणि म्हणते,— "अरे! निसर्गातील या जोडप्यांच्या प्रणयचेष्टा पहा. त्या सुचवतात की, तुझ्यासारख्या अबोल राणा आम्हास आवडत नाही." तरी तो चाफा आपला मख्खच्या मख्खच! तेव्हा त्या राणीला राहवले नाही. तिने त्याचे हात आपल्या हातात घेतले. त्याला समोर ओढले. आणि म्हटले,— "आपण उडू, वागडू, नाचू, फुगडचा आणि झिम्मा खेळू" तिने आपला खेळायला आरंभ केला. परंतु चाफा मुळीच हालचाल करीना. तेव्हा तिचा नाइलाज झाला.

वींचे हे चिंतनपर प्रेमगीत आशयाच्या दृष्टीने जितके संपन्न तितकेच कलेच्या दृष्टीने सुंदर आहे. कालिदास उपमेय व उपमान यांतही व्याकरणाचा विचार करतो. केतकी—नाग, नदी—कडा, वीज—मेघ आणि कलिका—वायु या जोडयांची योजना करताना वींनी देखील तसा विचार केला आहे. वींनी या गीतात फुगडी व झिम्मा या खेळांचे उल्लेख केले आहेत. हे खेळ मुलींप्रमाणे मुलेही खेळत याची साक्ष 'कोकणीचा राजा बाई! झिम्मा खेळतो' हा चरण देईल. कृष्ण हा गोपींबरोबर फुगडचा खेळत असे. त्यावरील अनेक अभंग संतसाहित्यात आढळतात. त्यांच्या उल्लेखात वींनी 'बाह्यप्रेम म्हणजे नुसता घडीभरचा खेळ' आहे हे सूचित केले आहे.

सारे उपाय थकल्यावर ती चंपाराणी आपल्या चाफ्याला म्हणाली,—"त्या परमेश्वराने हे विश्वाचे अंगण आपणास आपल्या लग्नाचे आंदण म्हणून अर्पण केले आहे. आपण आपल्या व्यापक आणि विशुद्ध प्रेमाने ते थिटे करू. हे सर्वसामान्य लोकरूप, शब्द, गंध, रस आणि स्पर्श या विषयात वुजवुजणारे किडे आहेत.* त्यांना दर्शन, श्रवण, चुंबन, आलिंगन इत्यादी चेष्टितांत आनंद वाटतो. हे या वरवरच्या शृंगारचेष्टांना लालचावलेले आहेत. पण आपण निसर्गसिद्ध शुद्ध आंतरिक प्रेमाचे उपभोक्ते आहोत. हे लोक बाह्य इंद्रियांच्या सुखाला सर्वस्व मानणारे आहेत. पण आपण आंतरिक प्रेमाचे पुरस्कर्ते आहोत."

हे तिचे उद्गार कानी पडता पडता खंत करीत पाठमोऱ्या बसलेल्या त्या चंपक राजाने मागे वळून पाहिले. तो त्याची आणि तिची दृष्टी परस्परात मिसळून गेल्या, आणि त्यांची गात्रे पांगळून गेली म्हणजे शुद्ध प्रेमाच्या उत्कटतेमुळे ती दोघेजण जागच्या जागी खिळून गेली. मग चाफा आणि त्याची राणी हा भेद राहिलाच नाही. चाफा फुली फुलून येताच आत्मप्रसाद झाला. दिशा तेजामध्ये आटून गेल्या. त्याला सारे जग आनंदार्णवात बुडाल्याचा प्रत्यय आला. वाक्चातुर्य आणि विचारसौन्दर्य यांचा विचार केला, तरी वींचे हे प्रेमगीत अद्वितीय आहे. या चिमुकल्या

* ते आंतर नेणतीच बापुडे। म्हणौनि अगत्या सेवणे घडे। सांघैं पूयपंकिचे कीडे। काइ चिलिसि घेती ॥१२०॥ ज्ञाने. अ. ५

गीतात खंत करणे, गळ्यात गळे मिळवणे, देहभान गळणे, हुंबर घालणे, दीठी दिठ मिळणे, गात्रे पांगुळणे, रोमांच येणे, फुली फुलणे इत्यादी सरस व सुंदर वाक्प्रचार सहजगत्या इतस्तत: विखरलेले आहेत. ' तेजी दिशा आटून गेल्या ' या कल्पनेत नाविन्य आणि सौंदर्य यांचा एकजीव झाला आहे.

वींच्या या विशुद्ध प्रेमगीतप्रमाणे इंग्रजी काव्य-वाङमयात शेलेचे ' लव्हस् फिलॉसॉफी ' म्हणजे ' प्रेमाचे तत्त्वज्ञान ' हे गीत प्रसिद्ध आहे. परंतु शेले त्या प्रेम-गीतात—

' What are all these kissings worth '
If thou kiss not me ?

या भौतिक मर्यादेच्या पलिकडे जात नाही. पण वी ' आपण करू शुद्ध रसपान ' असे म्हणतात, आणि ' कोण मी—चाफा ? कोठे दोघेजण ? ' अशा अद्वया-नंदाच्या स्थितीला जाऊन पोचतात हे विशेष आहे.

वींच्या कवितेचा अभ्यास करताना अभ्यासकाने ' थोड्या खोल पाण्यात शिरावे ' अशी अपेक्षा असेल, तर ज्ञानेश्वरी, एकनाथीभागवत इत्यादी संतसाहित्या-तील ग्रंथांकडे धाव घेणे आवश्यक आहे. चाफ्यात ' दिठींदीठ ' हे शब्द अवतरण चिन्हात आहेत. त्यामुळे त्या कार्याचे महत्त्व वाढले आहे. ' दिठी दीठ जाता मिळून। गात्रे गेली पांगळून ' हे चरण स्फुरताना वींच्या मनात योगशास्त्रातील ' मुद्रा ' असाव्या. विषय-वासनांना आवरावयाचे आणि ' निखळ प्रेमा'ची प्राप्ती करून घ्यावयाची, तर ' योग ' साधला पाहिजे आणि ' विराग ' बाणला पाहिजे. विषयसुखाची जी ' साधने गात्रे, ती पांगळून गेली ' हे सांगण्यात तोच अर्थ अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरीच्या पाचव्या अध्यायात ' एक मुद्रा ' आहे. ती मुद्रा म्हणजे गीतेच्या सत्ता-विसाव्या श्लोकावरील भाष्य आहे; —

तरि वैराग्याचे न आधारें। तिहीं विषय दवडूनि बाहेरे।
शरीरी एकंदरें। केलें मना ॥१५०॥

साहाजें तिहीं संधिसि भेटी। जेथ भ्रूपल्लवा पडे गांठि।
तेथ पाठिमोरी दीठी। पाउखोनिया ॥१५१॥

सांडूनि दक्षिण वाम। प्राणापानसम।
चित्तेंस व्योम। गामिये करिति ॥१५२॥ *

ज्ञानेश्वरीकडे धाव न घेता रसिकाला ' चाफ्या 'चा सुवास घेता येईल. पण त्याला अभ्यासाची जोड दिल्यास तो सुवास मनात अव्याहत दरवळत राहील.

[३] ' पिंगा ' ही वींची तिसरी चिंतनिका. ती मार्च एकोणिसशे तेराच्या ' मासिक मनोरंजना 'त प्रथम प्रसिद्ध झाली. ' चाफा ' आणि ' वेडगाणे ' या चिंतनिका जुन्या लोकगीतांच्या चालीवर आहेत. त्यामुळे त्या म्हणताना त्यांच्यात कमी अधिक मात्रांची भर घालावी लागते किंवा सूट द्यावी लागते. पण ' पिंगा ' ही गीतात्मचिंतनिका मात्रिक जातीत असल्यामुळे ' आनंदी आनंद गडे ' या चालीवर म्हणता येते. तिच्या शब्दात झडपणारी जादू आहे आणि रचनेत सुरेल संगीत आहे. त्यामुळे वी म्हणतात त्या-प्रमाणे " रसिकास तिच्या अर्थाकडे लक्ष देण्यास सवडच सापडत नाही. " ‡

पिंगा हा मुलींचा विवक्षित तऱ्हेने तोंडाने आवाज काढून खेळण्याचा एक खेळ आहे. या खेळात एक मुलगी मध्ये उभी असते. इतर मुली तिच्या भोवती फेर धरून नाचत असतात. थोड्या वेळाने तीही आपल्या मैत्रिणींबरोबर तोंडाने ' पक् पक् पक् फु: ' असा पकवा घालत नाचू लागते. त्यांचा नाच ऐन रंगात आला म्हणजे त्यांना भोवतालच्या स्थितीचे भान राहात नाही. खेळ संपला तरी त्या काही काळ नाचतच राहातात. एखाद्या मनुष्याला तपस्येच्या आनंदमय स्थितीचा अनुभव घ्यावयाचा असेल, तर त्याला आधी ऐहिक उपाधींचा विसर पडला पाहिजे;

---

* ' फुलांच्या ओंजळी 'त वारंवार ' मुद्रां 'चे उल्लेख येतात. ' मुद्रां'चे अनेक प्रकार आहेत.
(१) गे ! निष्कंप, तुला परंतु इकडे,
ही ध्यानमुद्रा जडे. (' दीपज्योतीस ' पृ. ३०)
(२) तुमटताच रव मैनामुखि मुद्रा पडे.
(' ह्यात काय संशय ' पृ. ५७)

‡ प्रतिभा १२ जुलै १९३५.

आणि निःसंग बनून आपल्याच तालात गुंगून स्वच्छंदाने नाचत राहण्याइतकी त्याच्या मनाची स्थिती पाहिजे, हे या चिंतनिकेत बींनी ध्वनित केले आहे. अद्वैतातून प्राप्त झालेले आत्मज्ञान हा या चिंतनिकेचा विषय आहे.

बींना अध्यात्माची आवड होती. 'अध्यात्मा'वर त्यांची एक स्वतंत्र कविता आहे. संतांच्या अध्यात्मिक वाङ्मयावर त्यांचा भर असे. त्यावरून त्यांना कदाचित् 'पिंग्या'ची प्रतिमा स्फुरली असावी. पिंग्यावर एकनाथांचे गीत आहे. त्यात त्यांनी पिंग्याला 'धांगड-धिंगा' म्हटले आहे.* पण बींनी मनाच्या अविकृत स्थितीची प्रतिमा म्हणून त्याची समुचित योजना केली आहे. ती त्यांच्या स्वयंभू प्रतिभेची साक्ष आहे. 'पिंग्या' विषयी ते स्पष्टीकरण करतात;—"ह्या कवितेत 'अहं' या शुद्ध जाणिवेचा आणि कल्पनेच्या अनंत वृत्तींचा खेळ आहे. शुद्ध 'अहं' स्फुरण ते 'मी' आणि विकृत अहंभाव म्हणजे देहभान किंवा द्वैताचे भान हा 'पिंगा' अशी कल्पना या काव्यात केलेली आहे"‡ पिंग्याचे हे गाणे 'प्रकृती' म्हणत आहे. ती मुळात नृत्यनिपुण आहे. तिच्या उदरी अनेक वृत्तींचा जन्म झाला आहे. 'वृत्तीं'च्या रूपांनी एकसारखे नाचत सुटावयाचे हा तिचा स्वभाव आहे. या पिंग्यात प्रकृती, अहंकार, मन, मनाच्या वृत्ती आणि चैतन्ययुक्त देह यांनी भाग घेतला आहे. त्यांचा नाच सतत चालू आहे.

वृत्ती अन्तर्मुख झाल्या म्हणजे 'वृत्ती' आणि 'प्रकृती' हा भेदभाव उरत नाही. मग 'प्रकृती' 'वृत्ती' बरोबर नाचू लागते; आणि त्या सर्व एकत्र मिळून स्वतःच्याच हृदयातला आनंद भ्रमराप्रमाणे लुटू लागतात. त्या सर्वजणींचा मिळून एकत्र नाच चालू असताना त्या एकाकार कशा झाल्या याचे काव्यमय वर्णन बींनी 'प्रकृती'च्या मुखाने केले आहे;—

धुंद नशा भरली नेत्रीं, । जोवन मुसमुसलें गात्रीं
गुरुलघुतेची कृत्रिम ती । पार उडाली मम भ्रांती
मिळून आम्ही सर्वजणी । नाच मांडिला एकपणी
अनेक नेत्रांचे बघणे । अनेक कंठांचे गाणे
अनेक चरणांचे जाणे । अनेक चित्तांचे स्फुरणे
दृष्टी, वाणी, गती, मती । एकच येथुन तेथुन ती
प्रवाह बहुमुख जो होता । वाहे एकमुखे आता

भिन्न भिन्न वृत्ती एकाग्र होऊन आपपर भाव निमाल्यावर 'प्रकृती'च्या नृत्याला 'अद्वया'चा रंग चढला. आता तिचा पिंगा लौकिक राहिला नाही. तो वर गेला आणि स्वर्गाला घेऊन खाली आला. आता तिला आत्मज्ञान झाले. ती सांगते,—

दुर्बळपण पहिले गेले, । क्षुद्रपणातुन मी सुटले
जीर्णबंध सारे तुटले । मी माझी मज सापडले.

'मी माझी मज सापडले' म्हणजे 'आत्मप्रतीति' आली, 'आत्मज्ञान' झाले.

या चिंतनिकेच्या पहिल्या दहा ओळी 'प्रकृती' आणि तिच्यातून उद्भवलेल्या निरनिराळ्या 'वृत्ती' यांच्या जन्यजननीसंबंधास वाहिलेल्या आहेत. पुढील अठ्ठावीस ओळी 'प्रकृती' आणि 'वृत्ती' या एकरूप होऊन त्यांच्यातील द्वैत नाहीसे झाले या विषयास वाहिलेल्या आहेत. नंतर छत्तीस ओळीत 'अद्वैता'चे विवरण आहे. मीच सर्वत्र आहे हाच जिथे भाव आहे किंवहुना मीच ब्रह्मस्वरूप आहे हा जिथे विश्वास आहे, तिथे अद्वैताशिवाय दुसरे काय आहे? या भागाच्या प्रारंभी अहंभाव म्हणजे देहभाव किंवा द्वैताचे भान म्हणजेच पिंगा हा अद्वैतात परिणत झाला हे जुन्या लाक्षणिक प्रतिमांनी स्पष्ट केले आहे. विकृत अहंभावाचा म्हणजे देहभावाचा लोप होऊन त्याची जागा शुद्ध अहंस्फुरणाने म्हणजे 'मी'ने घेताच त्याला अद्वैताचा अनुभव आला;—

विश्वबंधुता एकांगी । न पुरे माझ्या पासंगी;
भूतें मी–मजला नातें– । द्वैत कसे हे संभवते?

---

* पिंगा बाई! पिंगा गे
अवघा धांगडधिंगा गे ॥१॥
सांडोनी संतांची गोडी गे!
कायसा पिंगा जोडी गे! ॥२॥
नको घालू पिंगा गे।
तुम्ही रामरंगी रंगा गे! ॥३॥
एका जनार्दनी पिंगा गे!
कायावाचा गुरुचरणी रंगा गे ॥४॥
एकनाथ गाथा, पृ. ५१

‡ फुलांची ओंजळ, प्रस्तावना, पृ. ३९

मज कसले जाणें येणें ! । भाव अभावाविण असणें.
बुद्बुद हो की कल्लोळ । अर्णवपद माझें अढळ!

जवळजवळ ह्याच शब्दात ज्ञानेश्वरांनी 'शुद्ध अहं'चे स्वरूप स्पष्ट केले आहे; —

हें असो, पवनाचेनि मेळें । जैसें जळीं जळचि लोळे ।
आणिकें म्हणति वेगळे । कल्लोल हे ।। ९९ ।। अ. ५ वा.

अद्वैताची प्रतीति आल्यामुळे आत्म्याला आपल्या विश्वव्यापकत्त्वाची ओळख पटली. तरी त्याची 'शुद्ध अहं' म्हणून जी जाणीव होती ती कायम राहिली. स्वयंपणाची 'शुद्ध' जाणीव ठेवूनदेखील आत्मा विश्वात्मक असू शकतो हे बींनी या ठिकाणी 'दीपकळी'च्या चप्खल दाखल्याने दाखवले आहे; —

काय करूं—पण कसें करूं !
मीपण माझें का विसरूं ?
'दीपकळी गे ! दीप्तीला—।
सोड—' म्हणे का वुध तिजला ?

या गीतात्म चिंतनिकेच्या शेवटच्या आठ ओळी समारोपाच्या स्वरूपाच्या आहेत. पिंगा जो जो अद्वयाच्या रंगात रंगत जातो, तो तो 'प्रकृती'चा आत्मभाव अधिकाधिक विकसत व विस्तारत जातो. आत्मभावाची ओळख पटल्यावर 'द्वैता'चा निरास व्हावयास हवा. परंतु 'प्रकृती'ची मूळ प्रकृती नाहीशी होत नाही. तिची नाचण्याची सवय तशीच राहते. आत्मज्ञान झाले तरी माणसाचे देहधर्म तसेच राहतात.

"या कवितेतील प्रत्येक शब्दाचा व कल्पनेचा सुसंगत अर्थ लावणे कठीण आहे; तथापि, तिच्यातील मध्यवर्ती कल्पना सुगम व हृदयंगम आहे...वेदान्त विषयातील क्लिष्ट परिभाषा व गूढ कल्पना यांची वृत्तबद्ध गुंतावळ प्राकृत मराठी वाचकांना उकलणे कालत्रयीही शक्य नाही." असा या चिंतनिकेवर आचार्य अत्रे यांचा शेरा आहे. तो पुष्कळ प्रमाणात पटणारा आहे. मात्र ही चिंतनिका अर्थ उलगडण्याच्या दृष्टीने किचकट असली, तरी तिला सुसंबद्ध अर्थ आहे; आणि तो जीवनातील एका सत्याचा द्योतक आहे.

ही चिंतनिका अभ्यासिताना 'झपूर्झा' आणि 'सतारीचे बोल' या केशवसुतांच्या चिंतनिकांचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. 'चाफ्या'चा अर्थ विशद करताना स्वत: बी जेथे विनीत भावाने 'दूर कोठे एकला जाउनिया' या केशवसुतांच्या कवितेतील ओळी उद्धृत करतात व 'हरपल्या श्रेया'चा संदर्भ सांगतात, तिथे अभ्यासकाने साम्यस्थले टिपण्यास खरोखर काहीच प्रत्यवाय नाही. केशवसुतांची 'झपूर्झा' आणि बींची 'पिंगा' या दोन्ही चिंतनिका अनुक्रमे 'झिम्मा' व 'पिंगा' या मुलींच्या खेळांवर आधारल्या आहेत; आणि त्या दोन्हींचा शेवट आत्मानंदाने नाचण्यात झाला आहे. मात्र केशवसुतांच्या चिंतनिकेतील 'झिम्या'ची प्रतिमा जुनी असली, तरी तिचा आविष्कार आधुनातन व नूतन आहे. बींची 'पिंग्या'ची प्रतिमा तिच्यात योजलेल्या वेदान्तातील परिभाषेमुळे अधिक जुनी आणि पुराणी झाली आहे. मात्र या दोन्ही चितानिकांचा परस्पराशी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही.

बींच्या 'पिंग्या'त अद्वयाच्या आनंदाचे वर्णन आहे. तसे ते केशवसुतांच्या 'सतारीच्या वोला'त एका ठिकाणी आले आहे. बी जिथे 'विकृत अहं' आणि 'शुद्ध अहं' अशी जुनी परिभाषा वापरतात, तिथे केशवसुत 'विभूति' हा एकच शब्द योजून 'व्यक्ति' हा दुसरा शब्द ध्वनित करतात; आणि अद्वैताचा आनंद मूर्तिमान करतात; —

तों मज गमलें विभूति माझी ।
स्फुरत पसरली विश्वामाजी ।
दिक्कालासहि अतीत झालों ।
उगमीं, विलयीं अनंत उरलों ।
विसरुनि गेलों अखिला भेदां ।
ऐकत असता दिड दा दिड दा ।

खाडिलकरांचे नाटक : ' कीचक वध '

—डॉ. ना. कृ. शनवारे

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर हे थोर देशभक्त होते. ते एक श्रेष्ठ नाटककार होते. लो. टिळकांच्या राजकीय आघाडीवर उभे असलेले शूर सैनिक होते. देशसेवेच्या भावनेने त्यांनी १ सप्टेंबर १८९६ रोजी ' केसरी ' कार्यालयात प्रवेश केला. जनतेला स्वातंत्र्याच्या ध्येयाप्रत मार्गदर्शन करण्याची संधी ' केसरी '-मुळे त्यांना मिळाली. त्यांच्या नाटचप्रवृत्तीला वेगळे वळण लागले. ' केसरी 'शी संबंध आल्यावर लो. टिळकांना पहिला मानाचा मुजरा त्यांनी केला—' कांचनगडची मोहना '.

इ. स. १८९६ ते १९०६ पर्यंत खाडिलकरांची राजकीय तपश्चर्या सुरू होती. काकासाहेब खाडिलकर लोकमान्यांच्या राजकारणाशी–महाराष्ट्राच्या राजकारणाशी एकरूप होत होते.

सन १९०६ हे जणू पुण्याच्या भाग्यस्थानी उजाडले. जहाल आणि मवाळ अशा दोनही पक्षांचे मुख्य ठिकाण आता पुणे झाले होते. वंगभंगातून निघालेल्या स्वदेशी आणि बहिष्कार या चळवळीद्वारा महाराष्ट्राच्या वीरवृत्तीला चालना मिळाली. ' रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ' हा मंत्र गुणगुणला जाऊ लागला.

बहिष्काराची कल्पना खाडिलकरांच्या लढाऊ मनाला अतिशय आवडली. कर्झनशाहीचा जुलूम त्यांना दिसत होता. शत्रूवर प्रहार करावयाला मन आतूर होते. याप्रसंगी सहाजिकच त्यांच्या कविमनापुढे कीचकाचे पात्र उभे राहिले. लेख आणि भाषणे यांच्या सोबत ' कीचकवधा 'चे नाटयास्त्र काकासाहेबांनी याचवेळी मंत्रिले व सरकारवर सोडले.

रूपकात्मक नाटकांची सुरवात

नाटचसृष्टीत राजकारणाने कसा प्रवेश केला हे आपण मागच्या प्रकरणात पाहिले. पण अशा तऱ्हेच्या नाटकांमध्ये आपले पूर्ण मनोगत व्यक्त करणे नाटककारांना कठीण जात असे. नाटकांमध्ये राजकीय घटनांचा उल्लेख होई पण तो पुष्कळसा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असे. राजकीय घटनांकडे आत्मनिष्ठ दृष्टीने पाहता यावे म्हणून खाडिलकरांनी रूपकांच्या स्वरूपाची नाटचसृष्टी मुद्दामच निर्माण केली.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे ' कीचक-वध ' नाटक म्हणजे रूपकात्मक नाटकाचा एक उत्कृष्ट नमुना होय. रूपकाद्वारे रसाबरोबर बोधाचाही अनुभव वाचकांस व प्रेक्षकांस करून देण्याची पद्धत जुनी आहे. मराठीमध्ये संतकवींनी व विशेषत: एकनाथ महाराजांनी वेदांतपर रूपके लिहून धार्मिक संदेश घरोघर पोचविण्याचे कार्य केले.

' प्रबोध–चंद्रोदय ' इ. स. १८५१ हे पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणारे मराठीतील पहिले नाटक रूपकात्मक आहे. अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या कृष्णमिश्र या नाटककाराच्या संस्कृत ' प्रबोध–चंद्रोदया 'चे ते मराठी भाषांतर होय. या रूपकाचे स्वरूप वेदांतपर आहे.

रूपकात्मक नाटक लिहिणे एरागबाळयाचे काम नव्हे. सिद्धहस्त नाटककारच उत्कृष्ट रूपकात्मक नाटक लिहू शकतो. मराठी नाटचसृष्टीच्या सुरवातीच्या काळात म्हणूनच राजकीय अर्थ असलेली रूपकात्मक नाटके फार दिसत नाहीत. काही थोडचा नाटकांचा उल्लेख करता येईल.

विचारसार नाटक ' सन १८५४

देशस्थितीवर रूपकात्मक असे 'चंद्रिका' मासिकात प्रसिद्ध झालेले 'विचारसार नाटक' (स. १८५४) मराठीतील अशा स्वरूपाचे पहिले नाटक म्हणून विशेष महत्त्वाचे म्हणावे लागेल. देशाची वाईट परिस्थिती पाहून नाटककाराला दुःख होत आहे. विचार व सुमती यांच्या आश्रयाने आपल्या देशबांधवांनी स्तुत्य व अनुपम पराक्रम करावा अशी त्यांची इच्छा दिसते.

'संसार-अंतपूरपर्यटन-रूपक' सन १८७१

हेही भारताच्या दुःस्थितीवरचे रूपक नाटक असून यात त्या काळातील देशाच्या अवनतीचे चित्र काही ठिकाणी रूपकात्मक तर काही ठिकाणी प्रत्यक्ष स्वरूपात वर्णन केले आहे. येथे विचार हा भारतवर्षीय ज्ञातीचा पुरुष दाखविलेला असून, दक्षता ही त्याची स्त्री आहे. इतिहास हा वृद्ध सोबती विचाराबरोबर असून चित्ररेखा (म्हणजे नकाशा) ही सखी म्हणून दक्षतेबरोबर आहे. मनोयानात बसून ही सर्व माणसे पर्यटणास निघतात. संभाषणांमधून जगातील वेगवेगळ्या देशांची स्थिती वर्णन केली आहे. शेवटी भारतवर्षिणीचा शोक खालील शब्दांमध्ये मांडला आहे.

'बुडत्ये लवकर धाव प्रभु मी बुडत्ये लवकर धाव,
अपराधी मी खरी परि तुझे पतितपावन नाम.'

'आर्यवसुंधरा' सन १८८२

कृष्णाजी नारायण शास्त्री यांनी लिहिलेले व विनायक मोरेश्वर घामणकर यांनी प्रकाशित केलेले 'आर्यवसुंधरा' (सन १८८३) हेही नाटक असेच रूपकात्मक स्वरूपाचे आहे.

नाटकात राजा श्वेतकेतु वसुंधरा व तिची मुले यांचा छळ कसा करतो हे दाखविले आहे. आर्यवसुंधरा म्हणजे आर्यावर्त देशात एकी नसल्याने त्याची हानी होते असे नाटककाराला सुचवावयाचे आहे.

'लोकमत विजय' सन १८९८

राजकीय परिस्थितीवरील या रूपकात्मक नाटकाचा उल्लेख मागील प्रकरणी आला आहे. ईशप्रसाद, महाराणी, युवराज, राजसत्ता, विचारस्वातंत्र्य, मुद्रणकला, लोकमत शांती, राजनिष्ठा, राष्ट्रजागृती, देशाभिमान, एकतंत्र, अशी रूपात्मक पात्रे इथे उभी करण्यात आली असून त्यांच्या द्वारा देशपरिस्थितीचे दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकमान्य टिळकांवरील रूपके

काही ठिकाणी प्रत्यक्ष तर काही ठिकाणी रूपकांच्या स्वरूपात लो. टिळकांना नाटकात उभे करण्याचा प्रयत्न मराठी नाट्यसृष्टीमध्ये करण्यात आला. "आम्ही स्वतः नाटके करीत नाही, तर नाटकाला विषय करून देतो." हे लोकमान्यांचे म्हणणे खरे ठरले. बळवंतराव या नावाचा आधार घेऊन टिळकांवरील रूपक काही नाटककार मुद्दामच स्पष्ट करतात. इस्माईल युसफ यांनी आपल्या 'तारणोपाय अर्थात स्वदेशी चळवळ' या नाटकात लो. टिळकांचे पात्र बळवंतराव या नावानेच रंगविले आहे.

'दंडधारी' रूपक खूप गाजले (सन १९०७)

दामोदर विश्वनाथ नेवाळकर यांच्या 'दंडधारी' नाटकातील लोकमान्य टिळकांचे रूपक खूप गाजले. लोकमान्यांच्या हाती नेहमी दंड असावयाचा. ते त्यांचे एक महत्त्वाचे वैशिष्टय होते. अर्थात 'दंडधारी' नावातून लोकमान्यांचेच सूचन होत होते.

'दंडधारी' हा नायक आणि 'काकशीर्ष' खलनायक म्हणून नाटकात दाखविले आहेत. लो. टिळक व ना. गोखले यांची रूपके म्हणून ती ओळखली जात-पाहिली जात. 'दंडधारी'च्या नाट्यप्रयोगात दंडधारी व काकशीर्ष हे प्रत्यक्ष लो. टिळक व ना. गोखले यांच्या पोषाखात रंगमंचावर येत.

टिळकांच्या पोषाखात "दंडधारी" रंगभूमीवर आला म्हणजे लोक टाळ्यांचा कडकडाट करीत. या नाटकाचे प्रयोग संपूर्ण महाराष्ट्रात गाजले; पुण्यात ते विशेष गाजले. पुढे कीचक-वध नाटकाबरोबर सरकारने हेही नाटक जप्त केले. जप्त करण्याची कारणे राजकीय होती.

शारदा नाटकातील 'कोदंडा'कडेही काही वर्षांनी सरकार संशयित नजरेने पाहू लागले. 'जो लोककल्याण, साधावया जाण, करी प्राण, त्या सौख्य कैचे.' या कोदंडाच्या पदाला गाण्याला बंदी करण्यात आली.

शारदा नाटकातील कोदंडाची भूमिका लिहिताना आपल्या दृष्टीसमोर टिळक नव्हतेच अशी स्पष्ट कबुली गोविंद बल्लाळ देवल यांनी दिली आहे. पण मराठी नाटकांमधील नव्या रूपक दृष्टीमुळे सरकारची नजर कशी कावरी-बावरी झाली होती याचा हा प्रत्यंतर पुरावाच होता असे म्हणता येईल.

लो. टिळक व मराठी नाटचसृष्टी

लो. टिळकांचा व मराठी रंगभूमीचा संबंध फार जिव्हाळ्याचा होता. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या सुरवातीच्या हस्तपत्रकांवर लो. टिळकांची सही अग्रभागी असे. किर्लोस्कर मंडळीच्या नव्या शाकुंतल नाटकाबद्दल प्रेक्षकांना कुतूहल व आपलेपणा वाटण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तिला टिळकांचा आशीर्वाद होता.

किर्लोस्कर संगीत मंडळीप्रमाणे आर्योद्धारक गद्य नाटक मंडळीचा पण टिळकांनी पुरस्कार केला. टिळक, आगरकर, छत्रे, नामजोशी, बापूसाहेब धारप, माधव व्यंकटेश लेले आदी मंडळींच्या सहाय्याने शंकरराव पाटकर, गोविंदराव देवल व वामनराव भावे यांनी 'आर्योद्धारक' नाटक मंडळीची स्थापना १८८० साली केली. (१)

किर्लोस्कर संगीत मंडळीची गरज लक्षात घेऊन लो. टिळकांनी त्यांच्या लॉ क्लासातील विद्यार्थी– नारायण दत्तात्रय ऊर्फ नानासाहेब जोगळेकर यांना कंपनीच्या विन्हाडी पाठविले. नारायण श्रीपाद राजहंस (बालगंधर्व) यांचा किर्लोस्कर संगीत मंडळीत प्रवेश टिळकांमुळेच शक्य झाला. नारायणाचे मामा–दत्तात्रय अप्पाजी बेलापूरकर–नारायणाच्या नाटक कंपनीत जाण्याच्या विरुद्ध होते. लो. टिळकांनी त्यावेळी मामांना वचन दिले–'मुलाचे यत्किंचित नुकसान झाले तर मी माझ्या पदरचे वीस हजार रुपये भरून देईन.'

याच किर्लोस्कर मंडळीच्या संकटकाली ती मंडळी कलकत्त्याला जावयाला निघाली असता तिथल्या 'अमृतबझार पत्रिके'च्या संपादकाला दाखवायला म्हणून लो. टिळकांनी स्वतःच्या सहीचे ओळखपत्र व प्रशस्तीपत्र मुद्दाम लिहून दिले होते.

महाराष्ट्राच्या व देशाच्या पुनरुत्थानात नाटचकलेचे महत्त्व या राष्ट्रपुरुषाने ओळखले होते. आयर्लंडच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या उठावणीला रंगभूमीचे अत्यंत सहाय्य झाले होते. हे त्यांना माहित होते. त्यांनी वाहिलेला देशकार्याचा भार इतका होता की, त्यामुळे नाटके पाहण्याला त्यांना वेळ नसे. पण वेळात वेळ काढून अशा आमंत्रणांचा त्यांनी नेहमीच स्वीकार केला आहे असे दिसून येते.

सन १९०६ नोव्हेंबरमध्ये किर्लोस्करच्या मुंबई मुक्कामात सौभद्र नाटक सुरू असता बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जींना घेऊन लो. टिळक थिएटरात आले. या दोघांचा प्रवेश झाल्याबरोबर नटांकडले प्रेक्षकांचे लक्ष या दोघा पुढाऱ्यांकडे गेले. थोडयाच वेळात पडदा पडला. कंपनीचे मॅनेजर शंकरराव मुजूमदार रंगभूमीवर उभे राहिले. त्यांनी दोघांचे स्वागत करून त्यांचे आभार मानले आणि कंपनीच्या वतीने सुरेंद्रबाबूंच्या गळयात हार घालावयाची विनंती टिळकांना केली. टिळकांनी हार घातला. सुरेंद्रबाबूंनी छोटेसे भाषण केले; व शेवटी 'वंदेमातरम्'ची गर्जना केली. सर्व थिएटर या घोषणेने हालले. दोघेही पुढारी नंतर निघून गेले.

मराठी नाटचसृष्टीतील कित्येक नाटचकृती नाटककारांनी अत्यंत आदरभावाने बाळ गंगाधर टिळक यांना अर्पण केल्या आहेत.

लो. टिळक किर्लोस्कर नाटक मंडळीच्या प्रयोगाला एखादेवेळी जात आणि पाटणकर मंडळीच्या "कर्कशादमन" नाटचप्रयोगाचे निमंत्रण आले त्यावेळी त्यांनी त्यालाही नाही म्हटले नाही.

खाडिलकरांची नाटके लो. टिळक आवर्जून बघत. त्यांच्या तुरुंगवासाच्या काळात खाडिलकरांनी लिहिलेली नाटके त्यांनी सुटून आल्यावर मुद्दाम पाहिली.

विलायतच्या प्रवासाची घाई असताही त्यांनी 'बलवंत'चा 'पुण्यप्रभाव' नाटकाचा प्रयोग पाहिला. मरणापूर्वी काहीच दिवस ना. रा. बामणगावकर यांच्या 'आत्मतेज' नाटकाच्या पुण्यातील प्रयोगाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

टिळकांच्या अपेक्षा

मराठी साहित्यिकांकडून लोकमान्यांच्या काही अपेक्षा होत्या. भाषेची व साहित्याची वृद्धी कशी होईल याबद्दल त्यांची काही निश्चित मते होती.

अनुक्रमणिका

दत्तात्रेय परशराम चिंचाळकर; बी. ए., एल्एल्. बी. वकील; अमळनेर आपल्या एका आठवणीत सांगतात की, मेळेकरांच्या वाड्यात भरलेल्या ग्रंथकारांच्या संमेलनाला लो. टिळक हजर होते. अध्यक्ष रावसाहेब कानिटकर–पेन्शनर, सबजज्ज व इतर सरकारी व पेन्शनर ग्रंथकार मंडळी उपस्थित होती. संमेलनात टिळकांचे भाषण झाले. राजकारण वगळून केवळ साहित्यसेवेसंबंधी बोला अशी सूचना अगोदरच झाली असावी. टिळक आपल्या भाषणात म्हणाले:

"राजकारणाशी काही एक संबंध न येता साहित्य-सेवेबद्दल सांगितले पाहिजे अशी अट घालणे म्हणजे भाजीत तिखट व मीठ हे पदार्थ घालण्याची मात्र मनाई करून ती भाजी चांगली चवदार झाली पाहिजे असे सांगण्याप्रमाणेच आहे. मनुष्याचे अगर राष्ट्राचे कर्तव्य-क्षेत्र व व्याप ज्या मानाने वाढेल त्या मानानेच त्या राष्ट्राच्या भाषेचीही अभिवृद्धी होत असते. देशाचा राजकीय व्याप वाढेल तर त्या बरोबर भाषेची प्रगतीही वाढेल. केवळ कृत्रिम राजाश्रयाने भाषेची खरी अभिवृद्धी होऊ शकत नाही. आपल्या बांधवास कळ-विण्यासारखा देशाचा, हिताचा असा काहीतरी संदेश जर आपल्या हृदयात असेल व त्याबद्दल आपणास अतिशय तळमळ उत्पन्न झालेली असेल तर त्याचवेळी खरी भाषा निर्माण होते व ती वाढत जाते" (२)

मंडालेच्या तुरुंगातून आल्यावर बालगंधर्वांच्या विनंतीला मान देऊन लो. टिळक "विद्याहरण" नाटक पहावयाला गेले. पूर्ण नाटक पाहिल्यावर ते म्हणाले :

"आमच्या कृष्णाजीपंतांनी अशीच नाटके लिहिली तर हल्लीच्या परिस्थितीला त्यांचा विशेष उपयोग होणार आहे. जर्मनीमध्ये तर काही एका विशिष्ट हेतूनेच हल्ली नाटके लिहिली जातात व करमणुकी-बरोबर राष्ट्रास योग्य असे शिक्षण देण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो. आमच्या व्याख्यानास जसे ठराविक लोक येतात तसाच तुमच्या नाटकाचाही ठराविक प्रेक्षक वर्ग आहे. म्हणून ज्ञान देण्याचे बाबतीत उपेक्षा होता कामा नये." (३)

कृष्णाजीपंत खाडिलकरांप्रमाणेच लो. टिळकांना माधवराव पाटणकरही आपलेच वाटत. खाडिलकरांच्या नाटकांप्रमाणे पाटणकरांच्याही नाटकांचा एक वेगळा वर्ग आहे याची त्यांना जाण होती व त्या वर्गावर संस्कार करण्याचे कार्य पाटणकर करीत होते.

खुद्द माधवराव पाटणकरांना लो. टिळकांबद्दल विलक्षण आदर होता. भीमराव खंडेराव कोरान्ने एक आठवण सांगतात :

"माधवराव लो. टिळकांचे एकनिष्ठ भक्त होते. केशवजी नाईकाचे चाळीत लोकमान्यांच्या एका व्याख्यानास ते उपस्थित असता व्याख्यानानंतर लगेच उठून त्यांनी लोकमान्यांच्या अलोट देशभक्तीची, विल-क्षण स्वार्थ त्यागाची मुक्तकंठाने स्तुती करून टिळकांचे स्मारक जिवंतपणीच करण्यात खरे वैशिष्ट्य आहे, तशीच त्यांची योग्यता आहे अशी घोषणा करून स्मारकाकरता आपले हातातील सलकडी त्यांनी टेबलावर काढून ठेवली." (कै. माधवराव नारायण पाटणकर व त्यांच्या काही आठवणी; समीक्षक; एप्रिल १९४४)

"वंगभंग प्रकोप" अथवा "दिव्य अरुणोदय" या नाटकाचा आराखडा घेऊन कृष्णाजी लक्ष्मण सोमण ऊर्फ "किरात" लो. टिळकांकडे गेले तेव्हा नाटकातील नायक व नायिका यांच्या स्वभावाची देशहितकारक रूपरेषा ऐकताच–"जा. वेलाशक नाटक लिहा. यापेक्षा जास्त ऐकण्याची काही जरूर नाही." असे लो. टिळ-कांनी म्हटल्याचा उल्लेख मागे आलाच आहे.

नाट्य–सृष्टीवर पडलेला प्रभाव

लो. टिळकांच्या व्यक्तित्वाचा व त्यांच्या राज-कारणाचा फार मोठा प्रभाव मराठी नाट्यसृष्टीवर पडला. सन १९२० पर्यन्तच्या काळात मराठी नाटक मंडळ्यांतील बहुसंख्य नट, त्यांचे व्यवस्थापक व नाटककार राजकीय विचारसरणीच्या बाबतीत टिळक पक्षाचे असत.

मराठी नाट्यसृष्टीत ऐतिहासिक नाटकांची, राजकीय प्रसंगांचे दिग्दर्शन करणाऱ्या नाटकांची व रूपकात्मक नाटकांची वाढ व विकास लो. टिळकांनी उभ्या केलेल्या राजकीय चळवळीमुळे झाला.

किर्लोस्कर नाटक मंडळी व अण्णासाहेब किर्लो-स्कर यांची नाटके पूर्णपणे या प्रभावाच्या कक्षेबाहेर आहेत असे कुणालाही वाटावे. पण ते खरे नाही.

शं. बा. मुजूमदार यांनी अण्णासाहेब किर्लोस्करांचे चरित्र लिहिले त्यातील पुढचा उल्लेख लक्षणीय आहे.

"—या सुमारास अण्णासाहेबांनी आपल्या 'शाकुंतल' व 'सौभद्र' पुस्तकांचे सर्व हक्क आर्यभूषण छापखान्यास देऊन एक मोठे स्वार्थत्यागाचे कृत्य केले. सदर छापखाना त्यावेळी टिळक, आगरकर, आपटे प्रभृती देशहितार्थ झटणाऱ्या मंडळींच्या मालकीचा होता. सदर गृहस्थांविषयी पूज्यबुद्धी व त्यांच्या निरनिराळ्या संस्थाविषयी कळकळ त्यावेळी सर्वत्र होती. त्याचवेळी कोल्हापूरकर बर्वे प्रकरणात ही मंडळी बरीच खर्चाच्या पेचात आली होती. त्यामुळे अशा सत्कार्यी वाहून घेणाऱ्या मंडळीस आपली ही काही मदत असावी म्हणून दोन्ही पुस्तकांचे कायमचे हक्क अण्णासाहेबांनी अवघ्या १५०० रुपयास देऊन टाकले. 'ही पुस्तके सदर मंडळीस मी शेत म्हणून दिली आहेत' असे अण्णासाहेब म्हणत." (४)

सांधा जोडून दिला

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांचे 'सवाई माधवरावांचा मृत्यू' हे नाटक 'विविधज्ञानविस्तार' मध्ये प्रसिद्ध झाले. या नाटकामुळे त्यांचा व नारायण बापूजी कानिटकरांचा परिचय झाला. कानिटकरांनी खाडिलकरांचा 'केसरी' कचेरीत प्रवेश करून दिला. (आगस्ट–सप्टेंबर १८९६) इथून काही महिन्यांनीच नारायण बापूजी परलोकवासी झाले. जाण्यापूर्वी आपण गाजविलेल्या मराठी नाटचसृष्टीशी एक नवीन सबळ सांधा त्यांनी जोडून दिला.

नाटक व देशभक्ती

सांगली हे आद्य मराठी नाटककार विष्णुदास भावे यांचे गाव. खाडिलकरांचा जन्म याच गावचा. त्यांचे हायस्कूलपर्यंतचे शिक्षण सांगलीलाच झाले. लहान वयात कृष्णाने वाड्यातील सोप्यावर त्यावेळी होत असलेली पौराणिक नाटके पाहिली. इंग्रजी तिसऱ्या इयत्तेत असताना एक छोटे नाटक त्यांनी स्वतःच लिहिले. पण अभ्यास सोडून नाटके लिहिण्याची ही प्रवृत्ती वडील मंडळींना आवडली नाही.

खाडिलकरांच्या जीवनात लहानपणापासूनच नाटक व देशभक्ती यांचा मेळ बसत होता. श्रीनिवास भिकाजी ऊर्फ बापू सरदेसाई यांनी सांगली हायस्कूल मधील विद्यार्थ्यांचे लक्ष देशातील राजकीय परिस्थितीकडे वेधून मुलांचे अंतःकरणात देशप्रेमाची व देशसेवेची भावना निर्माण केली. सरदेसाईंचा पुण्यातील नवीन नवीन स्थापन झालेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या संस्थापकांशी व कार्यकर्त्यांशी निकटचा संबंध होता. पुण्यात व कोल्हापूरात त्यांचा बराच काळ गेला होता. देशभक्तीचे वारे त्यांनी सांगली शहरी आणून सोडले. बापू सरदेसाईंचा 'पुणे वैभव' व 'नाटचकथार्णव' या नियतकालिकांशी संबंध होता. विद्यार्थ्यांवर व विशेषतः खाडिलकरांवर हे संस्कार होत होते. याच शाळेत अप्पाशास्त्री गोडबोले या संस्कृत पंडिताचे मार्गदर्शनाखाली काकासाहेबांनी संस्कृत नाटकांचा चांगला अभ्यास केला. प्रखर राष्ट्रप्रेमाची त्याचप्रमाणे नाटच कौशल्याची रोपटी खाडिलकरांच्या मनात याच काळात दृढपणे मूळ धरत होती.

कॉलेजच्या शिक्षणासाठी खाडिलकर पुण्यास आले. पहिली दोन वर्षे ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये होते. टिळक, आगरकर, गोखले हे थोर प्राध्यापक त्यावेळी कॉलेजमध्ये शिकवीत असत. त्या मुदतीत कॉलेज म्हणजे देशाभिमानाचा आखाडाच होता. खाडिलकरांच्या वृत्तीला पोषक असेच हे सगळे वातावरण होते.

यावेळी खाडिलकरांनी इंग्रजी नाटचवाङ्मयाचा चांगला अभ्यास केला. इंग्रजी नाटचकृतींना मराठी पेहराव देऊन सुशिक्षितांनी बसविलेली भाषांतरित नाटके न चुकता पाहिली. या अभ्यासातून त्यांचे 'सवाई माधवरावांचा मृत्यु' हे नाटक तयार झाले.

नाटचनिर्मितीची उर्मी जबर होती. पण देश परतंत्र होता. देशोद्धारासाठी जीव वेचावा व लेखनकला देशसेवेसाठीच सत्कारणी लावावी असे विचार पक्के होत होते. चिपळूणकर, टिळक, आगरकर, या मंडळींचा आदर्श नजरेपुढे होताच. वकिली की देशभक्ती यांमध्ये निवड करण्याचा प्रसंग आला तेव्हा काकासाहेबांनी निश्चयपूर्वक देशभक्तीची कास धरली.

देशभक्तीची साधना

खाडिलकरांनी केसरीमध्ये प्रवेश केला तो देशभक्तीच्या एकमेव भावनेने. म्हणूनच अगदी अल्पावधीत

खाडिलकर केसरीशी व टिळकांशी एकरूप होऊ शकले.

इ. स. १८९७ मध्ये लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला झाला. ज्या लेखांच्या आधारावर हा खटला भरण्यात आला ते खाडिलकरांनी लिहिले होते. लो. टिळकांप्रमाणेच खाडिलकरांनाही मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा ध्यास लागून राहिला. देशभक्तीच्या एकाच रसाने त्यांचे जीवन व्यापून टाकले.

कीचकवधाची पार्श्वभूमी

कर्झनशाहीचा जुलूम वाढत होता. राष्ट्रीय कांग्रेस अर्ज–विनंत्यांच्या राजकारणातून बाहेर पडत नव्हती. आणि तिकडे जपानने रशियावर विजय मिळविला होता. मूठभर बोअर लोकांनी आफ्रिकेत इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इंग्रज सत्ता बलाढ्य खरी. पण म्हणून काय नेहमीसाठी पारतंत्र्यातच खितपत पडावयाचा हा प्रश्न होता ?

काकासाहेब खाडिलकरांनी विशिष्ट उद्देशाने नेपाळमध्ये प्रवेश केला. घाट बरोबर जुळला नाही. लवकरच वंगभंगामुळे नवीन चढाईची संधी चालून आली. या संधीचा पुरेपूर फायदा उठविण्याचा निर्धार टिळकांनी व खाडिलकरांनी केला.

अन्याय वाढतच होता. मवाळांचे पण रक्त तावू लागले. वाराणसी कॉंग्रसने हे दाखवून दिले. टिळक, खाडिलकर लढाऊ कार्यक्रमाचा हिरीरीने पुरस्कार करीत होते. केसरी व काळ गर्जत होता. भास्कर बळवंत भोपटकरांनी "भाला" फेक सुरू केली. शिवरामपंत परांजपे, सावरकर बंधू हे तर टिळक, खाडिलकरांपेक्षाही चार पावले पुढेच होते. क्रांतीचा संदेश पसरत होता.

खाडिलकरांचे कीचकवध नाटक वरील पार्श्वभूमीवर साकार होत होते. उत्कृष्ट संस्कारांची मनात दाटी झालेली असताना काकासाहेबांमधील नाटककार जागा झाला. 'कीचकवध' नाटक या उत्कृष्ट राजकीय संस्कारांचा प्रभावी अविष्कार होय.

महाराष्ट्र नाटक मंडळी

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचे 'कीचकवध' नाटक 'महाराष्ट्र नाटक मंडळी'ने समर्थपणे रंगमंचावर आणले.

महाराष्ट्र नाटक मंडळी पुष्कळ अंशांनी खाडिलकरांशी समानधर्म होती. केवळ लोकांची करमणूक करावी आणि पैसा मिळवावा या उद्देशाने ती निघाली नव्हती. महाडच्या काही नाट्यप्रेमी आणि ध्येयवादी व्यक्तींनी 'नो च्चार्यां त्रिफलोपि दूषणपदं दुष्यस्तु कामो लघुः' हे ब्रीदवाक्य पुढे ठेवून ही कंपनी स्थापन केली होती.

कीचकाचे स्वरूपात लॉर्ड कर्झन

कीचकवधाची जाहिरात केसरीत झळकली. खाडिलकरांचे नाटक. पुण्यात नाटकातील व्यक्तींबद्दल, प्रसंगांबद्दल, भाषणांबद्दल आगाऊ चर्चा सुरू झाली. इतकी जाहिरात पूर्वी कोणत्याही नाटकाची वा नाटककाराची झाली नव्हती.

नाटकातील कीचक जुलमी सत्ताधारी म्हणून रंगविला जाणार एवढे सर्व लोकांनी गृहीत धरले होते. जवळजवळ सात वर्षे चाललेल्या जुलमी कर्झनशाहीचा जनतेला पुरा अनुभव आला होता. लो. टिळकांनी केसरीच्या २९ ऑगस्ट १९०५ च्या अग्रलेखात या कारकिर्दीचे खालीलप्रमाणे वर्णन केले :—

"सामान्य दृष्टीने पाहिले तर आजपर्यंत हिंदुस्थानात जितके व्हॉइसरॉय आले त्यांच्या कारकिर्दीपेक्षा लॉर्ड कर्झन यांची कारकिर्द हिंदी प्रजेच्या दृष्टीने अधिक जुलमी आणि साम्राज्यातील प्रजेस अत्यंत अहितकारक झाली असे म्हणावयास आम्हास बिलकुल शंका वाटत नाही. . . . . यांच्या कारकिर्दीच्या तोडीस जुना दाखला द्यावयाचा असल्यास, तो पुष्कळ अंशी औरंगजेबाचा घेतल्यास चालेल."

वरील लेखात दाखला म्हणून आसुरी संपत्तीची एखादी पौराणिक व्यक्तीही निवडता आली असती. बनारस कॉंग्रेसमध्ये ना. गोखल्यांनी लॉर्ड कर्झनचा उल्लेख 'रावण' म्हणूनच केला. खाडिलकरांनी आपल्या नाटकात रूपक चांगले बसावे म्हणून कीचकाची योजना केली.

लॉर्ड कर्झन – हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल

जानेवारी १८९९ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरल पदाची सूत्रे हाती घेतली. महाराष्ट्रातील पुढारी वर्गाचे लक्ष या नेमणूकीकडे

होते. या नेमणूकीवर हिंदुस्थानातील तीस कोटी प्रजाजनांचे सुखदुःख अवलंबून असे.

खाडिलकरांनी १६ आगस्ट १८९८ पासून लागोपाठ तीन लेख लाटसाहेबांवर लिहून त्यांचा विस्तृत परिचय केसरीच्या वाचकांना करून दिला. कर्झन साहेबांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांवरून त्यांच्या कारकिर्दीचे धोरण कोणत्या प्रकारचे राहील याचा अंदाज बांधण्यात आला होता. पुढील वर्षाच्या अनुभवाने तो खरा ठरला. खुद्द टिळकांनासुद्धा लॉर्ड कर्झन यांच्या अरेरावी कारकिर्दीबद्दल केसरीमधून लिहिण्याचा पुष्कळ वेळ प्रसंग आला.

आसुरी महत्त्वाकांक्षा

कर्झनसाहेब पक्के साम्राज्यवादी. इंग्लंडमधील टोरी पक्षाचे एक प्रमुख. इंग्लंडने सर्व जगाचे सार्वभौमत्व पटकवावे अशी त्यांची उत्कट इच्छा आणि ते इंग्लंडला मिळवून देण्याची त्यांची जबरदस्त महत्त्वाकांक्षा. 'Problems of the far East' या लॉर्ड साहेबांच्या पुस्तकातील समर्पणाचा भाग खाडिलकर आपल्या लेखात उद्धृत करतात — "To those who belive that the British empire is, under providence, the greatest instrument for good that the world has seen, and who hold with the writer, that its work in the far East is not yet accomplished, this book is inscribed."

("परमेश्वराचे कृपाछत्राखाली असलेले इंग्रजांचे साम्राज्य म्हणजे पृथ्वीतलावर दृष्टीस पडणारी व जगाच्या कल्याणाकरिता उत्पन्न झालेली सर्वात प्रचंड शक्ती होय असे ज्यांचे मत आहे आणि फार पूर्वेकडील देशात या शक्तीचे कार्य अद्याप संपूर्ण झालेले नाही असे ग्रंथकर्त्याप्रमाणे ज्यांना वाटते त्यांना हे पुस्तक समर्पण केले आहे.") (५)

आशियाचे वैभव युरोपिअन राष्ट्रांपैकी कोणाच्या घशात उतरणार यासंबंधी कर्झनसाहेबांनी खालीलप्रमाणे भविष्य वर्तविले होते :—

"The true fulcrum of Aciatic domination seems to me increasingly to lie in the Empire of Hindustan. The secret of the mastery of world, is, if only they knew it, in the possession of the British people." — P. XV Preface, Problems of the far East.

('एशिया खंडाच्या साम्राज्याच्या तराजूचा काटा अधिकच हिंदुस्थानच्या राजसत्तेच्या हाती आहे असे मला वाटते. सर्व जगाची मालकी संपादण्याची गुरुकिल्ली इंग्रजांपाशी आहे. मात्र त्यांना ही गोष्ट समजावयास पाहिजे.") (६)

हिंदुस्थान काबीज केले म्हणजे एशिया खंडाचे आपण नाक दाबून धरले आणि आता सर्व एशिया खंडावर वर्चस्व मिळविण्यास इंग्लंडने मागेपुढे पाहता कामा नये अशी कर्झन साहेबांची सत्ताधाऱ्यांना आग्रहाची सूचना होती. आणि आता तर ते स्वतःच सत्ताधारी बनून हिंदुस्थानात आले होते.

गव्हर्नर जनरल पदी नेमणूक हे त्यांचे पूर्ण समाधान नव्हते. एशिया खंडात इंग्रजी साम्राज्य निर्माण करण्याची त्याची प्रतिज्ञा होती. या प्रतिज्ञेच्या आड जो कोणी येईल त्याला उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत दणदणारी लढाई खेळावी लागेल अशी त्यांची धमकावणी होती.

हस्तिनापूरच्या स्वारीहून मानमान्यता मिळवून विराट नगरीत आलेल्या खाडिलकरांच्या कीचकाचाही हाच रंग आहे

" आणि अजून प्रतिज्ञा करून मी असे सांगतो की, थोड्या दिवसांनी कौरव–पांडवांच्या युद्धाची वेळ आली म्हणजे, भीष्म, द्रोण किंवा कर्ण ह्यांच्या हातूनही न होणारा पराक्रम मी करून दाखवीन. माझ्या गदेने भीमाचे शतशः तुकडे झाल्यावर, माझ्या बाणांनी अर्जुन गतप्राण झाल्यावर, युधिष्ठिराच्या शेंडीला पकडून, मी माझ्या पायांवर त्याला डोके ठेवावयास लावून, त्याला जीवदान देईन व त्याला गरीब भिक्षुकाचा ह्या नटव्या जोडीने बायकांचा पोषाख करून, अशा तऱ्हेने माझ्यावर चामरे उडविण्याचे कबूल केले तरच त्यांना जिवंत ठेवीन. असा अद्भुत पराक्रम करून दाखविण्याचे मी भारतेश्वराला वचन दिले आहे. " (कीचकवध, आ. २ री, पृ. १०–११).

दास ते दास !

"हिंदुस्थान आम्ही स्वपराक्रमाने जिंकला. इथली प्रजा आमची दास आहे. आमच्या देशात

आम्ही लोकशाहीच्या तत्त्वानुसार व्यवहार करतो. पण तोच व्यवहार दासांचे बाबतीत कसा करावयाचा ? दास ते दास ! त्यांची जागा पायाजवळ. त्यांना एका मर्यादेपेक्षा उंच उठू देता कामा नये." कर्झन साहेबांची ही अशी विचारसरणी होती.

खाडिलकरांचा कीचक काय म्हणतो तेही पहा,–

"ह्या दासदासींना उठल्याबसल्या लाथा मारीत असले पाहिजे. माझी सर्व अनुकीचकांना आज्ञा आहे, दासदासींशी केव्हाही एक क्षणभर गोडीगुलाबीने बोलू नका. उठता लाथ आणि बसता बुक्की, असे जर ह्यांना वागवले नाही तर लगेच आम्हा कीचक अनुकीचकांच्या बरोबरीचे आपण आहो असे ह्यांना वाटते; आणि आमच्या मिजाशी ह्यांच्या डोळ्यात खुपून आमची सत्ता ह्यांना जुलमाची भासू लागते." (कीचकवध', पृ. ६६).

आश्रितांचा अपमान

हिंदुस्थानातील राजेरजवाडे म्हणजे ब्रिटिश सत्तेचे केवळ आश्रित ! फुकट अन्न खाणाऱ्यांचा कशाला मान ठेवावयाचा ? ग्वाल्हेरचे राजे श्रीमंत माधवराव शिंदे यांचा लॉर्ड कर्झन साहेबांनी अपमान केला. संस्थानिक राजे म्हणजे कुठले कोण ? इंग्रज सत्तेच्या बाहुबलावर त्यांचे अस्तित्व अवलंबून होते ना !

कीचक – गप्प बसा भटुर्ग्यांनो; तुम्हाला या थोर श्रीमंतांच्या गोष्टी काय होत ? ज्यांना दुसऱ्यांची आर्जवे करून, भिक्षा मागून, अन्नाचे दोन घास मिळवावयाचे असतात, त्यांनी पाहिजे तर अन्नाला डोक्यावर घेऊन नाचावे. – तुमचा जन्म – अन्नाकरता आहे आणि अन्नच काय, जगातील सुखोपभोगाचे सर्व पदार्थ मजकरता आहेत. – ह्या अन्नाची मजपुढे प्रतिष्ठा काय ? ज्याच्या बाहुबलाने राजे, महाराजे, अधिराजे उत्पन्न होतात, हुकमाचे शब्द ज्याच्या मुखातून निघण्याचा अवकाश की, त्याबरोबर अभिषिक्त राजे, महाराजे, अधिराजे यांना आपल्या वडिलोपार्जित सिंहासनावरून निमूटपणे खाली उतरावे लागते, नवीन राज्ये भरभराटीस आणणे आणि जुनी नावाजलेली लयास नेणे, ही ज्यांची रोजची सहज लीला, असल्या मजसारख्या वीर पुरुषांच्या पुढे विश्वातील सर्व सुखोपभोगाचे पदार्थ हात जोडून सेवेला तत्पर उभे राहिले पाहिजेत." – (कीचकवध, पृ. ३२).

अहंकाराची पूजा

लॉर्ड कर्झन साहेबांनी अहंकाराची पूजा बांधली होती. निरंकुश सत्ता गाजविण्याचा त्यांचा अट्टाहास होता. प्रजेचे सुखदुःख काय पहायचे ते मी पाहीन व मीच ठरवीन. मी एकदा काही ठरविल्यावर त्याला विरोध नको. साहेबांनी बंगालची फाळणी केली. निर्णय बदलविण्याची आवश्यकता निर्माण झाली. पण स्वतःच्या कारकीर्दीत त्यांनी माघार घेतली नाही.

कीचक:—छत् ! भलती वेडगळ कल्पना !— स्वर्गातल्या कीर्तीहून आम्हा सत्ताधाऱ्यांना आमची इहलोकची इभ्रत जास्त किमतीची वाटते. आमचा शब्द केव्हाही खाली पडता कामा नये.—यःकश्चित दासी जर माझा हुकूम तोडू लागल्या, तर त्या नेभळ्या कीचकाची बायको म्हणून रस्त्यात तुझ्याकडे लोक बोटे दाखवतील, ह्याचा नको का मला विचार करायला ? बस्स झाला तो हुकूम होऊन गेला, आता काय त्याचे घटके घटकेला. जो वीर आपले हुकूम मागे घेत असता, त्याची बायको होण्यात जर रत्नप्रभेला भूषण वाटत असेल, तर माझ्याबरोबर माझ्या अर्ध्या सिंहासनावर बसण्याची तुझ्या अंगी लायकीच नाही असे मी समजतो.— (कीचकवध; पृ. ५१)

साहेबाची सहानुभूती

हिंदुस्थानातील प्रजेबद्दल लॉर्ड कर्झन यांची दृष्टी सहानुभूतीशून्य नव्हती. पण इंग्लंडचे साम्राज्यास धक्का लागू न देता प्रजेचे कल्याण करण्याची त्यांची इच्छा होती.

"साम्राज्य टिकविण्याकरिता, साम्राज्य चिरस्थायी होण्याकरता अथवा साम्राज्याची बडेजावकी वाढण्याकरिता प्रजेचे हातपाय जितके तोडावयास पाहिजेत, किंवा त्यांचा जितका हिरमोड अथवा छाटाछाट करावयास पाहिजे, तितकी करण्यास लॉर्ड कर्झन यास कधीच दिक्कत वाटली नाही." (७)

एखाद्या रोमन सरदाराने पदरी असलेल्या गुलामाबद्दल सहानुभूती दाखवावी त्यातलाच हा

प्रकार होता. कीचकाच्या असल्या सहानुभूतीबद्दल म्हणूनच नाटकातील सैरंध्री चिडून म्हणते

"कसली रे मेल्या सहानुभूती ? आग लागो तुझ्या या सहानुभूतीला. सहानुभूती, सहानुभूती, म्हणून आम्हा सर्वांना तुझ्या रांडाच वनविणार की नाही ?– ह्या गाढवाला आपल्या ह्या असल्या सहानुभूतीचा दिमाख दाखवायलाही लाज वाटत नाही." (कीचकवध; पृ. ६९)

घड्याळाचे काटे मागे फिरविण्याचा प्रयत्न

गव्हर्नर जनरल म्हणून हिंदुस्थानात आल्यावर कर्झन साहेवांनी जनतेला मिळालेले थोडे अधिकार सुद्धा प्रयत्नपूर्वक काढून घेण्याला सुरवात केली. इंडिअन नॅशनल कांग्रेसला आपल्या हयातीत मूठमाती देण्याचा त्याचा विचार होता.

"In November 1900, Curzon had written with great complaisancy to the Secretary ot State for India, My own belief is that Congress is tottering to this fall, and one of my great ambitions while in India, is to assist it to a peaceful demise" (८)

इ. स. १८५८ मध्ये व्हिक्टोरिया राणीने हिंदुस्थानी जनतेसाठी काढलेला खास जाहीरनामा या गृहस्थाने कचऱ्याच्या टोपलीत टाकला. अव्यवहार्य ताम्रपट म्हणून जाहीरनाम्याचा त्याने उघड उपमर्द केला.

भर दरवारात राजा विराटासमोर सैरंध्रीचे वस्त्र फेडू पाहणारा कीचक, खाडिलकरांनी वरील पार्श्वभूमीवर रंगविला.

कीचकः–या माझ्या कृत्याला पशुतुल्य पापाचरण म्हणा, राक्षसी कृत्य म्हणा, किंवा राजा विराटा, तुझ्या डोळ्यादेखत झालेला हा तुझा अपमान समज. हा कीचक–या दरवारात–राजा, गुरु, पुरोहित व महाराणी या सर्वांचे डोळे उघडे असताना–या सायंकाळचे वेळी सूर्य अस्तास जाण्यापूर्वी दिवसा सृष्टीचे नियमन करणाऱ्या देवता शेवटची नजर पृथ्वीवर फेकीत असताना त्यांच्यासमोर–रात्रीच्या देवता उदयोन्मुख होऊन सृष्टीचा तावा घेण्याकरिता पृथ्वीवर प्रारंभीची नजर फेकीत असताना त्यांच्याही डोळ्यादेखत–हा कीचक, या दरबारांत या सैरंध्रीचा पदर तिच्या अंगावरून जबरदस्तीने ओढून काढून–आजच्या रात्री ही सैरंध्री खात्रीने माझी रंडी होणार, हे तिच्या अनुभवास आणून देणार. 'कीचक वध;'(पृ.८५)

लॉर्ड कर्झन यांचा राजकीय मृत्यू

कर्झन साहेबाची हिंदुस्थानातील कारकीर्द अयशस्वी ठरली. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय कांग्रेसचा मृत्यू पाहण्याची त्यांची इच्छा होती. पण शेवटी त्यांचाच राजकीय मृत्यू कांग्रेसने पाहिला. ऑगष्ट १९०५ मध्ये साहेवाने राजीनामा दिला व काही महिन्यांनी ते इंग्लंडला परत गेले.

सुंभ जळला, पण पीळ कायम होता. मायदेशी परत जाण्यापूर्वी मुंवईच्या भायखळा क्लवमधील १६ नोव्हेंवर. १९०५ च्या भाषणात कर्झन साहेव म्हणाले.

"I Search my conseience and I ask myself who and what are the real Indian people ?"

जातेवेळी असे आढ्यतेखोर उद्गार काढण्यामागे हेतू होता. हिंदुस्थानी नेत्यांना व हिंदुस्थानी प्रजेला कःपदार्थ लेखून त्यांच्या स्वातंत्र्यकांक्षेचा अपमान करण्याचा हा प्रयत्न होता.

भीम प्रत्यक्ष छातीवर वसला असता कीचकाचा उद्दामपणा किंचितही कमी होत नाही. कीचकाचे हे पात्र आपल्या नाटकामध्ये रंगविताना खाडिलकरांच्या दृष्टीसमोर कर्झनसाहेबाची कारकीर्द स्पष्ट स्वरूपात उभी होती. या साहेवाच्या राजकीय कारकिर्दीचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष ठसा कीचकाच्या स्वभावचित्रात चित्तवेधक स्वरूपात उमटला आहे यावद्दल शंका नाही.

'संगीत भस्मासूर नाटक'

सुप्रसिद्ध श्रीशिवलीलामृतातील कथानकाच्या आधाराने माधवराव नारायण पाटणकरांनी 'सं' 'भस्मासूर नाटका'ची रचना केली. 'कीचकवध' नाटकाच्या सुमारास (१९०७) हेही नाटक रंगभूमीवर आले होते. लॉर्ड कर्झन याच्या जुलमी कारकिर्दीचे प्रतिविंव त्यामध्ये पडलेले दिसते. प्रस्तावनेत स्वतः नाटककार लिहितात.

'.. ...अहंकारमदाने धुंद होऊन ईश्वरालाही तुच्छ मानणाऱ्यांची अखेर विश्वरूपी रंगस्थलावर इतिश्री करण्यात नटनाटकी भगवंताचे अगाध व विशाल कर्तृत्व पाहून प्रत्येक प्राणिमात्राने किती जपून वागले पाहिजे. हेच या नाटकातील मुख्य तात्पर्य आहे.'

भिन्न रंगछटांचा सूक्ष्म वापर

खाडिलकरांच्या नाटकातील कीचकाचे रूपक आपण पाहिले. इतरही रूपके या नाटकात आहेत· कवीने एखादी उपमा पूर्णोपमा करून दाखवावी तशी करामत या नाटकात खाडिलकरांनी करून दाखविली आहे म्हणतात ते खोटे नाही.

लंडन टाईम्समध्ये किंकेड साहेबांनी त्याचप्रमाणे इतर पुष्कळांनी धर्म, भीम, द्रौपदी या रूपकांची फोड करून दाखविण्याचा प्रयत्न केला होता. या सर्वांमध्ये बरीच एकवाक्यता असली तरी सूक्ष्म भेद पण आहेत. खरे पाहता या तिघांचे मिळून (कर्म, भीम, द्रौपदी) ते त्यावेळच्या महाराष्ट्राच्या राजकारणावरचे रूपक होते असे म्हणणेच अधिक श्रेयस्कर होईल.

जहाल–मवाळ हे महाराष्ट्राच्या राजकारणातील दोन मुख्य खांब. इथल्या राजकारणाचा खो खो या दोन खांबाभोवती खेळला गेला. राजकारणाच्या या मैदानावर पुष्कळ गडी खेळत होते. दोन खांबांमध्ये वेगवेगळ्या व्यक्ती व त्यांची वैशिष्टये दृष्टोत्पत्तीस पडत होती. सप्तरंगी धनुष्याप्रमाणे राजकीय विचारांचे रंग एकमेकात मिसळले होते आणि तरी त्यांचे वेगळेपणही जाणवत होते.

शिवरामपंत परांजप्यांच्या लेखांनी व भाषणांनी भारलेली तरुणमंडळी टिळकांना मवाळ म्हणत. इंग्रज सरकारच्या लेखी, त्याचप्रमाणे गोखले, मेथा प्रभृतींच्या दृष्टीने टिळक चांगलेच जहाल होते. पण वाराणसी (बनारस) कांग्रेसमधील भाषणावरून गोखले जहाल कंपूत शिरले असा भास मुंबई टाईम्सला झालाच होता.

खाडिलकरांचा कंपू मवाळांचा प्रतिनिधी वाटतो तर द्रौपदी व भीम मिळून जहाल पक्षाचे प्रतिनिधित्व करतात. चित्रकाराच्या भाषेत या रूपकांबद्दल बोलायचे झाल्यास ती छायाचित्रे नसून पोर्ट्रेट्स आहेत.

'सवाई माधवराव यांचा मृत्यू' आणि 'प्रेमध्वज' ही दोन नाटके सोडली तर खाडिलकरांची बहुतेक सर्व नाटके रूपकात्मक आहेत. यामध्ये राजकीय रूपकांचे प्रमाण अर्थातच अधिक आहे. पण ही रूपके म्हणजेच खाडिलकरांच्या नाटकांचे सारसर्वस्व नव्हे. दृष्टांत देऊन असे म्हणता येईल की, त्यांच्या बहुतेक सर्वच नाटकांची वीण तीन पदरी आहे. राजकारणाचा एक पदर तिथे असला तरी तत्त्वविचार व कौटुंबिक जीवन हेही दोन पदर तिथे असल्याचा विसर आपण पडू देता कामा नये.

पक्षोपपक्ष एक झाले

सन १९०५ मध्ये महाराष्ट्रातील राजकारणाला वेगळेच स्वरूप प्राप्त झाले. भाऊबंदकी बंदिस्त होऊन बाजूला पडली. भावाभावांचे भांडण संपले. पक्षोपपक्ष एक झाले. कर्झनशाहीतील जुलमाचा हा परिणाम होता.

कीचकवध नाटकामध्ये भीम, द्रौपदी मिळून धर्मराजाच्या मवाळ धोरणावर हल्ले चढवितात. धर्म आपली बाजू स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो. खाडिलकरांच्या कीचकवध नाटकात मतभेद आहेत, खडाजंगी वाद आहेत पण भांडण नाही, एका दृष्टीने पाहता तो विचारविनिमय आहे आणि मुख्य म्हणजे महत्त्वाचा पेचप्रसंग निर्माण झाला असता त्यांचे एकमत झाले आहे.

मवाळाग्रणी नामदार गोखले

ना. गोखले हे सनदशीर चळवळीचे महाराष्ट्रातील आचार्य न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य. सन १८८७ ते १८९१ या चार वर्षात गोखल्यांनी गुरूंच्या हाताखाली निष्ठेची उमेदवारी केली.

सन १८८८ पासून त्यांचा राजकारणाशी संबंध जुळला. पुण्याच्या पहिल्या प्रांतिक परिषदेचे ते सेक्रेटरी होते. सन १८९९ मध्ये ते मुंबई विधिमंडळात निवडून गेले. अन्याय्य सरकारी धोरणाचा ते कसून विरोध करीत. पण तरी जनहिताला व देशहिताला विरोधी कायदे पास झाल्याशिवाय राहत नसत.

१९०३ साली कलकत्याला वरिष्ठ विधिमंडळात त्यांना जागा मिळाली. इथे लॉर्ड कर्झन यांच्याशी दोन हात करण्याचे प्रसंग त्यांच्यावर आलेत. गोखले आपली विधाने आकडे देऊन सशास्त्र सिद्ध करीत. पण लॉर्ड साहेबांनी त्यांच्या या सनदशीर धोरणाला कधीच दाद दिली नाही. एका अर्थाने देशातील सनदशीर राजकारणाच्या कर्झन साहेबांनी चिंध्या उडविल्या. सनदशीर चळवळीचा पुरस्कार करणारी मंडळी भांवावून गेली. काय करावे त्यांना सुचेनासे झाले—कळेनासे झाले.

जहालांचा जहाल कार्यक्रम

लो. बाळ गंगाधर टिळक मुळातच जहाल प्रवृत्तीचे. मानापमान मुकाटयाने गिळण्याची, जुलूम सहन करण्याची व परकीयांच्या लाथा निमूटपणे सहन करण्याची त्यांची वृत्ती नव्हती. सनदशीर चळवळीचा फोलपणा त्यांच्या लक्षात आला होता. त्यांना कांग्रेस वेगळ्या मार्गांनी वळवावयाची होती. जहाल मंडळीचा जहाल कार्यक्रम तयार होता. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीवर हुकूम राष्ट्राला पुढे नेण्याचा त्यांचा विचार होता.

टिळकांचे तरुण साथीदार त्यांच्याहीपेक्षा दोन पावले पुढेच होते. इ. स. १९०० च्या सुमारास महाराष्ट्रात गुप्त क्रांतिकारी संघटना उदयास आल्या. यांच्या मनात सरकारबद्दल केवळ अप्रीतीच नव्हती तर तीव्र द्वेष होता. पण सरकारपेक्षाही मवाळांच्या मवाळ धोरणावर ते अधिक चिडत. साप म्हटल्यावर सामोपचार कसला ? त्याचे डोके ठेचायलाच हवे, असा त्यांचा स्पष्ट विचार होता.

कंकभटाची व्यथा

महाराष्ट्राच्या राजकारणात सन १९०५ च्या आगेमागे नामदार गोखल्यांची व्यथा कीचकवध नाटकातील कंकभटाच्या व्यथेशी बरीच जुळणारी आहे.

कंकभटाला राजसभेत बसून धर्माधर्मासंबंधी वादविवाद करण्यापलीकडे "विराट" सभेत काय महत्त्व आहे, गुलामगिरीची म्हणावी तशी चोडच इथे नाही असे म्हटले तर द्रौपदीवर बाका प्रसंग गुदरला असताही विरुद्ध पक्षाच्या सत्यनिष्ठेवर व औदार्यावर त्याचा विश्वास आहे.

रत्नप्रभेने कीचकाची चांगली कानउघाडणी केली. सैरंध्रीने त्याला चांडाळ, राक्षस, लांडगा म्हणून शेलक्या शिव्या मोजल्या. विराट महाराज, सुदेष्णा महाराणी यांनी चार गोष्टी सांगून पाहिल्या. पण उपयोग होईना. सैरंध्रीने म्हणून शेवटी कंकभटाला स्पष्टच सांगितले. "एक त्याला कीचकाला तरी जगातून नाहीसा केला पाहिजे, नाहीतर मी तरी नाहीशी झाली पाहिजे : एरव्ही हा तंटा मिटणार नाही." खरे होते हे म्हणणे. पण "कीचकाला जगातून नाहिसा करा म्हणणे सोपे असले तरी कृती फार कठीण होती."

कीचकाच्या राक्षसी वृत्तीची कमान चढतच होती. द्रौपदीच्या आर्त किंकाळ्या हृदयाचा छेद घेत होत्या. कीचकाला जिवंत ठेवणे म्हणजे अन्यायाची पाठराखणी करण्यासारखे होते. पण एकदम त्याच्या विरोधात उभे राहणेही तितके सोपे नव्हते. इकडे आड, तिकडे विहीर अशी ही विकट अवस्था होती.

शठं प्रति शाठचम्

टिळक आणि क्रांतिकारी पक्ष यांना सनदशीर मार्ग माहीत नव्हता असे नाही. पण त्या मार्गावरील त्यांचा विश्वास उडाला होता. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी व आपला जन्मसिद्ध हक्क संपादन करण्यासाठी ही मंडळी दंड थोपटून उभी होती. "शठं प्रति शाठचम्" हा त्यांचा सिद्धांत होता.

बल्लव व सैरंध्री यांच्याद्वारा खाडिलकरांनी महाराष्ट्रातील जहाल म्हणविल्या गेलेल्या गटांची विचारसरणी मांडण्याचा प्रयत्न केला.

बल्लव—भीम हा बळाचा उपासक आहे. कौरवांच्या रक्ताने भिजलेल्या हातांनी द्रौपदीची वेणी घालण्याची त्याची प्रतिज्ञा आहे. बळाची उपासना करतांना वेळ प्रसंगी बळी जाण्याची वेळ येते हे तो जाणतो. पण त्याची त्याला डर नाही. बुद्धचाच हे सतीचे वाण त्यानी घेतले आहे.

शक्तीची उपासना सैरंध्रीला (द्रौपदीला) संमत आहे. पण विशिष्ट परिस्थिती व पांडवांची नि:शस्त्रावस्था तिला विसरता येत नाही. बळाचा पुरस्कार करणाऱ्या द्रौपद्रीच्या व्यक्तित्वात संयमालाही तितकीच जागा आहे.

जहाल राजकारणाच्या ह्या दोन प्रती वेगळ्या असूनही सूक्ष्म दृष्टीला त्या संबंधित व पूरक वाटतील.

खाडिलकरांच्या चित्रातील सूक्ष्म रेखाटनाचा प्रत्यय यावा म्हणून प्रत्यक्ष राजकारणातील या दोन विचारांचे साहचर्य कोणत्या प्रकाराचे होते हे दाखविण्याचा प्रयत्न पुढे केला आहे.

क्रांतिकार्यासाठी आपल्या मनाची तयारी कशी झाली याबद्दलचे निवेदन करताना स्वा. सावरकर आत्मचरित्रात लिहितात.

"लोकमान्यांच्या अत्यंत कृतज्ञ आणि निष्ठावंत अनुयायांहूनही मी कृतज्ञ आणि निष्ठावंत होतो आणि राहिलो, ह्याचे हेच निरुत्तर प्रत्यंतर आहे की, त्यांचे गणेशोत्सव, शिवोत्सव, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार, सभा, परिषदा या सर्व अनेकमुखी आंदोलनातील कार्यक्षेत्रातील जे इंगित, तेच आम्ही, त्यांनी न सांगताही ओळखून, त्या सर्वांचे अपरिहार्य पर्यवसान ज्यात व्हावयाचेच हे लोकमान्यच काय ते जाणत होते. त्या रणक्षेत्रातच आम्ही अचानक उतरलो....लोकमान्य जे मनात बोलतात ते आम्ही गर्जलो; ते जेथे थांबत तेथून आम्ही पुढे सरू–सरलो. ते नेते, ते राष्ट्राच्या एक पाऊल पुढे असत. पण त्यांना त्यापुढची पावले निर्वेधपणे टाकता यावीत म्हणून आम्ही त्यांच्याही पुढे शंभर पावले चालत गेलो..... लोकमान्य हे खड्गाची मूठ होते, आम्ही क्रांतिकारक त्यांचे पाते होतो. खड्गाची मूठ जरी पाते होत नाही, तरी पाते हे मुठीच्याच आधारावर रणकंदनी लवलवते; पाते मुठीच्या मनोगताचे पारणे फेडीत असते..." (९)

सावरकरांच्या अभिनव भारत संघटनेला लो. टिळकांनी सन १९०६ मध्ये भेट दिली होती. तरुण कार्यकर्त्यांना सल्ला देताना टिळक त्यावेळी म्हणाले :

"आम्हीही अशा गुप्त चळवळी, शत्रास्त्रांची जमवाजमव केली होती. तुम्ही उतावळेपणाने फार घाई करू नका. कार्य योग्य आहे. पण धिमेपणाने, शिस्तीनेच चला." (१०)

इंग्लंडात शिष्टाई

लॉर्ड कर्झन विधिमंडळातील विरोधाला जुमानीत नाही. काय करावे? राष्ट्रीय कॉंग्रेससमोर प्रश्न होता. "इंग्लंडमध्ये शिष्टाई"ची कल्पना पुढे आली. नामदार गोखल्यांची निवड करण्यात आली. १६ सप्टेंबर १९०५ ला गोखल्यांनी इंग्लंडला प्रयाण केले.

लो. टिळकांनी शिष्टाईला पाठिंबा दिला. कर्झनशाहीच्या धुमाकुळाबद्दल व हिंदुस्थानच्या वाढत्या राजकीय आकांक्षाबद्दल गोखल्यांनी ब्रिटिश सांसदीय पुढाऱ्यांपुढे, उदारमतवादीयांपुढे व प्रतिष्ठित नागरिकांपुढे भाषणे दिली. लाला लाजपतराय यांनी बहुजन समाजाची आघाडी संभाळली. मवाळ व जहाल यांचे प्रचार एकमेकांना पूरक ठरले—

पण फायदा झाला नाही.

कीचक–वध नाटकात विराट महाराजांच्या राजसभेत कीचकाच्या अन्यायाविरुद्ध द्रौपदी दाद मागण्याचा प्रयत्न करते—

दाद मिळत नाही.

बहिष्काराला संमती

वरील परिस्थितीत कॉंग्रेसपुढे मोठा पेच निर्माण झाला. या पेचाचे व त्यावरील उपायाचे दिग्दर्शन लो. टिळकांनी केसरीतील १५ आगस्ट १९०५ च्या अग्रलेखात खालील शब्दात केले :

"दहा, पंधरा किंवा वीस हजार किंबहुना लाखो लोकांच्या सभेत व्यक्त झालेल्या मतास सरकार काडीइतका देखील मान देत नाही हे हल्लीच्या उदाहरणांवरून पूर्णपणे दृष्टीस येत आहे, आणि या गोष्टीचा प्रतिकार करण्याचा जर काही मार्ग आम्ही काढला नाही तर असल्या चळवळीवरील लोकांचा विश्वास लवकरच उडून जाईल.······लोकमताचा हा आळणीपणा कसा घालवावा हा आपल्यापुढे सध्या मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. बंगालच्या सभेत असा ठराव झाला आहे की, सरकार किंवा विलायतेतील लोक जर आपले म्हणणे ऐकत नाहीत तर आपण विलायती माल न वापरण्याची शपथ घेऊ. ही कल्पना आमच्या मते काही वावगी नाही."

सनदशीर चळवळीचा आग्रहाने पुरस्कार करणारे नामदार गोखले शेवटी बहिष्कार चळवळीला संमती देतात. त्यांचे वाराणसी कॉंग्रेसमधील (सन १९०५) अध्यक्षीय भाषण याची साक्ष आहे.

"ही चळवळ राष्ट्राच्या इतिहासाला वेगळेच नवे स्वरूप देणारी आहे. या चळवळीने देशातील वाद संपून पूर्वी कधी झाली नव्हती इतकी पुढाऱ्यापुढाऱ्यात एकवाक्यता झाली आहे; पूर आला असता

पाणी वेड्यावाकड्या रीतीने कोठेही शिरते त्याच-प्रमाणे अशा प्रचंड चळवळीत योग्य मर्यादेचें उल्लंघन क्वचित होणारच; जरी बंगाली लोकांची बेअब्रू झाली तरी ती सर्व आम्हा भारतीयांचीच होय, या भावनेने त्यास आपण सर्व मदत करू; एका विवक्षित हेतूने म्हणजे राज्यकर्त्या इंग्लंडच्या लोकांचे लक्ष-वेधण्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राचा उपयोग करण्यात आला आणि येत आहे तो या प्रसंगी अगदी योग्य असून विलायतेत त्याचा परिणाम चांगलाच झाला आहे.……"

जहाल मवाळांच्या एकीचे हे स्पंदन हाच कीचक–वध नाटकाचा मुख्य प्राण आहे.

नेवाळकरांचा दंडधारी

दामोदर विश्वनाथ नेवाळकर यांच्या "दंड-धारी" नाटकातही हाच जहाल–मवाळांच्या एकीचा उद्देश स्पष्ट दिसतो. इथे राजकीय मतभेदांपेक्षा सामाजिक मतभेदांचा उहापोह अधिक आहे एवढेच. पण शेवटी स्वदेशोत्कर्षासाठी ही एकी आवश्यक आहे असे स्पष्ट प्रतिपादन केलेले दिसते.

दंडधारी:— . . ."कशा रीतीने का होईना–पण आज आपणातली दुही मोडून आपण सर्व एक झालो, ही केवढी अभिनंदनीय आणि चिरस्मरणीय गोष्ट झाली पहा. आता यापुढे आपण सर्वांनी कोण-त्याही प्रकारच्या संकटांना न भीता स्वदेशोत्कर्षासाठी कायावाचामने करून झटण्याचा निश्चय करू या व समाजास ज्या सुधारणा जरूरीच्या वाटतील त्या आप-सात मतविरोध न वाढू देता सर्वांनुमते प्रचारात आणू या—" (दंडधारी : पृ. ९२)

मुख्य विषयाला जोड

कीचकवध नाटकातील राज्यकर्त्यांचा उन्मत्तपणा आणि प्रजेची लाचारी या मुख्य विषयाला जोडून विद्याधर या पात्राद्वारा शिकलेल्या विद्वानांची श्वान-वृत्ती अत्यंत सुसंगत व उपरोधिकपणे मांडण्याचा नाट-ककाराने प्रयत्न केला. नोकरीसाठी साहेबांचे पाय चाटण्याच्या वृत्तीमुळे स्वातंत्र्यसेनेतील सैनिक कमी होतात व ब्रिटिश सरकारला चळवळ आतून पोखरून काढायला सोपे जाते हे खाडिलकरांचे दुःख आहे.

"कीचक–वधा"चा संदेश

कीचकवध नाटक–खाडिलकरांचे नाटक. या नाटकातून कोणता नवा संदेश, कोणता क्रांतिकारी संदेश खाडिलकर महाराष्ट्राला देणार याकडे सर्वांचे डोळे लागले होते— गोखले पक्षीय लोकांचे सुद्धा.

या नाटकामध्ये शेवटी भीमाकडून कीचकाचा वध होतो. पण म्हणून कीचकवधाचा संदेश इंग्रज अधिकाऱ्यांचे खून करा असा होत नाही. 'साधनानाम् अनेकता' हे लो. टिळकांच्या राजकीय जीवनाचे मुख्य सूत्र होते खरे. पण परिस्थिती त्यांना दिसत होती. "राज्यकर्त्यांविरुद्ध शस्त्र चालविण्याची आमची ताकद नाही आणि इच्छाही नाही" या त्यांच्या विधानातील मर्म लक्षात घ्यावे. "कीचकाला जगातून नाहीसा करा म्हणणे सोपे होते पण कृती फार कठीण होती."

कृती कठीण होती. पण कृतिशून्य होऊन जम-णार नव्हते. टिळक आणि गोखले, जहाल आणि मवाळांनी म्हणूनच बहिष्काराच्या वृत्तीच्या कार्य-क्रमाला उचलून धरले. अन्यायाविरुद्ध प्रत्यक्ष कृती-साठी उभे राहणे हाच कीचकवधाचा महाराष्ट्रीय तरुणांना संदेश होता. हा संदेश जहालांसाठी होता, तसाच तो मवाळांसाठीही होता.

लोकप्रियता व प्रभाव

खाडिलकरांच्या या नाटकाला अमाप लोक-प्रियता लाभली. किर्लोस्करांचे 'सौभद्र' आणि देवलांचे 'शारदा' ही नाटके खूप गाजली. पण त्याहीपेक्षा अधिक खाडिलकरांचे 'कीचक–वध' नाटक गाजले. वाङ्मयदृष्ट्याही 'कीचकवध' नाटकाचे मूल्यांकन मराठी नाट्यसृष्टीतील पहिल्या दोन–चार नाटकांमध्येच करावे लागेल.

राजकारणाच्या प्रभावातून खाडिलकरांचे 'कीचकवध' साकार झाले व राजकीय असंतोष चेता-विण्याचे कार्य त्या नाटकाने पुढे चालू ठेवले. या नाट्यप्रयोगाचा केवढा जबरदस्त परिणाम त्यावेळच्या जनमनावर पडला असेल व ते केवढे लोकप्रिय झाले असेल या दृष्टीने खुद्द लो. टिळकांबद्दलची माधवराव टिपणिसांनी दिलेली एक आठवण मोठी उद्बोधक आहे. ते म्हणतात—

अनुक्रमणिका

"१९०८ साली लो. टिळक 'कीचकवध' नाटक बघत असता शेवटी भीम कीचकाच्या उरावर बसून 'कीचका ! घुंगुर्डर्या ! तुझी छाती असली तर या भीमाकडे पाहा.' अशी गर्जना करतो. तो भीमाचा अभिप्राय पाहून टिळकांमध्ये सहज क्रोध उत्पन्न झाला होता, हे मी समक्ष पाहिले. दंतकथा नव्हे." (कै. त्र्यंबक विष्णु प्रधान यांच्याबद्दलच्या सह्याद्री जाने. १९५४ मधील लेखातून.)

खाडिलकरांचे नाटक—कीचक वध

टीपा

१. अभियानाचार्य शंकरराव पाटकर, रविंद्र पाटकर, व गजानन तांडेल, मुंबई, १९६७, पृ. १८–१९.
२. लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, खं. २रा, संपा.–स. वि. वापट, पुणे, १९२५, पृ. ४८०–८१.
३. पूर्वोक्त, पृ. ४३०–३१.
४. शं. बा. मुजूमदार, अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र, पृ. १५४.
५. खाडिलकरांचा लेखसंग्रह, भाग १ला, संपा.– य. कृ. खाडिलकर, मुंबई, १९४९, पृ. २१६.
६. पूर्वोक्त, पृ. २१८.
७. लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ३रा, प्रका. केसरी–मराठा संस्था, पुणे, १९२६, लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द.
८. २९ ऑगस्ट १९०५, पृ. १५.
९. समग्र सावरकर वाङमय–१, चरित्र खंड– 'माझ्या आठवणी', महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, पुणे, १९६३, पृ. १४८–४९.
१०. अभिनव भारत, विष्णू महादेव भट, मुंबई, १९५०, पृ. २३.

शाहीर

महाराष्ट्राचे लाडके शाहीर श्री. अमरशेख यांचे दि. २९ ऑगस्ट रोजी इंदापूरनजीक मोटार–अपघात दुःखद निधन झाले. १९४२ सालची स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन त्यांनी आपल्या ओजस्वी कवनांनी गाजविले. 'कलश,' 'धरतीमाता' व 'अमरगीते' हे त्यांचे गाजलेले कवितासंग्रह.

आचार्य अत्रे त्यांच्या कवितेचे रसग्रहण करताना म्हणतात, "अमरशेख शाहीर आहेत ही गोष्ट विसरता कामा नये. शाहिराचे शब्द कानावर पडले की, वारुळातून फुंफाट करीत बाहेर पडणाऱ्या नागाप्रमाणे किंवा करवंदीच्या जाळीतून डरकाळी फोडीत बाहेर पडणाऱ्या वाघाप्रमाणे माणसाची अवस्था होते. शाहिराचे शब्द त्याची आतडी खेचतात. शाहीर हा एखाद्या कोंबड्यासारखा आहे. पडक्या घराच्या भिताडावर, शेताच्या कुंपणावर, नाहीतर कामगारांच्या चाळीच्या जिन्यावर बसून त्याला सकाळ, दुपार वक्तशीरपणे आरवावेच लागते. याचा प्रत्यय त्यांच्या दोन्ही कविता-संग्रहांतून येतो. अमरशेखांच्या शाहिरी धर्तीच्या कवितेने महाराष्ट्रातील सामान्य जनतेला मैफिलीचा शुद्ध आनंद दिला."

महाराष्ट्राच्या या लाडक्या शाहिराला युगवाणीची विनम्र श्रद्धांजली !

ओं ज ळ

—सौ. मालती नरसिंह दामले

नऊ जुलै बुधवारची रात्र. दहाही दिशांनी अंधार अधिकाधिक काळाकुट्ट होऊन भरभरून येत होता. वाऱ्याचे थैमान चालू होते. दारे खिडक्या एक सारखी आपटून भयानकतेत भर घालीत होती. खिडक्यांची तावदाने आपटतील म्हणून मी उठले व एका खोलीतील दिवा उजळला. दोन पलंगावर दोन भावंडे झोपली होती. साक्षात कारुण्याचे पुतळे वात्सल्याची प्रतिक्षा करून शेवटी थकून पहुडली आहेत असं वाटलं मला ! २६ जूनला दुष्ट काळाने ज्यांच्यावर बेसावध स्थितीत आकस्मिक झडप घातली होती त्या सद्गुणमेरु डॉ. मोरेश्वर गंगाधर दीक्षित, माझ्या यजमानांचे परमस्नेही यांची आईवेगळी अपत्ये होती ती ! त्यांना झंझावातापासून सुरक्षित ठेवण्यासाठी मी काय करू शकणार ? फक्त तावदान घट्ट लावून घेऊन मी त्यांना न्याहाळलं. आईवडिलांचं कितीतरी साम्य त्या निरागस अनागस चेहऱ्यावर दिसत होतं. तेवढंच त्यांचं चिन्ह उरलं होतं पुसटल्या पावलासारखं. पुन्हा पुन्हा चेहरे डोळ्यात भरून घेऊन मी आपल्या खोलीत जाऊन अंथरुणावर पडले. रात्र कधीच उत्तरार्धाकडे झुकली होती. माझे यजमान जागेच दिसले. अंथरुणावर निस्तब्ध पडले होते. मी मनात म्हटलं झालं. . .जो देह रात्रंदिवस सतत धडपड करीत होता, संशोधनाच्या ओढीत सदैव निमग्न होता, एकटा असूनही स्वतःला कार्यात लपेटून घेऊन होता, त्या देहाला तर मुक्त करून आत्मा तर निघून गेला, हिंदु संस्कृतीप्रमाणे आज १४ दिवस झाले. देहाची रक्षा नासिकच्या गंगेला मिळाली. तिन्ही अपत्यांना उघडं जगण्याची शिक्षा मिळाली. आत्म्याचं मुटकुळं पाणी संपलं. आत्म्याला पिंडदान झालं असेल ......मला त्या पुण्यात्म्याला त्या पवित्र चरणावर



कै. मो. गं. दीक्षित

एक ओंजळ वाहायची आहे. एकच ओंजळ......असे म्हणून मी माझ्या दोन हातांनी ओंजळ आकारली. श्रद्धांजली वाहायला रिक्त हस्त नुसती ओंजळ.

एकदम विकट हास्य माझ्या कानावर आलं. मी थरथरत्या मनाने पूज्य आबासाहेबांच्या भिंतीवर लटकवलेल्या छायाचित्राकडे पाहिले. नेहमीचं प्रसन्न मोकळं सभ्य हास्य विलसत आहे व मागे फार घाई आहे. असा चेहरा. .रिकामी ओंजळ!! मी पुटपुटले, "का ग तुलाही झोप येत नाहीय नं ! मला तर फार फार जड वाटतंय, त्या पोरांकडे पाहिलं की, पोटात नुसतं भडभडून येतंय! गेला माझा आबा." सुस्कारा टाकून माझे यजमान सांगत होते. मी निमूटपणे ऐकत होते. "आता या जन्मी पुन्हा नाही दिसायचा. गोरटेल्या वर्णाचा, भुऱ्या केसांचा, छलकाठचा बांध्याचा लहान-

पणचा आबा दिसतोय सारखा मला. त्याच्या हातातली पुष्पराग खडा झळाळणारी अंगठी, अंगातले सुळसुळणारे कोशाचे कपडे आणि चुळचुळ बुळबुळ करणारा गडबडचा वडबडचा स्वभाव. शेंदुर्णी खानदेश येथून नाशिकला शिकायला आलेले सगळे बंधू. आबा माझ्या मोठ्या भावाच्या वर्गात. कायगाव टोके येथील गोदावरीच्या अंगावर खेळणारा गोदावरीच्या तीरीच नाशिकला आलेला. एक दिवशी ऐटीत त्याने प्रश्न केला, "गोदावरी याच बाजूला आहे नं!" सगळे शाळकरी एकदम म्हणाले, "गंगा होय? अरे शेंदुर्णीच्या जहागीरदारा, गंगा म्हण गंगा इथल्या नदीला!" हसण्याचा आवाज आला व आबा पण हसला. आबा माझ्यापेक्षा ४ वर्षांनेच मोठा. पण माझे गुबरे गाल नेहमी ओढायचा नि माझ्या डोळ्याकडे कौतुकाने पाहायचा. मला आठवतंय रविवारपेठेत सुंदरनारायणाच्या देवळाच्या परिसरात गानूंच्या पागेजवळ एका वाड्यात ही सगळी मुलं राहात. सगळे भाऊ बहिणी सोबतीला कोणी आणि एखादा स्वयंपाकी व नोकर पण असायचे. मी शाळेत जायला लागलो नव्हतो तेव्हापासून सुंदरनारायणाच्या देवळातील एका ओटयावर काळ्या गुळगुळीत झुंजणाऱ्या हत्तींचे फार प्रेम असे मला. इतके की, वाटे हे हत्ती दगडाने खोदून खोदून अलगद काढून न्यावेत खेळायला. एका शनिवारी शाळेतून परत घरी येताना तीच कल्पना बळावली मनात. एक फरशीचा अणकुचीदार तुकडा घेऊन मी त्या झुंजणाऱ्या हत्तींशी झुंज देऊ लागले. आबा व माझा भाऊ त्रिंबक शाळेतून परत घरी जात होते. मला पाहून आबा जोराने ओरडला, 'ए त्रिंब्या, तुझा भाऊ काय करतोय पहा नं! आवर, त्याला आवर!' मग दोघं मजजवळ आले. आबा मला समजावून म्हणाला, "अरे हे देऊळ नीट जपून ठेवायचंय बरं! हे सगळं खूप खूप वर्षं पुरलं पाहिजे आपल्याला. आपल्या मुलांना, मुलांच्या नातवंडांना, पतवंडांच्या पतवंडांना." सगळे हसले...असं पुराणवस्तूंचं प्रेम त्याला पाळण्यापासूनच होतं. तिकीटं तर अगदी लहानपणापासूनच जमवायचा. आमचे गानु मास्तर, भाटे मास्तर आबाचा नाद पाहून चकित व्हायचे. त्याला खूप प्रोत्साहन द्यायचे. स्काऊटमध्ये आबा सर्वांत जास्त प्रकारची पाने फुले गोळा करून आणायचा. त्याच्या पुस्तकात फुलं नेहमी सुकायची. तो मधून मधून वाळलेल्या फुलांच्या पाकळ्या गोंजारत असायचा. अगंऽऽ गणपती बसला शाळेत की, आबा डोक्यावर त्रिकोनी चिवड्याच्या पुड्यासारखी टोपी घालून गळ्याला रंगीत रुमाल बांधून छान छान जादू करायचा. आम्ही खूप टाळ्या पिटीत असू. एखाद्या गोष्टीचा छंद लावून घेऊन त्यातच निमग्न होण्याची वृत्ती. चित्रकला मनात आल्याबरोबर जेमतेम दोन महिने रेघा ओढून तो एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण झाला. लगेच इंटरमिजिएट पण झाला. त्याचं चित्र काढणं संपलं की, मास्तर जबरदस्तीने ओढून घ्यायचा. नाहीतर पाचसात मिनिटात तो अगदी मळवून व बेढब मढवून टाकायचा. कारण, चित्र संपलं की, बाहेर क्रिकेटच्या खेळाकडे लक्ष वेधलं जायचं. ध्यास हा फार मोठा गुण होता त्याचा. खेळांची आवड मात्र अगदीच नव्हती. नाशिकला आम्ही सगळे क्रिकेट खेळणारे म्हणून तो उगीच थोडं खेळायचा. नदीत पोहण्यात मात्र वस्ताद. पाचही देवळे पाण्यात असायची तेव्हाही आम्ही पुरात डुबत असू. मी वाळूवर रोज बंधारे, किल्ले बांधीत होतो. सकाळी बांधलेले किल्ले संध्याकाळी उलून जायचे. मला वाटायचं आमच्यापेक्षा मोठी मुलं आमच्या आधी पोहायला यायची तेच माझं बांधकाम मोडून टाकतात. मी आबाजवळ माझे गाऱ्हाणे नेत असे. सध्या A.I.R.मध्ये श्री. राजाभाऊ सोमण आहेत त्यांचाच मला संशय यायचा. आबा म्हणायचा "बरं आपण त्याचा बंदोबस्त करून टाकू." माझ्या किल्यांचा सांभाळ करण्याचा प्रयत्न आबा करायचा. आजसुद्धा आबा महाराष्ट्रातील किल्ल्यांचं दर्शन सर्वांना घडावं म्हणून नकाशेशास्त्र हा ग्रंथ तयार करण्यातच गुंतला होता. त्याच्या कार्याचे अनेक अवशेष मुंबईच्या त्याच्या शेल्टरमध्ये दिसले मला. नाशिकच्या सीतागुंफेत आम्ही नेहमी जात असू. चांभारलेणी पाहायला गेलो की, तो लेण्यात इतका गुंगून जायचा. खिशातील खारे दाणे मी त्याच्यापुढे करायची. पण तो लेण्यात नि मी दाण्यात गुंग असंच व्हायचं. आजही त्याला जुन्या नाण्यांचा लेण्यांचा ओढा विचारू नका. भूतवर्तमानाचे धागे विणीत काळाची जोडाजोड करीत आवंढा

गिळून पुन्हा हे सांगायला लागले,......गंगेवर मड्डुम डोहावर पोहायला गेलो की आबा रंगवून सांगायचा, 'या डोहात एक मड्डुम बुडून गेली म्हणून मड्डुम डोह नाव पडलं. पण आपण या पवित्र गंगेच्या डोहाला आपलं नाव देऊ. जुनं काय असेल ते शोधून काढू.' काय शोधायचं आता!! आम्ही कितीदा तीर पार करून गेलो कोण कितीदा गेलो याची नोंद डोहाच्या तीरावर असे. गंगेच्या तरंगावरील सामर्थ्याचे तरंग रेतीवर उमटत. पैलतिरी पोहोचल्यावर ओल्या अंगाने हनुमानाप्रमाणे ठसा उमटवीत आम्ही रेतीस ओपायचो. गदा म्हणून हातात गुच्छेदार घुबकेदार फांदी. मारुतीसारखे पाय उंच उड्डाण केल्यासारखे व हात वर करून उड्डाणाचा ठसा उमटावयाचा. हे ठसे म्हणजे आमच्या पोहण्याच्या कलेचे साक्षीदार असत. आबाचे मारुती अंगाने बेताचेच असायचे व आम्हा भावांचे खूप ठाशीव. आबा सगळयांच्या मारूतीच्या ठशांच्या बाह्य रेषा ठळक, नीट करायचा. ते दिवस संपलेच पण आता गप्पासुद्धा संपल्या.

एकदा सूरसूरपारंब्या खेळताना आबा ज्या फांदीवर बसला होता ती मोडली. आबा उँ उँ ओरडत म्हणाला, "त्रिंबक, नाना मला धरा मी मेलोऽऽ" मी सर्व जोर पणाला लावून डहाळी बुंध्यापासून विलग होऊ दिली नाही. आबा अगदी हळूच उतरला. १९६५ साली त्याची प्रिय सुजाता, सुखरूप, सुशील पत्नी आमच्या वहिनी काळाने हिरावून नेल्या. आबाचे संसाररथचक्र विलग होऊन पडले तेव्हा तो प्रसंग असह्य होऊन आबा मला म्हणाला, 'नाना लहानपणी सुरसुरपारंब्या खेळतांना माझ्या तुटलेल्या डहाळीला अडवून आधार देऊन तूच मला वाचवलंस. आजही माझ्या संसाराची एक डहाळी तुटलीय मला आधार हवाय रे! तुझा आधार! बुडत्याला काडीचा आधार तसा माझा आधार पुरेसा झाला. आपली तीनही चिमणी पाखरं आबाच सांभाळून त्यांचे पंख उडण्यासाठी मजबूत करीत होता. पण त्या जटायूच्या पंखाचंच काळाने छेदन करून त्याला आज धुळीत मिळवलंय पार...मुलांची आई वारली तेव्हा मोठी मुलगी अलका कॉलेजच्या प्रथम वर्षाला होती. प्रतिकूल परिस्थितीत तोंड देऊन घवघवीत यश मिळवलं तिनं. आणि मेडिकल कॉलेजमध्ये गेली. आज शेवटच्या वर्षाला जाते तर पित्याचे छत्र हिरावलें. दुर्दैवाची परिसीमा.

मॅट्रिकची परीक्षा होऊन आबा नासिक सोडून गेला. त्यानंतर कधी ना भेट ना वार्ता. आबा व मी नागपूरलाच असून दोन भाऊ शेजारी नि भेट नाही दरबारी अशी गत होती. पण डॉ. अजय शास्त्री यांनी मला म्हटले की, "आमच्याच डिपार्टमेंटमध्ये डॉ. दीक्षित आले आहेत. त्यांना घराची फार अडचण आहे. एखादं चांगलसं घर द्याना त्यांना!" त्यांचे कळवळयाचे बोलणे ऐकून मी त्यांना माझ्या स्नेह्याचे घर दाखविण्याचे कबूल केले. मी समजत होतो डॉ. दीक्षित उत्तर हिंदुस्थानी असावेत. पण माझ्या समोर येऊन उभे राहिलेले दीक्षित पाहून आम्ही दोघे बुचकळलो. मी एकदम म्हटले, 'तूं आमचा आबा ना रे!', आमची परतभेट रामायणातील भरतभेटीपेक्षा सुंदर! दोघांनाही विस्मयाचा गोड धक्का देणारी होती. आज मात्र आम्ही खूप खूप दूर गेलो. असे म्हणून एकदम गहिवरून ते गप्प झाले, पडलेली सारी सुगंधित सुकुमार बकुळपुष्पं मी टिपून माझ्या रिक्त ओंजळीत घातली.

मनाला एकच विचार चिकटलेला होता की श्राद्ध, पुण्यस्मरण, हिंदु धर्माचा अन्त्यसंस्कार! आबासाहेबांबरोबर एकदा आम्ही दोघं येथील म्युझियममध्ये गेलो होतो सहज. हिंदुसंस्कार पाहताना अन्त्यसंस्काराकडे मी कानाडोळा केला होता व जाणूनच पलीकडे निघून गेले. तेव्हा यांनी व आबासाहेबांनी माझी खूप चेष्टा केली, ते आठवलं. "भ्यायचं काय हो याच्यात? आपण तर जीवाचं मडकं हंसत फोडू" असं म्हणून खेळकर अभिनय करणारे आबासाहेब... आज प्रत्यक्ष त्यांच्यावरच अन्त्यसंस्कार घडण्याचा रोमांचकारी प्रसंग. तोच माझ्या मनावर चित्रित होत होता. वाऱ्याची गार झुळूक लागून डुलकी लागून पेंगुळल्यासारखं वाटतंय तोच—कार्बन कागदावर पुसट नख लागलं तरी स्पष्ट ओरखडा कागदावर उमटतो तसंच झालं. माझ्या मनावरच्या पुसट विचाराचा सुस्पष्ट ओरखडा नव्हे.—आलेख माझ्या स्वप्नपटलावर उमटला. चित्रे सरसर सरकू लागली.

नाशिकच्या गंगेच्या पारावर सर्व मंडळी चिंतातूर बसली आहेत. खूप गोतावळा जमला आहे. आबासाहेबांचे वडील बंधू बाळासाहेब, अर्धांगवायूचा झटका येऊन अंग अधू झाले आहे तरी सर्व क्रियाकर्म तेच चालवीत आहेत. ताटकळत उभे राहून डोळचात प्राण आणून पिंडाजवळ कावळा यावा म्हणून प्रतिक्षा करीत आहेत. बाबासाहेब, यशवंत, मधू शरद सर्व भाऊ आहेत. सौ. हिरण्मयी व सौ. शशी त्यांच्या भगिनी शोक करीत आहेत. मित्र डॉ. केणी, डॉ. कोल्हटकर, पाटणकर उभे आहेत. त्यांची कन्या अलका, मुलगा प्रकाश, संजय हा काय प्रकार चालला आहे म्हणून भिरभिरत्या नजरेने बघत आपले मामा श्री. पेंडसे यांना बिलगली आहेत. सर्वजण मनःपूर्वक प्रार्थना करीत आहेत, 'आम्ही मुलांवर मायापाखर घालू. आत्म्या तू तृप्त हो.' पण छे ! त्या बालकांपेक्षा महत्वाच्या अशा कोणत्या तरी गोष्टींमध्ये आत्मा अडकला होता. पदर कसा सोडावा ते कळत नव्हतं....तोच त्या तंग वातावरणात दुःखावेगाने जड पावले टाकीत, पदवीदान समारंभाला काळे गाऊन घालतात तसे घालून डॉ. वि. भि कोलते, ग. ह. खरे, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, न. र. फाटक......गंभीरपणे एक आवाज निघतो—"डॉ. दीक्षित आपला सर्व संग्रह, अपूर्व संशोधन, अमूल्य ग्रंथ यांकडे किमपिही दुर्लक्ष होणार नाही !" उद्गारवाचक चिन्ह पडण्याच्या आत कावळा आतुरतेने झेप मारून येतो व नेमक्या त्या पिंडावर बसून लडिवाळपणे तो पिंड उचलतो. दुःखाने काळवंडलेल्या चेहऱ्यावर एकदम विजयाचं हास्य उमटतं व विद्युत् वेगाने नाहीसं होतं. त्याच वेगानं माझं स्वप्नजाल विरत मी आपली ओंजळ सावरत उठते व आबासाहेबांच्या छायाचित्राजवळ जाते तोच पूर्वेकडील दारातून पहिल्या रविरश्मीबरोबर डॉ. शांताबाई बापट मला हाका मारीतच प्रवेश करतात..........मी त्यांच्याकडे पाहून चेहरा प्रश्नचिन्हांकित करते आहे तोच त्या म्हणाल्या—"अगदी चैन पडेना म्हणून आले बघा उजाडताच. आबाच्या आठवणींनी मन कसं भरून आलंय." असं म्हणून त्या घळघळा आसवं गाळू लागल्या. "१९३३–३४ सालापासून माझा संबंध आलाय हो ! हे आबासाहेब शिलेदार आले मुंबईला कॉलेजमध्ये. माझा भाऊ पाटणकर व ते बरोबरच. आबाला त्याचे वडील तात्यासाहेब दीक्षित यांनी घातलं (Commerce College) वाणिज्य विद्यालयात. पण तो व्यापार केला असता तर हा संशोधनाचा व्यापार कोणी केला असता ? एवढं मोठं कुटुंब पण विद्यार्जनाच्या बाबतीत मार्गदर्शन करणारं असं कोणी नव्हतं. आवडीनिवडीप्रमाणे व्यवसाय देणे हा प्रश्नच नव्हता. तुझा मित्र किंवा माझ्या मित्राचा मुलगा आणि तू एका कॉलेजात जा म्हणजे झालं. हल्ली आपण लहान मुलांची खेळणी सुद्धा विचार करून घेतो." मीच त्यांना म्हटलं, 'शांताबाई किती वेळ उभ्या राहणार बसा तरी.' त्या बसल्यावर सांगू लागल्या—"अहो आबाला शिक्षणाचा फार ध्यास होता. वैभव लोपलं पण मुलांनी शिक्षणाची कास सोडली नाही. कॉमर्स बदलवून तो फर्ग्युसनमध्ये पुण्याला गेला. बुद्धी नव्हती पण अभ्यास दांडगा. अंगी उमेदवारी फार. पदवीधर झाल्यानंतर मुंबईला सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये आला. १९४३ साली डॉ. फादर हेरॉस यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने डॉक्टरेट मिळवली. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये क्युरेटर असताना मी भेटले त्याला. नेहमी उत्खनन असतील तेथे हटकून जायचा. बायको म्हणायची, 'वनवास चालू झाला.' मी सहज विचारलं त्याच्या पत्नीला, 'आबा आहे का घरी, वनवास, अज्ञातवास काय चालू आहे ?' तिने फक्त मंद स्मितच केले. पण आबाच गडबडीने घरातून माझं स्वागत करीत म्हणाला, '—शांताबाई अज्ञातवास भोगून झाला. मला मुंबईला होस्टेलमध्ये जागा मिळत नव्हती. मग काय ? डॉ. कोल्हटकरांबरोबर मेडिकल कॉलेजच्या होस्टेलमध्ये राहिलो नं ! त्यांच्याच पलंगावर झोपायचो. देखरेख करणारे आले तर गड्या गड्या गुपचूप...लपून बसायचं निमूटपणे. तब्बल एक दीड महिना प्रकट झालो नाही. माहीत नाही का तुला ?' जरा बसलो बोललो. चहाफराळ झाला तर त्याची वस्तू दाखविण्याचीच घाई. सदान्कदा मणी दाखवायचा. ते किती जुने आहेत हे सांगायचा, दाखले द्यायचा. शेवटी आम्ही त्याची टिंगल करीत असू—अरे आबा ती जुनी पत्रं, शस्त्रं,—मणी फणी—शिंग भिंग—हंड्या मडकी सोडून काही संसाराचं बोलशील की नाही ? जुन्या बायका सांगतात नं की, बंड्याच्या वेळी दिवस असताना प्रथम मुंबई पाहिली, कमळी

रांगायला लागली तर माझ्या भावाचं लग्न झालं तसं आबाचं चालायचं. त्रिपुरी सिरपूरच्या उत्खनना-नंतर तू भेटली होतीस ! कौंडिण्यपूरच्या वेळी ताल्या भेटला, तेरच्या उत्खननापासून मी मुंबईस गेलो नाही. जीव ओतून चिकाटीनं अविरत संशोधन करणारा एक निरलस माणूस गेला हो आपल्यातून उठून. त्याने शिलाहार वंशाचा इतिहास लिहिला, सातवाहनाची प्राचीन राजधानी पैठण येथील उत्खनन केलं. पण स्वतःला राहायला एक गाव एक घर स्थिर केलं नाही की, आपल्या वाढत्या वंशाची फिकीर केली नाही. आज इथे तर उद्या तिथे ! आज सागर युनिव्हर्सिटी तर उद्या नागपूर. पत्नी मृत्युशय्येवर आणि तार आली. महाराष्ट्र राज्यसरकारच्या पुरातत्व पुराभिलेख खात्याचा संचालक झाला. एक डोळा हसतोय व एक रडतोय अशी गत ! मुंबईला जागेची अडचण." मी मध्येच शांताबाईंना म्हटले, "स्वतःचा संसार नसला तरी अवाढव्य पुस्तकाचं बिऱ्हाड केवढं होतं ! ते पुस्तकांचं हत्ती संस्थान पाहिलं की, कवी वामन पंडित यांच्या पोथ्या उंटच्या उंट भरून उरत हे अगदी पटतं." शांताबाईंचा ओघ सुरू ठेऊन त्या म्हणाल्या--" १९६१-६२ मध्ये ब्रिटिश कौन्सिलच्या निमंत्रणावरून तेथील वस्तुसंग्रहालय नि पुराणवस्तु-शास्त्र संशोधनात्मक अभ्यासासाठी लंडनला ६ महिने होता हो तो. रोम, पॅरिस फिरून आला. तिथली वर्णनं झकास सांगायचा. पॅरिसच्या मसालेदार पदा-र्थाचं आपल्या जिभेवर चव राहील असं वर्णन करा-यचा बघा. स्त्रीदाक्षिण्याबद्दल कौतुक करायचा. मी म्हणत असे कसचं दिखाऊ स्त्रीदाक्षिण्य ! अहो आमचा आबा कुठे जेवायला गेला तरी लक्ष द्यायचा की, बाय-कांना उरलं आहे नं ! आम्ही मागून आवरायला लागलो की, मदत करायचा. घरी तर मी पाहिलं की, बायको आवरत असली तर लगेच अंथरुणापांघ-रुणाची व्यवस्था बघायचा. विशेष म्हणजे सर्व शांत असेपर्यंत मनन, अविरत धूम्रपान आणि मग डोळ्याला भिंग लावून कागदपत्रे वाचण्याचे काम ! त्याचं एक कागदपत्र पाहिलं. संस्थानचा शिक्का दिसला. मी म्हटलं, 'आबा तुम्हाला वडे समजून याच संस्थानचं लग्नविषयक पत्र आलं होतं नं ?' आबाने हसत उत्तर दिले, 'हूँ. संबंध इतकाच जुळला की, तेथील जुनी कागदपत्रे वाचून दाखवतो त्यांची मागणी असली तर. कागदपत्रापुरताच संबंध.' किती खेळकर विनोदी वृत्ती ! आणि कसा लक्ष्मीनारायणासारखा जोडा..." त्यांच्या वाणीचा ओघ एकदम थांबला. पण गळलेली कृष्णकमळं माझ्या ओंजळीतील बकुळपुष्पांवर अलगद रचली गेली.

आमची बोलणी ऐकून अलका त्यांची कन्या एकदम माझ्याकडे आली व मला म्हणाली—" काकू रात्रभर भास होतो आहे की, आबासाहेब चटईवर बसून हातात उशी घेऊन काम करीत आहेत. एकीकडे रागदारीची आवडती गाणी ऐकत आहेत. हे ख्याल-गायन भीमसेनचंच म्हणून नादलुब्ध होत आहेत. रेडिओवर राष्ट्रगीत लागतं. सूर ऐकताच ते काम झटकून नित्यसवयीमुळे शिस्तबद्ध उभे राहतात. आवडती सिगरेट मनोनिग्रह करून सोडली आहे. रात्री झोपण्यापूर्वी माता व पिता दोघांचं वात्सल्य झरणारी नजर आम्हा भावंडांवर फिरवून निमिषात निद्रिस्त झाले आहेत. सकाळी बऱ्याच उशीरा उठून पसारा पाहून म्हणतात की, काप गेले भोके राहिली. या आमच्या जहागीरदारीच्या वैभवाच्या खुणा म्हणून हसून भरभर आवरून फक्त चहाच बिन साखरेचा पीत आहेत. Cholesterol वाढतं ना म्हणून ब्रेड बटर बंद. हसत म्हणतात, 'काही हरकत नाही खाणंपिणं बंद झालं तरी--लेखन, वाचन, जागरण बंद नको. Chest Pain दिल का दर्द Palpitation दिल की धडकन् सहन करण्याचा सोशिक पिंड आहे माझा.' जुनी कागदपत्रे वाचून जुन्या लकबीची भाषाशैली त्यांना फार प्रिय. ते ऐटित म्हणत— 'संजयचे नाव सुद्धा जुने करीत--सद् अध्ययन मनो-भावे करणे इष्ट। आजचे कार्य उद्यावर घालणे परम-अनुचित। आपले मुख्य गुल्म भोसलियांचे नागपुरी काकांकडे। आमची सलावत आपलेवर पडून आपण आवाई खाल्ली नसावी। तलब चाकरी घ्यावी। जीवनाची गुरावा नीट राखावी। तसनस करो नये। " असं त्यांचं बोलणं आम्हाला पाठ झालंय हो ऐकून। सकाळची न्याहारी नंतर आंघोळ, ऑफीस, संध्याकाळी आईस्क्रिम स्लॅब खाण्याचा नेम. पण आता ती दिनचर्या संपली. माझा एक जूनला वाढदिवस म्हणून धडपडत पुण्याहून आले आशीर्वाद द्यायला.

आशीर्वाद घेऊन मी नागपूरच्या गाडीत बसले. अच्छा म्हणून मला हात हालवला व हसत म्हणाले, 'अलका तू आजपासून Major झालीस. माझ्या Guardianshipची तुला गरज नाही' गाडी हलली. त्यांचं वाक्य जणू दुष्ट काळानं ऐकलं व मला निराधार केलं, माझं छत्र ओढलं. ....." हुंदके आवरून ती म्हणाली. "त्यांचा संग्रहाचा अफाट संसार – 'मराठेशाहीतील शिलाले', 'मध्यप्रदेश के पुरातत्त्व की रूपरेखा, 'History of Indian Glass', अमोल ग्रंथ 'Indian Beads', 'नकाशेशास्त्र' मी आवरत होते. पुष्कळ फोटो सापडले. आईचा व आबासाहेबांचा वेगवेगळा फोटो मी जुळवून ठेवला. पलिकडे पाहिले. पॅरिसच्या आयफेल टॉवरच्या पायथ्याशी काढलेला त्यांचा फोटो माझ्याकडे पाहून खदाखदा हसत होता. मी एकदम डोळे मिटले. त्यांनी पूर्वी आणलेला आयफेल टॉवरची प्रतिकृती असलेला पत्र्याचा भोवरा गरकन् खाली पडला. मी डोळे उघडले. 'काळे वेट व लाल वत्ती' या नाटकाचे पहिल्या रांगेचे तिकीट हाताला लागले. मी पुटपुटले...आबासाहेब ! आधीच लालवत्ती दिसली तुम्हाला म्हणून काळ्या वेटावर गेलात तुम्ही आम्हाला इथेच टाकून ..." अलका उरी फुटून रडत होती.

माझ्या ओंजळीत तिच्या स्मृतींचे टवटवीत गुलाव ठेवले गेले. मी मनात म्हटले .... अविरत श्रम करणाऱ्या, उत्खननात, नाण्यात, लिखाणात, रममाण पावणाऱ्या, — शरीराची, कुटुंबाची, धनाची पर्वा न करता पुरातत्त्व व पुराभिलेख यावर परिश्रमांची सदैव शिंपण करणाऱ्या गंगाधरसुत – मोरेश्वरा – तुझ्या आत्म्यास वाहण्यास मजजवळ स्वत:चा दुर्वांकूर सुद्धा नाही. पण माझे यजमान – नानासाहेब दामले – भगिनी डॉ. सौ. शांताबाई बापट व मानसकन्या कु. अलका दीक्षित यांनी माझी रिक्त ओंजळ कोमल वकुळं, स्नेहाळ कृष्णकमळं व लडिवाळ गुलाव यांनी नकळत भरली आहे. तीच तुझ्या चरणी समर्पण ओंजळ ... ओंजळ ....

"इथे ओशाळला मृत्यू !"

आचार्य अत्र्यांच्या मृत्यूनंतर एक मोठी नाट्यपूर्ण घटना घडली. ती जरूर सांगावीशी वाटते. के. ई. एम. मधून आचार्यांचा मृत देह शिवशक्तिमध्ये आणण्यात आला. तिथे तो ज्यावर ठेवण्यात आला ती शय्या 'नाट्यसंपदा' या संस्थेने नाटकाच्या प्रॉपर्टीपैकी सामान वापरून घाईघाईने तयार केली होती. फुलांनी सजविलेल्या त्या शय्येवरच आचार्यांचा मृत देह दिवसभर होता. अखेर पंधरावीस मैल अंतर कापून अंत्ययात्रा दादरच्या चैत्यभूमीवर येऊन पोहोचली. मृतदेह हलवणाऱ्या एका व्यक्तीने सहजच शय्येवरील कपडा दूर केला. तेव्हा खाली फळीवर त्याला शब्द दिसले "इथे ओशाळला मृत्यू !"

पुस्तक-परीक्षण

मीच हे सांगितलं पाहिजे (एक आगळे जीवनचित्र)

--तारा शास्त्री

आमच्या लग्न-प्रसंगी आमच्या एका वऱ्हाडी मित्राने संपूर्ण ज्ञानकोशाचे खंड आम्हाला भेट म्हणून दिले आहेत. अनेकदा हारीने लावलेल्या ज्ञानकोशाचा एखादा खंड बाहेर निघतो आणि हवी असलेली माहिती अचूक त्यातून मिळाली म्हणजे प्रत्येक वेळी ज्ञानाचं सारं भांडार आपल्या मुठीत आल्याचा आनंद होतो. त्यानिमित्ताने, मग, ज्ञानकोषकार केतकरांची स्मृती ताजी होऊन मन भरून येतं. असा ज्ञानवंत, असा पंडित, असा प्रौढ प्रज्ञेचा माणूस महाराष्ट्रात जन्माला यावा, यावद्दल अभिमानाने मन फुलतं. अगदी अलीकडे शीलवतीबाई केतकरांचं, " मीच हे सांगितले पाहिजे " हे पुस्तक वाचून संपविलं, आणि माझ्या मनात विचार आला, की 'ज्ञानकोश, हा केतकर पति-पत्नीच्या अमर प्रीतीचा स्मारक ग्रंथ' म्हणून मानला, तर त्यात कुणालाही अतिशयोक्ती वाटायला नको. नवविवाहित दंपतीला समग्र ज्ञानकोष भेटी दाखल देताना, आमच्या वऱ्हाडी मित्राने न कळतच पण फार मोठी योजकता दाखविली होती.

असं मी म्हणते ह्याला कारण आहे. शीलवतीबाईंचं पुस्तक वाचून मी संपविलं आणि केतकरांच्या आधी शीलवतीबाईंचच सारं सोज्ज्वळ व्यक्तिमत्व अगदी सहजपणे माझ्या मनश्चक्षूंसमोर उभं राहिलं. ही अशी पत्नी, – हा असा पती ! विधात्याला कधी कधी जोडे काय अचूक जमविता येतात नाही ? आर्य स्त्रीचा युगायुगांतरीचा जपणुक केलेला दिमाख, ह्या आंग्ल-जर्मन युवतीने, आपल्या एकाच जन्मीच्या संसाराचा जिवंत दाखला निर्माण करून पार उधळून लावला. का तिच्यातल्या व्हिक्टोरियन संस्कारांपेक्षाही तिचे आर्य-जर्मन संस्कार अधिक प्रभावी ठरले ? गृहिणी, सचिव, सखी, प्रियशिष्या ह्यापैकी कोणत्या नात्याला शीलवतीबाईंनी अधिक उठाव आणला होता, हे सांगणे कठीण आहे. किंवहुना असं म्हणता येईल की, ह्या आणि अशा अनेक गुणसमुच्चयाच्या योगाने, शीलवतीबाईंचं एक नवीनच असं आगळं – अत्यंत विनम्र आणि विलोभनीय पत्नीत्व साकार झालेलं होतं.

केतकरांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाने भारावून गेलेल्या शीलवतीबाई, त्यांच्या अनेक आठवणी आजही अगदी ताजेपणाने अंतःकरणात वागवून आहेत. केतकरांमध्ये त्यांनी अनुभवलेला प्रेमळ पती, वत्सल पिता, जीवाला जीव देणारा सहचर, निधड्या छातीचा धीरोदात्त आणि चारित्र्यवान पुरुष, ध्येयाला वाहून घेतलेला निष्ठावंत कर्मयोगी आणि तरीही पत्नीच्या आणि मुलांच्या सहवासात रमणारा आणि विसावा शोधणारा कुटुंबप्रमुख, जीवनातला मिळेल तो आनंद खुलविणारा खिलाडी, सौंदर्याचा रसास्वाद घेण्याकरता पाय खिळवून स्थिरावणारा रसज्ञ, क्षुद्र आचार-विचारांपासून योजनं दूर असलेला उमदा दिलखुलास गडी, प्रकाशाची पूजा करणारा, काळाच्या पुढे सतत झेप घेत जाणारा स्वतंत्र प्रज्ञावंत, आणि मानवतेच्या मूल्यांची जोपासना करणारा सश्रद्ध महामानव, त्यांनी अगदी मोजक्या, सरळ शब्दात रंगविला आहे. पत्नीने, पतीचं अतिरंजित चित्र रंगविण्याचा अपराध-क्षम्य असला तरी-आपल्या हातून घडू नये, आपल्या पतीचे शंभर टक्के यथातथ्य चित्रण करून, त्याच्यावर अन्याय करणाऱ्या टीकाकारांची तोंडं बंद करावी ह्या विशेष कटाक्षाने, त्यांनी शब्दातून भावना काढून घेण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या आठवणींच्या माध्यमातून 'केतकर खरे कसे होते,' तेच दाखवि-

ण्याचा शीलवतीबाईंचा प्रयास आहे. ह्या पुस्तकातून प्रकट होणाऱ्या सत्याच्या प्रकाशाने अंधार निवळेल, आणि, केतकरांसारख्या महान् पुरुषाच्या व्यक्ती-मत्वाच्या महानतेचा परिचय खऱ्या अर्थाने महाराष्ट्रा-तल्या जनतेला घडून येईल, ही त्यांची किमान अपेक्षा, हे पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या मुळाशी आहे. आणि म्हणूनच तो परिचय घडवून देण्याचं कार्य, पत्नी या नात्याने आपलं कर्तव्य म्हणून त्यांनी शिरोधार्य मानलं. ईश्वरी कृपेने महाराष्ट्राला केतकरांच्या रूपाने एका अनमोल ठेव्याचा लाभ झाला; आंधळेपणाने, त्याची किंमत न समजण्याचा कर्मदरिद्रीपणा महाराष्ट्राच्या वाट्याला येऊ नये, त्या पापाचे धनी होण्यापासून मराठी माणसाला वाचवावं, असंच शीलवतीबाईंचं हे कार्य आहे.

ऐंशी वर्षेपर्यंत जगून अविरत कार्यसाधना करण्याची केतकरांची इच्छा होती. कदाचित् पत्नीमागे एकाकं जीवन जगण्याचा प्रसंग आपल्यावर आला तर? जीवनातून प्राण निघून गेल्यासारखं होणार होतं हे नक्कीच! पण म्हणून जीवनाकडे पाठ वळ-वायची होती थोडीच? मग कार्य – आणि सतत कार्य–हेच केतकरांचं जीवन–सर्वस्व ठरणार होतं. नियतीची इच्छा मात्र वेगळी होती. वयाच्या ५२ व्या वर्षी केतकरांना मरण आलं. प्रकाशाचा ध्यास घेऊन जो दुर्दम्य आशावाद त्यांनी आयुष्यभर मनात बागवला, त्याला तडे जावेत असे अनेक प्रसंग आयुष्यात आले, अनपेक्षित पाठीकडून आलेल्या घावांनी मन अनेकदा विषण्ण झालं आणि शेवटी उभारलेला कार्याचा डोलारा आणि आत प्राणपणाने जपलेलं घरकुल, घरधन्याच्या अभावी पुरं हादरून गेलं. अपार कारुण्याने भरलेल्या ह्या घटनांचं वर्णन करताना मात्र शीलवतीबाईंचे शब्द ओले झाले आहेत. तो ओलेपणा टिपल्यावाचून, वाचकांचे डोळे रहात नाहीत.

इंग्लंडमध्ये असताना, तिथेच प्राध्यापकाच्या जागेकरता केतकरांनी अर्ज केला होता. होकाराचं उत्तर येईल अशी आशा, त्यांना वाटत होती. पण अपेक्षित उत्तर आलं नाही. आणि तशातच वडील बंधूंच्या मृत्यूची वार्ता त्यांच्या कानावर आली. हिंदुस्थानात परत जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि नंतर नोकरीचा हुकूम त्यांच्या हाती पडला. पण आता उशीर झाला होता. त्या प्रसंगाला अनुलक्षून शीलवतीबाईंनी उद्गार काढले आहेत,— "केतकरांनी प्राध्यापकाची जागा स्वीकारून इंग्लंडमध्येच रहाण्याचा निर्णय घेतला असता तर—! तर मग आमच्या जीवनाचं चित्र किती तरी वेगळं झालं असतं!" आणखीही एका प्रसंगी हेच उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले आहेत. शीलवती-बाईंच्या वडिलांच्या धंद्यात आपल्याला भागीदारी मिळावी अशी केतकरांची इच्छा होती. पण संकोचाने तसं ते त्यांच्या जवळ बोलले नाहीत "बोलले असते तर? वडिलांनी आनंदाने कबुली दिली असती," असं शीलवतीबाईंना वाटलं. "आणि मग—? मग आपल्या आयुष्याचं चित्र कितीतरी वेगळं झालं असतं!" असं पुन्हा त्यांच्या मनात आलं. केतकरांसारख्या महान् व्यक्तित्वाच्या माणसाला आयुष्यभर जी उपेक्षा सहन करावी लागली आणि त्यांच्या माग शीलवतीबाईं-च्याही, जे उपेक्षित जीवन वाट्याला आलं, त्या इति-हासाच्या पार्श्वभूमीवरून पहाता, मातृभूमीबद्दलची अशी nostalgic ओढच त्यांनी न कळत आपल्या शब्दा-तून प्रकट केली होती, असचं नाही का म्हणता येणार? दुर्गाबाई भागवतांजवळ शीलवतीबाईंनी त्यांच्या एका पोलक्याचा फाटका तुकडा मागितला होता. ह्या पोलक्याच्या हिरव्या कापडावर बारीक निळी फूलं रेखाटलेली होती. इंग्लंडच्या भूमीवर प्रत्यही फुलणारी हिरवळ आणि त्यावर शोभून दिस-णाऱ्या त्यांच्या आवडत्या नाजूक निळ्या लव्हेंडरच्या फुलांची आठवण करून देणारे ते रंग होते. फुलांच्या नुसत्या आठवणींनी त्यांचा वास आजूबाजूला दरवळू लागल्यासारखा त्यांना वाटे. अंतरीच्या ह्या ओढीला दुर्लक्षून शीलवतीबाईंनी केतकरांना आपले जीवन सर्वस्व अर्पण केलं. ज्या विश्वासाने त्यांनी हे केलं, तो विश्वास अपार खराच! केतकरांच्या मृत्यूनंतरही त्यांची ही श्रद्धा विचलित झाली नाही. ईश्वराच्या मोठे-पणाला तोड नाही. पण माणसाची श्रद्धाच ईश्वराला मोठं करीत असते ना? सुशिक्षीत, ज्ञानपिपासू, डोळस आणि बुद्धिवादी अशा शीलवतीबाईंसारख्या स्त्रीच्या श्रद्धेचं महत्त्व साध्या भोळ्या श्रद्धेपेक्षा अर्थात अधिक मोठं! अशा श्रद्धेच्या अधिष्ठानाचा महिमा गावा तरी किती?

त्या श्रद्धेला अनुलक्षून माझ्या मनात विचार आला,— शीलवतीबाईंच्या ह्या आठवणी लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांची आठवण देणाऱ्या आहेत. एकदा 'स्मृतिचित्रां'ची मी माझ्या शेजारणीजवळ प्रशंसा करीत होते. शेजारणीची 'स्मृतिचित्रां'बाबतची प्रतिक्रिया मला जरा अनपेक्षित होती. ती म्हणाली होती,– 'शाबास आहे त्या बाईची ! शेवटपर्यंत नवऱ्याचा छळवाद सहन करीत राहिली.' मी बोलले नाही. मनात आलं,–'आपल्याच रंगात रंगलेल्या त्या फकिराचं–टिळकांचं–अंतरंग लक्ष्मीबाईंनी ओळखलं आणि त्या अंतरंगीच्या मोठेपणापुढे त्या विनम्र झाल्या हीच तर लक्ष्मींबाईंची महती !' केतकर असेच आपल्या रंगात रंगले होते. पण त्या रंगात शीलवतीबाईंनी आणि मुलांनी भरलेल्या रंगाचं, त्यांचं भान जागं होतं. म्हणून तर दुर्गाबाईंनी, प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, केतकरांच्या छळवादीपणाचा त्यांनी थट्टेत केलेला उल्लेखही शीलवतीबाईंना आवडला नव्हता. त्या झटकन् उत्तरल्या होत्या. "छे छे ! मला त्यांनी कधीच कसलाही त्रास दिला नाही."

आणि खरं म्हणजे शीलवतीबाईंचा आणि केतकरांचा, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रेमविवाह इतर अशाच चारचौघांच्या विवाहासारखा नव्हताच मुळी ! सार्वजनिक मेजवान्यांच्या किंवा नृत्यगायनाच्या प्रसंगी काही त्यांची भेट झाली नव्हती. ती घडवून देण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय पातळीवरून परस्परांशी सामंजस्य आणि सद्‌भाव निर्माण करण्याकरता सुरू केलेल्या एका क्लबमध्ये, समान विचाराच्या लोकांना एकत्रित आणण्याच्या प्रयत्नातला हा एक प्रयत्न होता. आणि स्वत:शीलवतीबाईंच्या वडिलांनी या बाबतीत पुढाकार घेतला होता. डॉक्टर केतकर ह्या तरुणाच्या बुद्धीचा, ज्ञानाचा, त्यांच्या आगळ्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जसा शीलवतीबाईंच्या वडिलांवर पडला तसाच तो शीलवतीबाईंवरही पडल्याविना राहिला नाही. केतकरांचं दारिद्र्य उघडपणे पहाण्याचे अनेक प्रसंग आले, तरीही केतकरांच्या प्रतिमेची जी छाप शीलवतीबाईंच्या मनावर पडली होती तिला कधी तडे गेले नाहीत. १९१२ मध्ये केतकर इंग्लंडमधून परत हिंदुस्थानात आले. एकीकडे पुन: कधीही भेट न होण्याची खात्री असतानाही, सतत सात वर्षे दोघांनी पत्ररूपाने आपले संबंध तसेच कायम ठेवले होते. दोघांच्या मनात परस्परांविषयीच्या भावनांची बैठकच अशी पक्की जमली होती की, दारिद्र्य, आपत्ती किंवा लहान सहान मतभेदाच्या बाबटळींनी तिला हादरा बसणं अशक्य होतं. केतकरांनी आपल्या प्रेमाचं सोनं, खरोखरीच तावून सलाखून जोखून घेतलं होतं. म्हणूनच शीलवतीबाईंनी म्हटल्याप्रमाणे, 'नवऱ्याच्या घरी मोऱ्या पुसण्याचं कामही त्यांनी आनंदाने केलं.'

शीलवतीबाईंचं जीवनच केतकरमय झालं होतं. केतकरांचं घर, त्यांचं कार्य, त्यांचा धर्म, त्यांचा महाराष्ट्राभिमान त्यांनी स्वेच्छेने अंगिकारला होता. ह्या अंगीकृत कार्यात त्यांची सुखं दु:खं केतकरांच्या सुखदु:खात मिळून गेली होती. शीलवतीबाई केतकर आणि लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्यातलं साधर्म्य मला वाटतं असं सांगता येईल,––दोघीही हाडाच्या स्त्रिया ! त्यांची स्त्रीजात, स्त्रीधर्म एकच ! समांतर रेषेत अंतरावर वहाणारे दोन्ही पतिपत्नींचे जीवनप्रवाह अनंतापर्यंत पोहोचायच्या आधीच एकरूप करून दाखविण्याची अजब किमया दोघी स्त्रियांनीच करून दाखविली. दोन्ही पुस्तकांच्या यशाचं मर्म मला वाटतं हेच असावं !

पुस्तकाला दुर्गाबाई भागवतांनी सुंदर प्रस्तावना लिहिली आहे. खरं म्हणजे समीक्षकांनी म्हणण्यासारखं बाकी त्यांनी काही उरवलंच नाही. राय ओलेतीकरांचा अनुवादही चांगला उतरला आहे. ह्या सगळ्यांचं वैयक्तिक श्रेय एकसमयावच्छेदेकरून श्री. हरिभाऊ मोटचांच्या वाट्याला आलं आहे. इतक्या चांगल्या पुस्तकाच्या प्रकाशनाबद्दल त्यांचं अभिनंदन करणं जरूर आहे.

अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

चंद्रकांत कुळकर्णी

१

'भास्करबुवा बखले'

लेखक — नीलकंठ महादेव केळकर
प्रकाशक — कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई २.
मूल्य — पंचवीस रुपये.

'तृप्ति होऊनही अतृप्ति शिल्लक' असे ज्यांच्या गायकीचे वर्णन केले जाते त्या भास्करबुवा बखल्यांची जन्मशताब्दी आक्टोबर महिन्यात सर्व देशभर धुमधडाक्यात साजरी होणार आहे. भास्करबुवांनी अभिजात संगीत सर्वसाधारण समाजापर्यंत पोचविले व नाटचसंगीताला अभिजाततेच्या पातळीवर आणले. बुवांची महाराष्ट्राला लाभलेली अमोल देणगी म्हणजे नाटच-संगीत होय! या देणगीचा विसर मराठी रंगभूमीला कधीही पडणार नाही. बुवांच्या सांगीतिक आयुष्याची सुरवातच नाटकापासून झाली होती व त्यांना शागीर्द मिळाले, तेही गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, जगन्नाथबुवा पंढरपूरकर ह्यांच्यासारखे रंगभूमी गाजविणारे नटच. 'स्वयंवर' नाटकाला १९१६ साली बुवांनी चाली देऊन नाटचसंगीताला एक क्रान्तीकारक वळण लावले. अशा या श्रेष्ठ गायकाचे चरित्र लिहून चित्रकार नीलकंठ महादेव केळकर यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे.

मराठी चरित्र वाङ्मयात गायकांचे चरित्र-ग्रंथ अवघे तीनच. एक कै. इंगळे-बुवांनी लिहिलेले कै. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे, दुसरे श्री. विनायकराव पटवर्धन यांनी लिहिलेले पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचे आणि तिसरे कै. गोविंदराव टेंबे यांनी लिहिलेले म. अल्लादियाखांसाहेबांचे. या दृष्टीने या ग्रंथाचे महत्त्व फार आहे. श्री. नी. म. केळकर हे सुप्रसिद्ध चित्रकार आहेत तसेच ते प्रसिद्ध वाङ्मयसेवकही आहेत. हरि नारायण आपटे यांचे चरित्र, डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यांचे व संशोधन ग्रंथांचे संपादन त्यांनी केले आहे. नृत्य आणि नाटच ह्या विषयातही अवगाहन करून, 'चित्र व शिल्प' हा प्रदीर्घ प्रबंधही लिहिला आहे. १९१३ ते १९२२ सालापर्यंत भास्करबुवांची पुण्यातील एकही मैफल केळकरांनी चुकविली नाही. बुवांनी केळकरांना गाणेही शिकविले आहे. अशा या रसिक कलाकाराने लिहिलेले प्रस्तुत चरित्र भास्करबुवांच्या कलेचे दर्शन रसिक वाचकांना देईल यात शंका नाही. या चरित्र ग्रंथाचा आणखी एक विशेष सांगायला हवा. चरित्राच्या शेवटी परिशिष्टे जोडली असून त्यात अनेक गायकांच्या, शिष्यांच्या, गुरूबंधूंच्या आणि इतर मित्रांच्या आठवणी दिल्या आहेत. सुप्रसिद्ध संगीत समीक्षक श्री. वामन हरि देशपांडे यांनी या पुस्तकाला मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. भास्करबुवांचे अनेक दुर्मिळ फोटोही पुस्तकात देण्यात आले आहेत.

श्री. नी. म. केळकर यांनी प्रस्तुत चरित्र ग्रंथ लिहून मराठी-संगीत वाङ्मयात व चरित्र वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

२

ह. भ. प. प्रा. सोनोपंत दांडेकर यांचे चरित्र

लेखक — स. के. नेऊरगांवकर
प्रकाशक — प्रा. दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे २.
मूल्य — रुपये बारा.

पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा गाढ, मार्मिक व तुलनात्मक अभ्यास, महाराष्ट्रीय संतवाङ्मयाचा सखोल, अनुभविक व मार्गदर्शक व्यासंग, वारकरी संप्रदायातील थोरवी, विशुद्ध चारित्र्य, उज्ज्वल देशभक्ती आणि आदर्श देवभक्ती या अपूर्व

गुणसंगमामुळे प्राचार्य सोनोपंत दांडेकर हे साऱ्या महाराष्ट्राला परिचित व प्रिय होते.

'ज्ञानकोशा'त वारकरी पंथाच्या इतिहासाविषयी सोनोपंतांनी दिलेला लेख, गुरूदेव रानडयांच्या 'मिस्टिसिझम इन् महाराष्ट्र' या सुप्रसिद्ध ग्रंथातला एकनाथी भागवतावरचा भाग, रानडयांच्या संतवचनामृतमालेतील ज्ञानेश्वर व तुकाराम यांच्या वचनावरच्या टीपा. 'ज्ञानेश्वर चरित्र', 'ग्रंथ व तत्त्वज्ञान' आणि 'ईश्वर दर्शन' ही स्वतंत्र पुस्तके आणि सोनोपंतांनी संपादिलेली ज्ञानेश्वरीची आवृत्ती त्यांच्या विद्वतेची व अधिकारवाणीची साक्ष देतात.! 'केसरी प्रबोधा'तील त्यांच्या 'ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी' याविषयीचा लेख, 'कल्याण' या हिंदी मासिकाच्या नामांकातला लेख आणि तत्त्वज्ञानावरील अनेक निबंध वगैरेंचा स्थलाभावी केवळ निर्देश करता येईल. त्यांचे आदरणीय वैशिष्टच असे की, विद्वज्जनांतच न रमता ते सर्वसामान्य जनतेत आले व संतवाङ्मयाद्वारे त्यांनी तत्त्वज्ञानाचा भक्तिपंथाचा दूर प्रसार केला. अशा या संतवाङ्मय अभ्यासकाचे चरित्र नुकतेच त्यांच्या एका भक्ताने प्रसिद्ध केले आहे.

या चरित्राचे लेखक श्री. स. के. नेऊरगांवकर हे सोनोपंत दांडेकर यांचे निकटवर्ती शिष्य आहेत. त्यांनी तीन तपे मामासाहेबांची – कीर्तने–प्रवचने ऐकली आहेत. मामासाहेबांचा त्यांना दीर्घ सहवास झाला आहे. मामासाहेबांना भेटण्यास आलेल्या मंडळींशी जी संभाषणे होत त्यांपैकी अनेक संवादांची नोंद त्यांनी आपल्या टिपणवहीत वेळच्या वेळी करून ठेवली आहे. त्यामुळे प्रस्तुत चरित्राला आगळे महत्त्व आहे. सोनोपंतांच्या चरित्रावरोबरच त्यांचे एक प्रवचन, मामांच्या आठवणी यांचा अंतर्भाव या ग्रंथात करण्यात आला आहे. मामांचा लेखसंग्रह या प्रकरणात (प्रकरण १७ वे) दांडेकरांच्या लेखनासंबंधी संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. ती अभ्यासकांना अत्यंत उपयोगी पडेल. मामासाहेबांचे काही दुर्मिळ फोटो व त्यांच्या हस्ताक्षराची फोटोप्रतही या पुस्तकात देण्यात आली आहे.

विनंती

विदर्भातील सर्व लेखकवर्गास विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या लेखन कार्याची सर्व माहिती विदर्भ साहित्य संघाला कळवावी. या माहितीत लेखकांनी लिहिलेल्या सर्व पुस्तकांची व संकल्पित लेखनाची माहिती असावी. प्रकाशित पुस्तकांसंबंधी पुढील माहिती अवश्य द्यावी, ही विनंती.

१. पुस्तकाचे नाव २. प्रकाशक ३. प्रकाशनकाल ४. प्रकाशन स्थळ, ५. आवृत्ती. पुस्तकासंबंधी ह्या विशेष माहितीसह लेखकाने आपल्या प्रत्येक पुस्तकाची एक प्रत संघात पाठविल्यात ती संघाच्या संदर्भ ग्रंथालयात ठेवण्यात येईल.

“ Bee ”

वन्दन चरणी, वन्द्य कविवरा विनम्र भावाने ।
महाराष्ट्रकवितेस प्रतिष्ठा तुझ्या प्रभावाने ॥
काव्यकला उजळली हृदयिच्या भावदीप्तिने तव ।
प्रगत रंगले चित्ररेखनी रचनेचे पाटव ॥
कल्पकतेला फुलोर आला सुगंध दरवळुन ।
विचार अन् भावना खेळती करात कर धरुन ॥
‘ सौंदर्याचे कुंजी रुंजी ’ घालसि मधु सेवुन ।
सार्थच झाले नामधेय ‘ Bee ’ अभिनवता राखुन ॥
निसर्ग–मानव–नाते केले स्पष्ट बजावून ।
वात्सल्याचे लेणे काव्यी ठेवियले जपुन ॥
साहित्यगुणी “ कमळा ” शोभे काव्यपद्मि कमला ।
‘ चांपया ’ भवती ‘ पिंगा ’ घालुनि रसिक घेति ‘ बकुळा ’ ॥
नवकाव्याला बहर आजला; उद्या जुने तेच ।
नवे जुने संकोच वृत्तिचा, परंपरा तीच ॥
चला कवींनो, चला रसिकहो चला वन्दनाला ।
भाव—‘ फुलांची ओंजळ ’ वाहू कविप्रिय “ Bee ” कविला ॥

—ज्ञानेश्वर साधु

संपादकीय

मुंबईत विदर्भभवन बांधण्याची योजना

ता. ६ ऑगस्ट १९६९ रोजी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून, तीत मुंबई शहराच्या मध्यभागी विदर्भातील लोकांना अनेक दृष्टींनी उपयुक्त होईल, अशा प्रकारचे 'विदर्भभवन' बांधण्यासाठी, 'विदर्भ प्रगती ट्रस्ट' स्थापन करण्यात आला. स्वतः मुख्य मंत्री हेच या ट्रस्टचे अध्यक्ष असून, अर्थमंत्री बॅ. वानखेडे, श्रममंत्री श्री. तिडके, वनमंत्री श्री. तिरपुडे आणि बांधकाममंत्री श्री. वैराळे हे या ट्रस्टचे सदस्य आहेत. मंत्रिमंडळातील सर्व वैदर्भीय मंत्री आणि उपमंत्री हे या विश्वस्त निधीला आपला एक महिन्याचा पगार देणगी म्हणून देणार आहेत; व विदर्भातल्या आठ जिल्ह्यातून प्रत्येकी तीन लाख रुपये या निधीसाठी जमा करण्यात येणार आहेत. अशा रीतीने २५ लाख रुपयांचा निधी या ट्रस्टसाठी तीन महिन्यात गोळा करण्यात येईल; व विदर्भभवनाचे काम हाती घेतले जाईल. या भवनात सार्वजनिक कामासाठी किंवा कॅन्सरसारख्या असाध्य रोगांवर उपचार करून घेण्यासाठी विदर्भातून मुंबईस जाणाऱ्या लोकांची उतरण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे, विदर्भातील उद्योगधंदे, कलाकौशल्य, सरकारी उपक्रम, सार्वजनिक योजना वगैरेची माहिती देणारे केंद्रही या भवनात उघडण्यात येईल.

मुंबई शहरात अशा प्रकारचे भवन बांधण्याची कल्पना प्रथम विदर्भ साहित्य संघाने १९६२ च्या जुलै मध्ये त्या वेळचे बांधकाममंत्री श्री. मा. सां. कन्नमवार यांना सादर केली होती. या कल्पनेचा विचार करण्यासाठी श्री. कन्नमवार यांनी, मंगळवार ता. २४ जुलै १९६२ रोजी, मुंबई येथे आपल्या बंगल्यावर विदर्भ साहित्य संघाचे काही प्रमुख कार्यकर्ते आणि मुंबईतीलही काही वैदर्भीय कार्यकर्ते यांची बैठक बोलाविली होती. या सभेत श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्रीमंत सौ. सुमतीबाई धनवटे, श्री. द. ग. गोडसे, श्री. प्र. ना. इंदूरकर, श्री. केशव केळकर प्रभृती कार्यकर्त्यांची भाषणे झाली; व मुंबई मराठी साहित्य संघातर्फे त्या संघाचे कार्यवाह श्री. बापूराव नाईक यांनीही या कल्पनेचे स्वागत केले. या सभेत श्री. माडखोलकर यांनी जो ठराव मांडला होता, तो खाली दिला आहे:—

"मुंबई येथे 'विदर्भ साहित्यभवन' या नावाने विदर्भ साहित्य संघाची इमारत मध्यवर्ती ठिकाणी बांधण्यात यावी. ही इमारत बांधण्यात पुढील उद्देश आहेत:—(अ) विदर्भ साहित्य संघाच्या मुंबईतील आणि पश्चिम महाराष्ट्रातील केंद्रांचे कार्यालय या इमारतीत ठेवण्यात यावे; (आ) विदर्भासंबंधीचे सर्व प्रकारचे संदर्भग्रंथ, वैदर्भीय लेखकांचे साहित्य आणि इतर मराठी साहित्य यांचे ग्रंथालय ठेवण्यात यावे; (इ) विदर्भातील कलाकौशल्याचे आणि विदर्भात मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या विशिष्ट वस्तूंचे प्रदर्शन या भवनात ठेवण्यात यावे; (ई) विदर्भातील साहित्यिक, पत्रकार आणि कार्यकर्ते यांची उतरण्याची व्यवस्था त्यांत करण्यात यावी; व (उ) निरनिराळे सांस्कृतिक कार्यक्रम करून मुंबई शहरातील आणि पश्चिम महाराष्ट्रातील साहित्यसंस्था आणि जनता यांच्याशी संपर्क वाढविण्यात यावा."

या सभेनंतर लगेच श्री. दादासाहेब कन्नमवार, श्री. माडखोलकर आणि श्रीमंत सौ. सुमतीबाई धनवटे यांनी महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची भेट घेतली; व त्यांना हा ठराव

अनुक्रमणिका

सादर केला. त्या वेळी श्री. चव्हाण यांनी असे आश्वासन दिले की, "विदर्भ साहित्य संघाने मुंबई शहरात, 'विदर्भ साहित्यभवन' बांधण्याची ही जी योजना हाती घेतली आहे, तिच्यामुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यामध्ये भावनात्मक ऐक्य वाढावयाला मदत होईल. सरकार या भवनाला जागा देईल; व इतरही मदत सरकारकडून मिळेल."

या नंतर श्री. कन्नमवार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई आणि नागपूर या दोन ठिकाणी आणखी दोन वेळा सभा होऊन, श्री. कन्नमवार यांच्या अध्यक्षतेखाली या कामासाठी ट्रस्ट स्थापन करण्यात यावा व जागेसाठी महाराष्ट्र सरकारला विनंती करण्यात यावी, असे ठरले. त्याप्रमाणे, पत्रव्यवहार चालू असतानाच श्री. कन्नमवार हे मुख्य मंत्री झाले; व विदर्भ साहित्य संघाला वरळीच्या भागात जागा देण्याचा आपला विचार असल्याचे सरकारकडून वि. सा. संघाच्या पदाधिकाऱ्यांना कळविण्यात आले. श्रीमंत सौ. सुमतीबाई धनवटे या ती जागा पाहूनही आल्या. पण, दुर्दैव असे की, ती जागा ताब्यात घेण्यासाठी वाटाघाटी चालू असतानाच, श्री. कन्नमवार यांना अचानक देवाज्ञा झाली. त्यानंतर तांत्रिक अडचणी दाखवून वि. सा. संघाला जागा देणे शक्य नसल्याचे सरकार कडून कळविण्यात आले !

अशा रीतीने 'विदर्भ साहित्यभवन' बांधण्याची विदर्भ साहित्य संघाची योजना जरी कायमची मागे पडली असली, तरी आता खुद्द मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेला 'विदर्भ प्रगति ट्रस्ट' तीच योजना हाती घेत आहे, याबद्दल कोणालाही समाधान वाटेल. आम्हाला उमेद आहे की, हे 'विदर्भभवन' मुंबई शहराच्या मध्यभागी सोईस्कर जागी लवकरच उभारले जाईल.

मराठी स्वाध्याय–संशोधन–पत्रिका

हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे निघणाऱ्या मराठी स्वाध्याय–संशोधन पत्रिकेचा १९६९ सालचा हा चतुर्थांक 'युगवाणी'कडे भेटीदाखल आला आहे. ही भेट सर्वच दृष्टींने आम्हाला स्वागतार्ह वाटली. जुन्या निजाम–हैद्राबाद संस्थानात मराठवाडा हा सुमारे सहा जिल्ह्यांचा आणि साठ लाख लोकसंख्येचा मराठी विभाग होता. १९६० साली हैद्राबाद संस्थानातील हा मराठवाडा, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेबरोबर, त्या राज्यात आला. पण, त्यापूर्वी सुमारे दोनशे वर्षे हा भाग निजामाच्या संस्थानात राहिल्यामुळे, त्याची राजधानी जे हैद्राबाद शहर, तेथे महाराष्ट्रीयांची लोकसंख्या सतत वाढती राहिली. रायरायान, नेमिवंत, नाईक, कोरटकर इत्यादि महाराष्ट्रीय घराणी या राजधानीच्या शहरात मानमान्यतेला चढली. त्यांचे मोठमोठे वाडे अजूनही हैद्राबाद शहरात आहेत.

त्यामुळे, हैद्राबाद येथे उस्मानिया विद्यापीठ स्थापन झाल्यावर त्याचे स्वरूप जरी भाषेच्या दृष्टीने ऊर्दूप्रधान होते, तरी हैद्राबाद शहरातील आणि मराठवाड्यातील आपल्या सत्तर लाख मराठी प्रजाजनांसाठी त्या विद्यापीठात मराठी विभाग उघडणे निजाम सरकारला भाग पडले. प्रो. चिं. नी. जोशी, प्रो. र. म. भुसारी, प्रो. डॉ. नारायणराव नांदापूरकर, प्रो. रा. ब. माढेकर यांच्या सारख्या मराठीच्या निष्ठावंत अध्यापकांनी या विद्यापीठात, अतिशय प्रतिकूल परिस्थितीत, मराठीचा व्यासंग आणि संशोधन यांची परंपरा निर्माण केली. ती परंपरा मराठी विभागाचे आजचे प्रमुख प्रो. डॉ. श्री. रं. कुळकर्णी आणि त्यांचे सहकारी चिकाटीने पुढे चालवीत आहेत, याबद्दल त्यांना धन्यवाद देणे अवश्य वाटते. कारण, हैद्राबाद संस्थानाचे विभाजन झाल्यावर, मराठवाडा महाराष्ट्र राज्यात आला; व हैद्राबाद शहर ही आंध्र देशाची राजधानी झाली. त्यामुळे, त्या शहरात आणि तेलंगणात जी काय मराठी वस्ती शिल्लक उरली, तिच्यापुरतेच मराठी भाषेचे अस्तित्व आणि महत्त्व मर्यादित

होऊन गेले. हे स्थित्यंतर झाल्यानंतरही उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागाने त्या विद्यापीठातील मराठी-च्या अध्ययन-अध्यापन-संशोधनाची परंपरा तितक्याच उत्साहाने चालू ठेवली, हे त्याला भूषणास्पद आहे.

या चतुर्थांकातील सगळे लेख हे व्यासंग आणि संशोधन यांनी परिपूर्ण असून, त्यांनी महाराष्ट्राच्या आणि मराठी साहित्याच्या प्राचीन इतिहासावर बराच नवीन प्रकाश पाडला आहे. प्रो. र. म. भुसारी यांनी प्राचीन महाराष्ट्रावरील मुस्लिमपूर्व आक्रमणांचा मागोवा घेताना, यवन, शक, यूहची आणि हूण यांनी आक्रमण करून, पण त्याबरोबरच भारतीय धर्म आणि संस्कृती यांचा स्वीकार करून, जी राज्ये आणि साम्राज्ये स्थापन केली, त्यांच्या-संबंधी दिलेली माहिती बरीच नवीन वाटण्यासारखी आहे. त्याचप्रमाणे, प्रा. व. दा. कुळकर्णी यांनी महानुभाव वाङमयावरील संस्कृत विद्येच्या प्रभावाचे निदर्शक असे जे गद्य-पद्य उतारे आपल्या लेखात दिलेले आहेत, तेही सर्व ज्ञानेश्वरपूर्व काळातील मराठीच्या प्रौढावस्थेवर रुचिर प्रकाश पाडतात. प्रा. सौ. माया सरदेसाई यांनी तंजावरच्या भोसले घराण्यातील शाहराज, एकेंद्र, प्रतापसिंह, शरफोजी आणि दुसरा शिवाजी या पाच राजांनी, १६८४ ते १८५५ च्या कालखंडात, मराठी भाषेत जी नाटकरचना केली आणि रंगभूमीवर त्या नाटकांचे जे प्रयोग केले, त्यांची माहिती सप्रमाण दिलेली आहे. ही माहिती वाचल्यावर तरी आता, सांगलीचे कै. विष्णुदास भावे यांना मराठी नाटके आणि रंगभूमी यांचे जनक म्हणून गौरविण्यात आपण इतिहासाकडे अक्षम्य डोळेझाक करीत आहोत, याची जाणीव मराठी नाट्यसंशोधकांना झाल्याशिवाय राहाणार नाही, अशी आशा आपण करू या ! डॉ. श्री. रं. कुळकर्णी यांनी जैन परंपरेतील 'श्रीनेमीनाथ भवांतर' या छोट्या काव्याची माहिती देताना, "मराठीचे बालपण जैनपरंपरेत जोपासले गेले असावे," असा जो निष्कर्ष काढलेला आहे, तो महत्त्वाचा वाटतो. प्रो. माणिक धनपलवार यांचा कृष्णदास मृगद्लकृत 'अंगद शिष्ठाई' हा लेखही वाचनीय आहे. मराठी स्वाध्याय-संशोधन-पत्रिकेतील हे सगळेच लेख महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि भाषा यांच्या निरनिराळ्या कालखंडातील विकासाची बव्हंशी नवीन माहिती आपल्याला देतात. म्हणूनच, ही पत्रिका महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांना अनेक बाबतीत आदर्श ठरेल, असे म्हणावयास शंका वाटत नाही. अशी उत्कृष्ट पत्रिका प्रसिद्ध केल्याबद्दल उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागाचे आम्ही अभिनंदन करतो.

वि. सा. संघाच्या परीक्षांना–शासनाची मान्यता

विदर्भ साहित्य संघातर्फे अ-मराठी भाषिकांसाठी घेण्यात येणाऱ्या 'मराठी प्रवीण' आणि 'मराठी प्राज्ञ' या नवीन परीक्षांना अनुक्रमे मराठी निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षांच्या समकक्ष परीक्षा म्हणून महाराष्ट्र शासनाने दि. २४ जुलै ६९ च्या मभाप—१५६९–३३६७३ म या पत्रान्वये मान्यता दिली, याबद्दल वि. सा. संघ शासनाचा अत्यंत आभारी आहे.

वि. सा. संघाच्या परीक्षांना शासनाने मान्यता द्यावी, अशी अनेक वर्षांपासून विनंती करण्यात येत होती. पूर्वीच्या मध्यप्रदेश शासनाने 'साहित्यविनीत' या परीक्षेला 'डिपार्टमेंटल' परीक्षा म्हणन मान्यता दिली होती. त्यामुळे महाराष्ट्र शासनानेही अ-मराठी भाषिकांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांना मान्यता द्यावी, असे प्रयत्न सातत्याने सुरू होते.

संस्थापदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री श्री. वसंतरावजी नाईक व शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी यांना प्रत्यक्ष भेटून व पत्रांद्वारे विनंती केली, व शासनाने त्याचा योग्य विचार करून अ-मराठी भाषिकांसाठी तयार करण्यात आलेल्या परीक्षांना मान्यता दिली, याबद्दल आम्ही शासनाचे तसेच सामान्य प्रशासन विभागाचे उपसचिव डॉ. वा. ना. पंडित आणि विभागीय भाषा साहाय्यक संचालक श्री. शरच्चंद्र बुचे यांचे ऋणी आहोत.

अनुक्रमणिका

प्रा. डॉ. ना. कृ. शनवारे यांचे अभिनंदन

धरमपेठ महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक श्री. ना. कृ. ऊर्फ अण्णासाहेब शनवारे यांना नागपूर विद्यापीठाने पी. एच्. डी. ची पदवी दिल्याचे नुकतेच घोषित केले आहे.

प्रा. शनवारे यांनी डॉ. मा. गो. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्रातील राजकीय चळवळीचा मराठी नाटयसृष्टीवर पडलेला प्रभाव : सन १८४३ ते १९४७' ह्या विषयावर प्रबंध लिहून सादर केला. व त्यांना विद्यापीठाकडून 'डॉक्टरेट' ही उपाधी मिळाल्याबद्दल आम्ही संस्थेतर्फे त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

प्रा. शनवारे हे निगर्वी असून सदैव एखाद्या महत्त्वपूर्ण विषयावर चिंतन करताना आढळतील. एखादी शंका त्यांच्या मनात उद्भवली तर त्वरित समवयस्कांजवळ बोलून दाखवितील, स्वतःचे मत प्रतिपादन करून 'मला असं वाटतं' म्हणून अन्यांच्या विचारांचा विचार करतील.

या त्यांच्या अबोल, निगर्वी व कामसू वृत्तीमुळेच त्यांनी ३ वर्षांच्या कालावधीत नियोजित विषयावर प्रबंध लेखन करून पदवी प्राप्त करून घेतली, यावरून त्यांच्या कामाचा आवाका लक्षात आल्यावाचून राहात नाही.

अण्णासाहेब आणि त्यांच्या सौभाग्यवती हे दोघेही नाटयवेडे आहेत. प्रा. शनवारे यांनी आतापर्यंत तीन नाटके लिहिली असून त्यापैकी दोन नाटके नागपूरच्या रंगमंचावर आली आहेत. सौ. शनवारे यांनी नागपूर नाटयमंडळातर्फे होणाऱ्या नाटकांमधून भूमिका करून उत्कृष्ट कलावंत म्हणून लौकिक मिळविला आहे.

प्रा. शनवारे यांच्या हातून यापुढे साहित्याची सेवा घडावी व अन्य साहित्यप्रकारांवरही त्यांनी लेखन करून मराठी साहित्याचे दालन समृद्ध करावे, अशी याप्रसंगी आम्ही सदिच्छा व्यक्त करतो व त्यांच्या या यशाबद्दल पुनश्च एकवार अभिनंदन करतो.

* * *

'काव्यलोचन'कार प्रा. द. के. केळकर

'काव्यलोचन'कार म्हणून मराठी साहित्यात ज्यांना आदराने ओळखले जाते ते महाराष्ट्राचे विचारवंत ग्रंथकार प्रा. द. के. केळकर यांचे शुक्रवार, दिनांक ८ ऑगस्ट रोजी मुंबईस निधन झाले. 'काव्यलोचन', 'संस्कृति-संगम', 'साहित्य विहार', 'वादळी वारे', 'मराठी साहित्याचे सिंहावलोकन' इ. अनेक विचारप्रवर्तक ग्रंथांमुळे प्रा. द. के. केळकर यांना मराठी साहित्यात विशेष स्थान होते. अबोल व अखंड ज्ञानसाधनेचा आदर्श असे त्यांच्या जीवनाचे वर्णन करता येईल. 'युगवाणी'तर्फे त्यांना विनम्र श्रद्धांजली.

पत्रकार ह. रा. महाजनी

महाराष्ट्राचे एक मुरब्बी व सव्यसाची पत्रकार व साहित्यिक श्री. ह. रा. महाजनी यांचे सोमवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी मुंबईत दुःखद निधन झाले. 'लोकसत्ता' दैनिकाचे ते १८ वर्षे संपादक होते. 'लोकसत्ता' दैनिक लोकप्रिय करण्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. 'रविवारची चिंतनिका' हे त्यांचे त्या पत्रातील गाजलेले सदर! त्यांच्या लेखनशैलीवर शिवरामपंत परांजपे यांच्या शैलीची दाट छाया होती. 'ईश्वराची आत्महत्या', (कथासंग्रह), 'नाटयसंगीत' हा समीक्षणात्मक ग्रंथ आणि 'रविवारची चिंतनिका' ही त्यांची तीनही पुस्तके गाजली आहेत. 'शकुंतला' व 'परि तू जागा चुकलासी' ही दोन नाटकेही त्यांनी लिहिली आहेत. मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदाचा व मध्यभारत साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांना मिळाला.

या श्रेष्ठ पत्रकाराला व साहित्यिकाला युगवाणीच्या वाचक वर्गातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

ज्वालेत फुललेलं गुलाब–पुष्प

रावसाहेब पटवर्धन यांच्या निधनाने एक खानदानी व्यक्तित्व हरपले. रावसाहेब व अच्युतराव स्वातंत्र्य लढ्यातील आघाडीचे लढवय्ये. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोघेही सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहिले. पं. नेहरू-सारख्या थोर नेत्यांनी रावसाहेबांना मोठमोठ्या पदावर काम करण्याचा आग्रह धरला. परंतु रावसाहेब या मोहाला भुलले नाही. एकदा पंडितजी काहीसं रागावून त्यांना म्हणाले, "रावू, तुझ्यासाठी काय केलं म्हणजे तुझं समाधान होईल ?"

रावसाहेब म्हणाले, "ज्याच्यासाठी काहीही करावं लागलं नाही, असा तुमचा एकुलता एक मित्र म्हणून मला राहू द्या.; त्यातच मला समाधान आहे."

विदर्भ साहित्य संघास त्यांनी भेट द्यावी व त्यांच्या रसाळ व्याख्यानाचा लाभ नागपूरकरांना मिळावा अशी संघाची फार इच्छा होती. त्या दृष्टीने प्रयत्नही झाले. परंतु त्यात यश आले नाही. युगवाणीच्या गांधी-विशेषांकासाठी त्यांनी लेख लिहावा असे विनंतीपत्र त्यांना मुद्दाम पाठविण्यात आले होते. परंतु मृत्यूने तो योग आणू दिला नाही.

स्वातंत्र्यलढ्यात अग्रभागी असणाऱ्या या योद्ध्याच्या जीवनात रसिकतेची एक चांगली बाजू होती. त्यांचं गुलाब–पुष्पाचं वेड प्रसिद्ध होतं. गुलाबाची मशागत रावसाहेबांनी आवडीनं केली. पुण्याच्या 'रोझ सोसायटी'चे ते प्रमुख सभासद होते.

प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या या स्वातंत्र्य योद्ध्यास वि. सा. संघाची विनम्र श्रद्धांजली.

—संपादक

अनुक्रमणिका

संघवार्ता

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

डॉ. अशोक केळकर (पुणे) यांची भेट

शनिवार दि. ५ जुलै १९६९ रोजी सायं. ६–३० वाजता पुणे विद्यापीठातील भाषाशास्त्राचे प्राध्यापक डॉ. अशोक केळकर यांनी संस्थेस भेट दिली. या प्रसंगी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. डॉ. केळकर यांनी उपस्थित साहित्यिकांशी भाषाशास्त्र विषयावर चर्चा केली. डॉ. केळकर यांनी संस्थेची वास्तू पाहून व श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे कार्य पाहून आनंद व्यक्त केला.

डॉ. भाऊ मांडवकर यांचा सत्कार

संघाचे कार्यकारी सदस्य प्राचार्य डॉ. भाऊ मांडवकर यांना नागपूर विद्यापीठाने त्यांच्या 'कोलाम' या प्रबंधाबद्दल 'डॉक्टरेट' ही उपाधी दिल्याचे घोषित केल्याबद्दल विदर्भ साहित्य संघातर्फे सोमवार दि. १४ जुलै १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. या. वा. वडसकर, खासदार श्री. त्र्यं. गो. देशमुख आदी मंडळींची गौरवपर भाषणे झाली. उत्तरादाखल डॉ. भाऊ मांडवकर यांचे भाषण झाले. सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रम संपला.

प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांना निरोप

विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष, सुप्रसिद्ध साहित्यिक व नागपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांची मुंबई विद्यापीठाच्या स्नातकोत्तर विभागात मराठीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाल्याबद्दल संस्थेतर्फे गुरुवार, दि. २४ जुलै १९६९ रोजी सायं. ६–३० वा. संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली निरोप समारंभ झाला. या निरोप समारंभाचे वेळी श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यानंतर संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी डॉ. देशमुख यांचे पुष्पहार घालून स्वागत केले. या प्रसंगी श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, प्रा. सुरेश म. डोळके, प्रा. या. वा. वडसकर, प्रा. डॉ. सुनील सुभेदार व श्री. ना. रा. शेंडे यांची भाषणे झाली. श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले.

प्रा. वा. ल. कुळकर्णी यांची भेट

मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापक व सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वा. ल. कुळकर्णी यांनी सोमवार दि. २८ जुलै १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता संस्थेस भेट दिली. या प्रसंगी संघाध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केल्यावर चहापानाचा कार्यक्रम झाला.

अनुक्रमणिका

प्रा. ना. सी. फडके अमृतमहोत्सव

विदर्भ साहित्य संघातर्फे सोमवार दि. ४ ऑगस्ट १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता सुप्रसिद्ध कादंबरीकार प्रा. ना. सी. उपाख्य आप्पासाहेव फडके यांच्या वयाच्या पंचाहत्तराव्या वर्धापन दिनानिमित्त सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली अमृतमहोत्सव वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या आरंभी संघाचे सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रा. फडके यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केली. त्याचप्रमाणे प्रा. फडके यांनी त्यांच्या नागपूर येथील वास्तव्यात हिस्लॉप कॉलेजमध्ये असताना जे वाङमय मंडळ स्थापन केले होते, त्या मंडळाच्यावतीनेही प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी प्रा. फडके यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केली. या अमृतमहोत्सवप्रसंगी स्वतः प्रा. ना. सी. फडके, कवी यशवंत दिनकर पेंढरकर, केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री श्री. बाळासाहेव देसाई आणि साहित्यिक श्री. विठ्ठलराव घाटे यांच्याकडून आलेल्या संदेशांचे वाचन सरचिटणीसांनी केले.

सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी अध्यक्षांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले.

वि. सा. संघाच्या 'युगवाणी' मासिकाने ऑगस्ट महिन्याचा प्रा. ना. सी. फडके यांच्या-संबंधी दर्शन घडविणारा 'युगवाणी–कादंवरी विशेषांक' म्हणून प्रकाशित केलेल्या अंकाचे प्रकाशन अध्यक्षांनी केले. तत्पूर्वी 'युगवाणी'चे संपादक श्री. शंकर बाळाजी शास्त्री यांनी अंकावद्दल प्रास्ताविक भाषण केले.

नंतर 'मराठी साहित्य व प्रा. फडके' या विषयावर परिसंवाद झाला. सुरुवातीला श्री. अंबादास देवळे व प्रा. प्रभाकर हेजीब यांनी आपले विचार व्यक्त केले.

याप्रसंगी बोलताना डॉ. सुनील सुभेदार म्हणाले, 'मराठी भाषेला ललित गद्य नव्हते. ते प्रा. फडक्यांनी दिले. मराठी पद्याला ज्ञानेश्वरांनी साहित्य दिले तर गद्याला प्रा. फडके यांनी लालित्य प्राप्त करून दिले आहे.'

'प्रा. ना. सी. फडके यांनी अतिशय प्रतिकूल काळात त्यांनी प्रतिपादलेला कलावाद निर्भीडपणे साहित्यक्षेत्रात मांडला. कलावाद किंवा कलानिष्ठा ही राष्ट्रनिष्ठा, धर्मनिष्ठा, समाज-निष्ठा यांच्याइतकीच श्रेष्ठ व महत्त्वाची आहे यावर प्रा. फडके यांची श्रद्धा होती. त्यांनी आपल्या कलाकृतींतून तारुण्य जागृत केले' अशा आशयाचे विचार मराठी भाषेचे तरुण समीक्षक डॉ. द. भि. कुळकर्णी यांनी व्यक्त केले. प्रा वसंत वऱ्हाडपांडे प्रा. फडके यांच्यावद्दल बोलताना म्हणाले की, 'कला ही जीवनाचा आधार व आकार घेऊनच प्रगट होत असते. प्रा. फडके यांनी प्रेमाची शाश्वतभावना विविध रंगांनी फुलविली आहे. कलावादी हा जीवनविन्मुख असावा, असे मानण्याचे कारण नाही. त्यांनी 'कलेसाठी'कला ही निर्माण केलेली भूमिका भक्तीसाठी भक्ती इतकीच श्रेष्ठ होती असेच म्हणता येईल.'

कालिदासाच्या वैदर्भीरीतीचं आधुनिक स्वरूप म्हणजे प्रा. फडके यांचे वाङमय आहे, असे प्राचार्य वि. प्र. मोहगावकर यांनी मत व्यक्त केले. ते पुढे बोलले की, फडके यांचे वाङमय वाचताना पंचेंद्रियांची तृप्ति होते. त्यांची समर्थ भाषाशैली हे तर त्यांचे खास वैशिष्टच आहे. ते एक समर्थ साहित्यिक होते.

या कायक्रमाचा समारोप करताना अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर म्हणाले की, 'गेल्या दोन पिढ्यांमधील तरुणांना चिरतरुण राहण्याचं तत्त्वज्ञान प्रा. फडके यांनी शिकविलं. तरुणपणीच्या शृंगारातील सौंदर्य, नाजुकपणा आणि साहित्य याची देणगी प्रा. फडके यांनी तरुणांना दिली. कादंबरीकार अमर कसा असू शकतो, यांचे प्रा. फडके हे प्रतीक आहेत. मी श्री. फडके यांना प्रदीर्घ आयुरारोग्य चिंतितो व त्यांच्या हातून अखंड वाङ्मयनिर्मिती व्हावी असेही चिंतितो.'

याचप्रसंगी प्रा. ना. सी. फडके यांच्या अमूल्य साहित्य सेवेबद्दल विदर्भ साहित्य संघाने त्यांना सन्माननीय सदस्यत्व दिले असल्याचेही अध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी याप्रसंगी घोषित केले.

शेवटी सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर हा कार्यक्रम समाप्त झाला. याप्रसंगी अनावरण करण्यात आलेले प्रा. फडके यांचे छायाचित्र श्री. चंद्रकांत कुळकर्णी, श्री. जनार्दन शेंबोवणेकर, श्री. दिवाकर मोहनी, श्री. भालचंद्र पटवर्धन आदी मित्रमंडळींनी विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाला भेट दिले त्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

आजीव सभासद

प्राचार्य डॉ. गो. मा. कुळकर्णी हे रुपये १०० देऊन संस्थेचे आजीव सभासद झाल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ त्यांचा अत्यंत आभारी आहे.

खासदार श्री. मोहन धारिया यांची भेट

सुप्रसिद्ध खासदार श्री. मोहन धारिया यांनी शनिवार दि. ९ ऑगस्ट १९६९ रोजी सायं. ५ वाजता संस्थेस भेट दिली.

याप्रसंगी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी खासदार श्री. धारियांचे स्वागत केल्यानंतर पाहुण्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

कै. अण्णाभाऊ साठे शोकसभा

शनिवार दि. २ ऑगस्ट १९६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार श्री. अण्णाभाऊ साठे यांच्या दुःखद निधनानिमित्त संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली होती.

या सभेत श्री. ना. रा. शेंडे, प्रा. या. वा. वडसकर, प्रा. माधवराव गांजरे, प्रा. गजाननराव वनकर व प्रा. व कृ. वऱ्हाडपांडे आदींची भाषणे झाली.

प्रा. म. ना. लोही हे उपस्थित राहू न शकल्यामुळे त्यांचेकडून आलेले लेखी भाषण सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी वाचून दाखविले.

शेवटी सर्वांनी एक मिनिट उभे राहून मूक श्रद्धांजली अर्पण केली.

प्रा. द. के. केळकर यांच्या निधनानिमित्त दुखवटा

'काव्यलोचन' कर्ते प्रा. द. के. केळकर यांच्या दुःखद निधनानिमित्त शनिवार दि. ९ ऑगस्ट ६९ रोजी दैनिक 'महाराष्ट्र' चे संपादक श्री. भाऊसाहेब पंडित यांच्या अध्यक्षतेखाली दुखवट्याची सभा होऊन प्रा. केळकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

श्री. ह. रा. महाजनी यांना श्रद्धांजली

पत्रपंडित व 'लोकसत्ता' दैनिकाचे माजी संपादक श्री. ह. रा. महाजनी यांच्या दु:खद निधनानिमित्त मंगळवार दि. १९ ऑगस्ट '६९ रोजी सायंकाळी ७ वाजता 'युगवाणी'चे संपादक श्री. शं. बा. शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली दुखवटयाची सभा घेण्यात आली. सभेत, महाराष्ट्र अशा थोर पत्रपंडिताला मुकला याबद्दल दु:ख व्यक्त करण्यात येऊन मूक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शाखावृत्त

कारंजा

रविवार, दि. २७ जुलै १९६८ रोजी रात्री ८ वाजता विवेकानन्द हिंदी विद्यालयाच्या सभागृहात कारंजा शाखेच्या वतीने श्री. सुरेशचंद्र काण्णव यांचे "मानवाचा चन्द्रावरील विजय" या विषयावर व्याख्यान झाले.

अध्यक्षस्थान शाखाध्यक्ष डॉ. हेमचन्द्र वैद्य यांनी मंडित केले होते.

जळगाव–जामोद

शाखेच्या वतीने रविवार दि. २९ जून ६९ रोजी सुप्रसिद्ध नाटककार कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा ९८ वा जन्मदिन साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी श्री. नानासाहेब वोचरे, अॅडव्होकेट, हे होते.

प्रथमत: कै. आचार्य प्र. के. अत्रे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नंतर सर्वश्री – तात्यासाहेव गोडवोले, वा. के. देशपांडे, एस्. टी. डिडोळकर व श्री. नानासाहेव वोचरे यांनी कै. कोल्हटकरांच्या जीवनातील आठवणी सांगितल्या.

शेवटी आभार प्रदर्शनानंतर कै. कोल्हटकरकृत महाराष्ट्र गीताचे गायन होऊन कार्यक्रम संपला.

वणी

प्राचार्य राम शेवाळकर संपादित 'अक्षर माधव' या वैचारिक ग्रंथाचे पत्रपंडित श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, यांच्या हस्ते दि. २३ एप्रिल १९६९ रोजी प्रकाशन झाले. या अभूतपूर्व प्रकाशन समारंभात श्री. ग. त्र्यं माडखोलकर, श्री. व. ना. एकवोटे, श्री. बाबुराव गलगलीकर आणि प्राचार्य राम शेवाळकर यांची भाषणे झाली.

दि. २७ जून ६९ रोजी आचार्य प्र. के. अत्रे यांच्या दु:खद निधनानिमित्त शोकसभा घेण्यात आली.

दि. १३ जुलै १९६९ रोजी श्रीकृष्ण भुवनात सर्वसाधारण सभा होऊन त्यात १९६९–७० या सालाकरिता पुढील कार्यकारिणीची बहुमताने निवड झाली. अध्यक्ष – प्रा. शांताराम कवडे, उपाध्यक्ष – श्री. के. ना. काटपाताळ, श्री. म. ता. राजूरकर, सरचिटणीस – श्री. माधव सरपटवार, चिटणीस – श्री. वामन ठाकरे, श्री. वसंत ओचावार, सदस्य – सर्वश्री बापूसाहेब दामले, ना. मा. सरपटवार, प्राचार्य शेवाळकर, र. वा. देशपांडे, प्रा. गलगलीकर, नानाजी भागवत, मधुकर सवरंगपते व बा. झा. कांवळे.

कवी श्री. नारायण सुर्वे यांची भेट व काव्यवाचन

मुंबई येथील नव्या पिढीचे कवी श्री. नारायण सुर्वे ह्यांनी रविवार दि. २४ ऑगस्ट १९६९ रोजी सकाळी ८-३० वाजता विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. याप्रसंगी त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी चर्चा केली आणि संस्थेचे श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय, कला-केंद्र, धनवटे रंगमंदिर पाहून व कार्यासंबंधी माहिती घेऊन समाधान व्यक्त केले.

श्री. नारायण सुर्वे हे नवीन कवींपैकी एक विनीचे कवी असून त्यांचे आतापर्यंत दोन काव्य-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

सायंकाळी ६ वाजता वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात श्री. नारायण सुर्वे ह्यांच्या कविता वाचनाचा कार्यक्रम झाला.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण केल्यावर सुप्रसिद्ध कवी श्री. आ. रा. देशपांडे ऊर्फ 'अनिल' ह्यांनी श्री. सुर्वे यांच्या काव्यासंबंधी परिचयपर भाषण केले. यावेळी श्री. सुर्वे यांनी आपल्या कविता वाचून दाखविल्या.

शेवटी आभारप्रदर्शनानंतर कार्यक्रम संपला.

कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे मंगळवार दि. २६ ऑगस्ट १९६९ रोजी सायंकाळी ६-३० वाजता नाटककार कै. कृ. प्र. खाडिलकर यांचा स्मृतिदिन, दैनिक 'महाराष्ट्र'चे मुख्य संपादक श्री. दि. ब. उपाख्य भाऊसाहेब पंडित यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. वासुदेवराव चोरघडे यांनी अध्यक्षांचे स्वागत केले. त्यानंतर अध्यक्षांनी कै. खाडिलकरांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

याप्रसंगी प्रा. डॉ. ना. कृ. शनवारे यांचे भाषण झाले.

शेवटी श्री. चोरघडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

तरुण कवींच्या काव्याचा कार्यक्रम

विदर्भ साहित्य संघाने शुक्रवार दि. २९ ऑगस्ट १९६९ रोजी सायंकाळी ६-३० वाजता नागपुरातील तरुण कवींच्या काव्यवाचनाचा कार्यक्रम मुंबईचे तरुण कवी श्री. नारायण सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता.

सुरुवातीला सरचिटणीस श्री. मा. नी गलगलीकर यांनी प्रास्ताविक भाषण करून नव्या दमाचे विनीचे कवी श्री. नारायण सुर्वे यांना कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान स्वीकारावे, अशी विनंती केली. या कार्यक्रमास श्री. आ. रा. देशपांडे ऊर्फ 'अनिल' हे प्रामुख्याने व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी नागपुरातील विनीचे कवी श्री. कुली, श्री. श्रीधर शनवारे, प्रा. सौ. उषाताई लिमये, श्री. कुसुमानंद श्री. अनंत अमदावादकर यांनी आपआपल्या ४-४ कविता म्हणून दाखविल्या. कवी ग्रेस यांनी स्वतःची कविता म्हणून न दाखविता एका इंग्रजी कवीची अर्थगर्भ कविता म्हणून दाखविली.

या कविसंमेलनात सर्वश्री शरद जोशी, पद्मा बोधनकर, रवीन्द्र दवे, जाधव, मधुकर जोशी, अशोक इंगळे, अ. सी. मेंढेकर, रमेश देशपांडे, निनावे यांनी आपल्या कविता वाचून दाखविल्या व आपल्या काव्य प्रतिभेची चुणूक रसिकांना दाखविली.

सर्व कवींचे काव्यवाचन झाल्यावर आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. नारायण सुर्वे यांनी आपल्या ४ कविता म्हणून दाखविल्या. विशेषत: त्यांच्या 'थांब' व 'मुंबई' ह्या कवितांमुळे श्रोतृवर्ग भारावून गेला.

शेवटी कवी 'अनिल' यांनी उपस्थित कवींचे, श्री. नारायण सुर्वे यांचे व श्रोतृवर्गाचे वि. सा संघातर्फे आभार मानले.

कवी 'बी' स्मृतिदिन

विदर्भ साहित्य संघातर्फे शनिवार, दि. ३० ऑगस्ट ६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता सुप्रसिद्ध कवी कै. नारायण मुरलीधर गुप्ते यांचा स्मृतिदिन विदर्भातील सुप्रसिद्ध कवी प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात साजरा झाला.

सुरुवातीला संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी प्रास्ताविक भाषण करून प्रा. भ. श्री. पंडित यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. नंतर प्रा. भ. श्री. पंडित यांनी कवी 'बीं'च्या छायाचित्राला हार अर्पण केला. संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांनी अध्यक्षांचे व प्रमुख वक्ते कवी श्री. ज्ञा. रा. साधू यांचे पुष्पमाला अर्पण करून स्वागत केले.

नंतर सुप्रसिद्ध कवी श्री. ज्ञा. रा. साधू यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

शेवटी श्री. वा. के. अत्रे यांनी आभारप्रदर्शन केले.

आर्वी शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या आर्वी शाखेचे पुनरुज्जीवन करण्यात आले असून मंगळवार दि. २६ ऑगस्ट १९६९ रोजी सायंकाळी ५–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांच्या हस्ते लोकमान्य वाचनालयाच्या प्रांगणात समारंभपूर्वक शाखेचे उद्‌घाटन झाले.

यावेळी वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर उपस्थित होते.

त्याच दिवशी १९६९–७० ह्या सालाकरिता आर्वी शाखेच्या कार्यकारिणीची खालीलप्रमाणे निवड झाली.

अध्यक्ष–श्री. तात्याजी कदम, उपाध्यक्ष–श्री. भय्यासाहेब किनखेडे, सचिव–श्री. दिगंबर सावळे, सहसचिव–श्री. नारायणराव गोठाणे, कोषाध्यक्ष–श्री. हरिभाऊ थिगळे.

सदस्य—प्रा. विनायकराव पांडे, श्री. जयंत देशमुख, श्री. अशोक सगणे, श्री. घनशाम पंड्या, श्री. मोरोणे, श्रीमती सुगंधाबाई शेंडे आणि श्रीमती सुमतीबाई पुरोहित.

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

कार्यवृत्त इ. स. १९६८–६९

एक एप्रिल १९६८ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या ३ आणि साधारण सभासदांची एक सभा झाली.

या वर्षी संस्थेचे एकूण ८०० सदस्य नोंदले गेले. आजीव सभासद २४५ असून यांमध्ये १२ उपकर्ते, ५ आश्रयदाते, २ सहाय्यक व ५ हितचिंतक सभासद होते.

वेगवेगळया समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडल्याबद्दल त्या त्या समित्यांच्या आमंत्रकांचे आणि कार्यकर्त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

वि. सा. संघाची त्रैवार्षिक निवडणूक

वि. सा. संघाची त्रैवार्षिक (१९६८ ते १९७१) फेरनिवडणूक होऊन तिचा निकाल रविवार दि. १९ मे १९६८ रोजी निर्वाचनाधिकारी श्री. मनोहर नारायण परांजपे यांनी जाहीर केला.

कार्यकारी मंडळाचे सभासदत्वाकरिता एकूण ३५ उमेदवार उभे होते. त्यांपैकी पुढील सोळा सदस्य निवडून आले.

(१) श्री. बाबुराव चिमोटे
(२) श्री. पु. व्यं. दारव्हेकर
(३) श्री. राम शेवाळकर
(४) प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे
(५) श्री. शं. बा. शास्त्री
(६) श्री. त्रि. गो. देशमुख
(७) श्री. मा. नी. गलगलीकर
(८) श्री. वा. के. अत्रे
(९) श्री. चं. शं. कुळकर्णी
(१०) श्री. आ. ग. जोग
(११) श्री. अ. ल. लिमये
(१२) प्रा. भाऊ मांडवकर
(१३) श्री. शांताराम पोटदुखे
(१४) श्री. म. गो. भांबूरकर
(१५) प्रा. या. वा. वडसकर
(१६) प्रा. दे. गं. सोटे.

या निवडणुकीचे वेळी गणक म्हणून श्री. सेवकराम पाटील आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली. निर्वाचनाधिकारी श्री. मनोहर नारायण परांजपे यांनी निकाल जाहीर होईपर्यंत उत्कृष्टपणे कार्य पार पाडल्याबद्दल आम्ही त्यांचे व सर्व गणकांचे अत्यंत आभारी आहोत.

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या निवडून आलेल्या कार्यकारी मंडळाची पहिली सभा रविवार दि. २६ मे १९६८ रोजी सकाळी ८–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

अनुक्रमणिका

सभेत खालीलप्रमाणे पदाधिकारी १९६८ ते१९७१ या कालावधीसाठी निवडण्यात आले.

१) उपाध्यक्ष—प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख व प्राचार्य राम शेवाळकर
२) सरचिटणीस-श्री. मा. नी. गलगलीकर
३) कोषाध्यक्ष-श्री. म. गो. भांबूरकर
४) चिटणीस—श्री. अ. ल लिमये, श्री. शांताराम पोटदुखे, श्री. वा. के. अत्रे
५) संपादक 'युगवाणी'-प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे
६) संचालक, परीक्षा समिती-श्री. ग. स. देशपांडे
७) आमंत्रक, सांस्कृतिक समिती-श्री. वासुदेवराव चोरघडे
८) आमंत्रक, नाटचसमिती-श्री. पु. व्यं. दारव्हेकर
९) आमंत्रक, श्रीशिवाजी ग्रंथालय-श्री. चंद्रकांत कुळकर्णी
१०) आमंत्रक, प्रकाशन समिती-प्रा. भाऊ मांडवकर
११) आमंत्रक, संशोधन समिती-प्रा. दे. गं. सोटे
१२) आमंत्रक, कला केंद्र समिती-श्री. श्रीधर दुधपचारे
१३) आमंत्रक, गडकरी समिती-श्री. प्रभाकर गडकरी
१४) आमंत्रक, अर्थसमिती, कोषाध्यक्ष श्री. म. गो. भांबूरकर.

वरील कार्यकारी मंडळाच्या सभेनंतर वि. सा. संघाच्या कार्यकारिणीचे सभासद आणि विदर्भ साहित्य संघाचे हितचिंतक माननीय नासिकराव तिरपुडे ह्यांचा महाराष्ट्र राज्याचा मंत्रिमंडळात वनमंत्री म्हणून समावेश झाल्याबद्दल वि. सा. संघाच्या कार्यकारिणीने आनंद व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले.

वि. सा. संघाचे आजीव सदस्य व महाराष्ट्राचे नामवंत नाटचसमीक्षक डॉ. द. रा. गोमकाळे आणि श्री. स. वि. लिमये ह्यांच्या दु:खद निधनाबद्दल कार्यकारिणीची सभा शोक व्यक्त करते, असा ठराव करण्यात आला. सभेच्या शेवटी प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे यांनी अध्यक्षांचे आभार मानले.

सांस्कृतिक समिती—

या समितीच्या अंतर्गत **श्रीगणेश व्याख्यानमाला, कै. ना. बेहरे व्याख्यानमाला,** व इतर अन्य कार्यक्रम घेण्यात आले.

श्री गणेश व्याख्यानमालेचे ९ वे पर्व ह्यावर्षी श्री. त्र्यं. खं. गंधे यांनी गुंफले. खालील तारखांना निम्नलिखित विषयावर त्यांची तीन व्याख्याने झाली.

रविवार	दि. २८	एप्रिल	'६८ —	'संत नामदेव'
सोमवार	दि. २९	एप्रिल	'६८ —	'संत एकनाथ'
मंगळवार	दि. ३०	एप्रिल	'६८ —	'संत रामदास'

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य व भाषाशास्त्राचे गाढे व्यासंगी श्री. देवीसिंह चौहान यांनी दि. १९ व २० जानेवारी १९६९ रोजी "दख्खिनी हिंदी व तिच्यावर मराठीचा प्रभाव" व "दख्खिनी हिंदीचा मराठीवर परिणाम" या विषयांवर

व्याख्याने दिली. अध्यक्षस्थानी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भाऊसाहेब कोलते आणि डॉ. मा. गो. देशमुख हे होते.

अन्य कार्यक्रम

दि. २९ एप्रिल '६८ ला श्रीशिवजयंती निमित्त डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे व्याख्यान झाले.

दि. २८ मे '६८ रोजी स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर जयंतीनिमित्त प्राचार्य या. मु. पाठक यांचे 'सावरकरांची कमला' या विषयावर व्याख्यान झाले.

दि. २६ जून '६८ रोजी 'महाकवी कालिदास' स्मृतिदिनानिमित्त संस्कृतचे अभ्यासक श्री. अ. गो. देशपांडे यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

यावेळी प्रारंभी शारदेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आल्यानंतर नागपुरातील प्रसिद्ध गायक डॉ. बाळासाहेब पुरोहित, सौ. कुसुम चाफळे व कु. सुमन रेखडे यांनी कालिदासाच्या 'मेघदूत' काव्यातील काही श्लोक गाऊन दाखविले.

सोमवार दि. ८ जुलै ६८ रोजी गडकरी सभागृहात सुप्रसिद्ध कवियित्री व 'स्मृतिचित्रे' या आत्मवृत्ताच्या लेखिका कै. लक्ष्मीबाई टिळक यांची जन्मशताब्दी संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली साजरी झाली व या प्रसंगी सुप्रसिद्ध कवी प्रा. भ. श्री. पंडित यांचे भाषण झाले.

मंगळवार दि. २३ जुलै ६८ रोजी नटसम्राट कै. बालगंधर्व यांच्या वर्षश्राद्धानिमित्त प्रमुख पाहुणे नाटयइतिहास संशोधक श्री. के. टी देशमुख (मुंबई) यांचे भाषण झाले. यानंतर स्वरमंडळातर्फे नागपूर आकाशवाणीवरील कलावंत श्री. मधुकरराव गुळवणी यांचे गायन झाले.

शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी संगीतकेंद्राचा वार्षिकोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्री. दामोदर देवघरे व डॉ. बाळासाहेब पुरोहित यांचे गायन झाले. सुप्रसिद्ध गायक श्री. राजाभाऊ कोकजे यांनी पेटीची व श्री. वायवार यांनी तबल्याची साथ केली.

कविवर्य नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'बी' यांच्या २१ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवार दि. ३० आगस्ट रोजी प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांचे भाषण झाले.

याचवेळी 'नावात काय आहे ?' या कवितेवर आयोजित केलेल्या परिसंवादात प्रा. सुरेश देशपांडे, प्रा. सुरेश म. डोळके, प्राचार्य या. मु. पाठक आणि डॉ. मा. गो. देशमुख यांनी भाग घेतला.

संस्थेतर्फे गुरुवार दि. ७ नोव्हेंबर ६८ रोजी 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या ग्रंथाचे लेखक सुप्रसिद्ध व्याकरणकार श्री. मोरो केशव दामले यांची जन्मशताब्दी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली.

सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांच्या प्रास्ताविक भाषणानंतर प्रमुख वक्ते प्रा. ग. वा. करंदीकर यांचे भाषण झाले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख, कविवर्य अनिल आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर याची व्याकरणकारांवर गौरवपर भाषणे झाली.

संस्थेतर्फे बुधवार दि. ११ व १२ डिसेंवर ६८ रोजी महाराष्ट्र विधान सभेचे सभापती श्री. बाळासाहेब भारदे यांचे 'माझा परदेश प्रवास' ह्या विषयावर भाषण झाले. अध्यक्षस्थानी श्री. आ. रा. देशपांडे (कवी 'अनिल') होते.

संस्थेने आयोजित केलेल्या गांधी जन्म शताब्दी व्याख्यानमालेतील पहिले व दुसरे पुष्प दि. १७ व १८ डिसेंवर रोजी महाराष्ट्र विधानसभेचे सभापती श्री. बाळासाहेब भारदे यांनी 'गांधीवाद – आक्षेप व निरसन' ह्या विषयावर गुंफले.

अध्यक्ष : न्या. मू. डॉ. भवानीशंकर नियोगी होते.

वि. सा. संघातर्फे विदर्भातील कवी कै. गोविंद गोपाळ उर्फ मामा रामभजनी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १८ डिसेंवर ६८ रोजी सौ. उषा धारप ह्यांनी कै. रामभजनी यांच्या दोन कवितांचे गायन केले.

संस्थेतर्फे श्री. ग. स. देशपांडे यांनी व नकलाकार श्री. नानासाहेब रेटर आणि श्रीमती रामभजनी ह्यांनी कै. मामांच्या प्रतिमेला हार घातला.

संगीत केंद्रातर्फे मंगळवार दि. २४ डिसेंबर ६८ रोजी सौ. कौसल्या मंजेश्वर (मुंबई) यांचे गायन झाले.

दि. २६ जानेवारी ६९ रोजी लोकनायक कै. मा. श्री. उपाख्य बापूजी अणे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त सर्वप्रथम श्री. बाबुराव चिमोटे यांनी कै. बापूजींच्या प्रतिमेला हार अर्पण केल्यावर श्री. पां. ब. गाडगीळ यांनी कै. अणे यांच्या आठवणी सांगितल्या.

दि. ३१–१–६९ रोजी कै. गो. रा. दोडके यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. मा. नी. गलगलीकर यांचे प्रमुख भाषण झाले. यावेळी पां. ब. गाडगीळ, श्री. सखारामपंत जोशी, प्रा. सुंम व श्री. भाऊसाहेब सप्रे यांनी कै. दोडके यांच्या आठवणी सांगितल्या.

कविवर्य कै. अण्णाजी बोवडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त दि. १ ऑक्टोबर १९६९ रोजी श्री. मा. नी. गलगलीकर यांचे व्याख्यान झाले. श्री. मधुकर गुळवणी व श्री. अ. ल. लिमये यांनीही कविवर्य बोवडे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

संगीत केंद्राचा स्मृतिउत्सव

सांस्कृतिक समिती अंतर्गत संगीत केंद्रातर्फे दि. १५, १६ व १७ सप्टेंबर ६८ रोजी स्मृति-उत्सव साजरा करण्यात आला.

या स्मृतिउत्सव प्रसंगी वैदर्भीय कलाकारांचा अपूर्व मेळावा भरविण्यात आला.

रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९–३० वा. धनवटे रंगमंदिरात अमरावतीचे कलारसिक डॉ. मदनगोपाल यांचे हस्ते स्मृतिउत्सवाचे उद्घाटन झाले. यावेळीं संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी उद्घाटकांचे पुष्पहार घालून स्वागत केले. याच वेळी ज्येष्ठ व मान्यवर कलाकारांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

श्री. स. भ. देशपांडे (अकोला–जबलपूर) यांना डॉ. मदनगोपाल यांच्या हस्ते श्रीफळ व शाल अर्पण करण्यात आली.

श्री. दे. ज. पतकी (वर्धा) व श्री. शंकरराव देशपांडे (अमरावती) हे प्रकृती अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

या प्रसंगी श्री. स. भ. देशपांडे यांनी सत्काराप्रीत्यर्थ भाषण दिले. नंतर श्री. राजाभाऊ कोकजे यांचे गायन झाले.

आभारप्रदर्शनाचे कार्य सांस्कृतिक समितीचे आमंत्रक श्री. जयंत देवघर यांनी केले.

यानंतर स्मृतिउत्सवातील कलाकारांच्या गायन–वादनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात श्री. स. भ. देशपांडे यांचे गायन, श्री. अरुण वकील यांचे व्हायोलिन आणि श्री. गोविंदराव दंताळे यांचे गायन झाले.

स्मृतिउत्सवाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. १६ सप्टेंबर रोजी रात्रौ ९–३० वाजता गायक श्री. मधुकर गुळवणी यांचे गायन झाल्यावर प्रा. नंदु असनारे व प्रा. किरण देशपांडे यांचा तबला जुगलबंदीचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

या कार्यक्रमानंतर कु. शकुंतला पळसोकर (अकोला) यांचे गायन व सौ. शुभदा पेंढरकर यांचे दिलरुबा वादन झाल्यावर सुप्रसिद्ध गायक श्री. मधुसूदन भावे यांचे सुश्राव्य गायन होऊन ही बैठक संपली.

दि. १७ सप्टेंबर रोजी रात्रौ ९ वाजता अंधविद्यालयातील कलाकार श्री. केशवराव ठोंबरे यांच्या व्हायोलिन वादनानंतर प्रा. सौ. सुमन चौधरी यांचे गायन झाले.

यानंतर रेडिओ कलाकार श्री. धनंजय पुजारी यांच्या सतारवादनाचे वेळी अमरावतीचे सुप्रसिद्ध तबलावादक श्री. मदनसिंग पवार यांनी त्यांना तबल्याची साथ दिली. उदयोन्मुख कलाकार श्री. काळे यांचे गायनानंतर शेवटी अमरावतीचे श्री. मनोहर कासलीकर यांचे सुमधुर गायन झाले.

या स्मृतिउत्सवाचे कार्यप्रमुख श्री. डॉ. बाळासाहेब पुरोहित आणि संयोजक श्री. आनंदराव जोग यांनी परिश्रम घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले.

या स्मृतिउत्सवात पेटीची साथ सर्वश्री बबनराव आठल्ये, प्रभाकर पातुरकर, पंढरीनाथ कदम, अशोक मंजुळे आणि तबल्याची साथ पं. संपतलाल, वसंतराव देव, शंकरराव पोपटकर, प्रल्हाद भजनी, मदनसिंग पवार, प्रभाकर देसाई, किरण देशपांडे आणि प्रभाकर पिल्ले यांनी केली.

या कार्यक्रमाचे वेळी कलाकारांचा परिचय करून देण्याचे कार्य श्री. प्रभाकर चाफेकर यांनी केले.

या स्मृतिउत्सवप्रसंगी अनेक कार्यकर्त्यांनी जे सहकार्य दिले, त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

संगीत सभा

गुरुवार दि. ७ नोव्हेंबर रोजी सायं. ७ वाजता ख्यातनाम संगीतज्ञ व लेखक श्री. वा. ह. देशपांडे (मुंबई) यांनी संस्थेस भेट दिली व मार्गदर्शनपर भाषण केले.

या प्रसंगी आयोजित केलेल्या संगीत सभेत सौ. मीरा परांजपे (मीरा साठे), सौ. लता दुरुगकर (लता साठे), सौ. उषा पारखी आणि श्री. बाळ फडणीस यांचे गायन झाले.

यावेळी तबल्याची साथ श्री. भजनी व पेटीची साथ श्री. पातुरकर यांनी आणि व्हायोलिनची साथ श्री. पारखी यांनी करून मैफलीत रंग आणला.

मंगळवार दि. ३ डिसेंबर ६८ रोजी सायं. ७ वाजता महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक समितीच्या संगीत मंडळाचे व गांधर्व महाविद्यालय मंडळाचे अध्यक्ष, सावंतवाडीचे राजे शिवरामराजे भोसले ह्यांनी संगीत केंद्राला भेट दिली.

याप्रसंगी श्री. शिवरामराजे भोसले ह्यांच्या भाषणानंतर संगीत सभा होऊन त्यात सौ. अलकनंदा झिजर्डे, श्री. मोहन गायकवाड व श्री. जोशी यांचे गायन झाले.

भेटी

दि. १४ एप्रिल ६८ रोजी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ व साहित्य सहकार संघ लि. (मुंबई) चे श्री. वा. वि. भट, श्री. औरंगाबादकर, कु. कांता मणकुरकर, श्री. स्वामी, श्री. अ. ल. लिमये व सोबत असलेल्या पाहुण्यांनी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयास भेट दिली.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले व संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

गोवा प्रदेशाचे शिक्षणमंत्री श्री. गोपाळराव मयेकर यांनी दि. ३० जुलै ६८ रोजी संस्थेस भेट दिली. यावेळी संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि सरचिटणीस श्री. मा. नी. गलगलीकर यांनी श्री. मयेकर यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

महाराष्ट्र राज्याचे ग्रंथालय संचालक श्री. कृ. द. पुराणिक, उपसंचालक श्री. वसंतराव शब्दे यांनी दि. ९ सप्टेंबर ६८ रोजी श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला भेट दिली.

सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. हमीद दलवाई यांनी रविवार दि. ६ ऑक्टोबर ६८ रोजी संस्थेला भेट दिली. यावेळी ' साहित्यिकांशी चर्चा ' असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सुरुवातीला प्रास्ताविक भाषण करून संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी श्री. दलवाई यांना पुष्पहार घालून संस्थेतर्फे त्यांचे स्वागत केले.

भारतीय कीर्तीचे शिल्पकार श्री. वी. विठ्ठल आणि चित्रकर्ती सौ. वी. प्रभा ह्यांनी गुरुवार दि. ३१–१०–६८ रोजी वि. सा. संघाच्या कला केंद्राला भेट दिली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. वसंतरावजी नाईक यांनी शुक्रवार दि. २० डिसेंबर ६८ रोजी सायं. ५–२५ वाजता वि. सा. संघाला भेट दिली. त्यांच्यासमवेत सौ. वत्सलाबाई नाईक होत्या.

संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी पुष्पहार घालून मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले.

मुख्यमंत्र्यांनी संस्थेच्या कला–केंद्र व श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला भेट दिली.

याप्रसंगी चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांनी आपली एक कलाकृती मुख्यमंत्र्यांना भेट दिली.

वि. सा. संघाच्या कला–केंद्राला महाराष्ट्राचे इमारत व दळणवळणमंत्री माननीय श्री. मधुसूदन वैराळे यांनी सायंकाळी ७ वाजता भेट दिली.

यावेळी कला–केंद्रात भरविण्यात आलेल्या विदर्भातील बावीस चित्रकारांच्या चाळीस चित्रकृतींच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी माननीय मंत्र्यांचे स्वागत केले. संघाचे सरचिटणीस श्री. अ. ल. लिमये यांनी पाहुण्यांना पुष्पहार घातला. याप्रसंगी माननीय श्री. वैराळे यांचे भाषण झाले. राज्यसभा सदस्य श्री. त्र्यं. गो. देशमुख यांनी पाहुण्यांचे

अनुक्रमणिका

आभार मानले. चित्रकार श्री. वसंतराव इंगळे यांनी आपली एक कलाकृती माननीय मंत्र्यांना भेट दिली.

दि. २४ जानेवारी ६९ रोजी सायंकाळी ६–३० वाजता नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. बी. व्ही. केसकर यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. यात्रप्रसंगी भारत सरकारच्या संरक्षण खात्यातील प्रमुख मानसशास्त्रज्ञ डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे यांचे 'स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्यातील विचारप्रवाह' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

दि. २८–१–६९ रोजी दक्षिण महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. रा. के. रानडे यांनी वि. सा. संघास भेट दिली.

दैनिक 'सकाळ'चे संपादक डॉ. ना. भी. उपाख्य नानासाहेब परुळेकर यांनी वि. सा. संघास दि. १० फेब्रुवारी ६९ रोजी भेट दिली. 'पद्मभूषण' मिळविणारे पहिले मराठी पत्रकार म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी दैनिक 'महाराष्ट्र'चे संपादक श्री. दि. ब. उपाख्य भाऊसाहेब पंडित हे होते.

याप्रसंगी श्री. वसंतराव साठे व डॉ. सुनील सुभेदार यांची भाषणे झाली. श्री. आ. रा. देशपांडे यांनी आभारप्रदर्शन केले.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय : अभ्यास मंडळ

'अत्रे वाङमय दर्शन'

वि. सा. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयांतर्गत अभ्यास मंडळाने दि. १३ ऑगस्ट ६८ रोजी आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या ७१ व्या वाढदिनी 'अत्रे वाङमय दर्शन' नावाचे प्रदर्शन आयोजित केले. प्रदर्शनात आचार्यांनी लिहिलेली सर्व पुस्तके मांडण्यात आली होती. नागपूरचे सुप्रसिद्ध छायाचित्रकार श्री. गोडबोले यांनी आपल्या संग्रहातील आचार्यांच्या नागपूर भेटीवर आधारलेली विविध छायाचित्रे प्रदर्शनासाठी दिली होती.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे गुरुवार दि. ६ सप्टेंबर ६८ रोजी सायंकाळी ६–३० वाजता नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाची सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. राजा मंत्री उपस्थित होते. त्यांचे श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे स्वागत करण्यात आले.

'मराठी लघुकथेची वाटचाल'

ग्रंथालय सप्ताहानिमित्त 'मराठी लघुकथेची वाटचाल' या नावाचे ग्रंथप्रदर्शन अभ्यास-मंडळातर्फे दि. २५ ते २९ सप्टेंबरपर्यंत आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनात 'मनोरंजन' मासिकाच्या कालखंडापासून तो करमणुक कालखंडापर्यंत व नंतर १९६८ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या लघुकथासंग्रहांचे प्रदर्शन मांडण्यात आले.

या प्रदर्शनात दुर्मिळ मासिके, पुस्तके ठेवण्यात आली होती.

' मराठी रंगभूमी वाङमय प्रदर्शन '

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाने मंगळवार दि. ५ नोव्हेंबर ६८ रोजी मराठी रंगभूमीच्या १२५ व्या वर्धापन दिनानिमित्त ' मराठी रंगभूमी वाङ्मय प्रदर्शन ' आयोजित केले होते.

गेल्या १२५ वर्षांत मराठी रंगभूमीवर आलेल्या असंख्य नाटकांपैकी रंगभूमीवर गाजलेल्या १२५ निवडक नाटकांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती. तसेच मराठी रंगभूमीवर लिहिलेली समीक्षणात्मक व चरित्रात्मक पुस्तके मांडण्यात आली होती.

' नेहरू वाङमय दर्शन '

भारताचे माजी पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार दि. १४ नोव्हेंबर १९६८ रोजी ' नेहरू वाङ्मय दर्शन ' म्हणून ग्रंथप्रदर्शन भरविण्यात आले होते.

या प्रदर्शनात पं. नेहरूंच्या साहित्याची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

' ज्ञानेश्वर पुण्यतिथीचा सोहळा '

अभ्यासमंडळातर्फे सोमवार दि. १८ नोव्हेंबर '६८ रोजी श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांची पुण्यतिथी थाटात साजरी करण्यात आली. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयात ज्ञानेश्वर वाङमय दर्शन नावाचे छोटेसे ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ' महाराष्ट्र 'चे संपादक श्री. भाऊसाहेब पंडित यांनी ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला हार अर्पण करून प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

' अभ्यासमंडळ–व्याख्यानमाला '

प्रा. डॉ. द. भि. कुळकर्णी यांची दि. २ व ३ फेब्रुवारी १९६९ व दि. २० मार्च १९६९ रोजी अनुक्रमे ' मर्ढेकर–वेदना आणि सौन्दर्य ' व ' मुक्तिबोध–वेदना आणि विजय ' आणि ' नवकथा–भावे ते जी. ए.' या विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने झाली.

दासनवमीनिमित्त ' दासबोधाची तीन वैशिष्ट्ये ' या विषयावर दि. ९–२–६९ रोजी झालेल्या परिसंवादात प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे आणि प्रा. भा. श्री. परांजपे यांनी भाग घेतला. अध्यक्षस्थानी वि. सा. संघाचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख होते. या कार्यक्रमाला समर्थ सेवा मंडळाचे सहकार्य लाभले होते.

अभ्यासमंडळातर्फे कु. पद्मा नांदे आणि कु. भारती गोखले यांनी दि. १५–२–'६९ रोजी आपल्या कथांचे वाचन केले.

कथावाचनाचेवेळी श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. राम कोलारकर व श्री. त्र्यं. खं. गंधे यांनी समीक्षणाचे काम करून सहकार्य दिले.

या कार्यक्रमप्रसंगी विदर्भातील तरुण समीक्षक श्री. राम कोलारकर यांचा ' सर्वोत्कृष्ट मराठी कथा ' या त्यांच्या पुस्तकाबद्दल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

नाट्य समिती

बुधवार दि. १ मे १९६८ रोजी सकाळी ८ वाजता नाटककार कै. नाना जोग त्यांच्या पुतळ्याला संस्थेतर्फे व श्री. राजा पाठक यांच्यातर्फे हार अर्पण करण्यात आला. रात्री ९–१५

वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे कै. नाना जोग स्मृतिदिनानिमित्त धनवटे रंग-मंदिरात भाषण झाले.

अध्यक्षस्थान श्री. बाबुराव चिमोटे यांनी स्वीकारले होते.

यानंतर श्री. वि. रा. काटे लिखित 'आख्यायिका–कालिदासम्' ही संस्कृत एकांकिका, पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लबतर्फे सादर करण्यात आल्यावर श्री. जयवंत दळवी यांची 'डॉ. तपस्वी' व श्री. शं. ना. नवरे यांनी लिहिलेली 'दोन यमांचा फार्स' या दोन एकांकिका रंजन कला मंदिरातर्फे सादर करण्यात आल्या.

नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मृतिदिन

संस्थेतर्फे दि. १ जून '६८ रोजी सायं. ६–३० वाजता संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली नाटककार कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी सुप्रसिद्ध साहित्यिक आणि वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी कै. श्री. कृ. कोल्हटकर आणि मुंबईस निघणाऱ्या 'मासिक मनोरंजन' या मासिकाचे १९१५ सालातील प्रमुख लेखक व कवी यांचे एक छायाचित्र विदर्भ साहित्य संघाला कोल्हटकरांच्या स्मृति-दिनानिमित्त भेट म्हणून दिले.

या छायाचित्राचे अनावरण कोल्हटकर स्मृतिदिनाचे दिवशी विदर्भातील ज्येष्ठ नाटककार श्री. वा. वा. भोळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी वा. वा. भोळे, डॉ. भाऊसाहेब कोलते, प्रा. भ. श्री. पंडित, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, प्रा. म. ल. वऱ्हाडपांडे आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांची भाषणे झाली.

शेवटी श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी आभार मानले.

नाटककार कै. **वीर वामनराव जोशी यांचा स्मृतिदिन** दि. ३ जन '६८ रोजी नाट्य-इतिहाससंशोधक श्री. के. टी. देशमुख (मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

वीर वामनरावांच्या प्रतिमेला हार अर्पण केल्यावर श्री. के. टी. देशमुख, श्री. मा. नी. गलगलीकर आदींची भाषणे झाली.

दि. १५ जून रोजी सायंकाळी ६–३० वाजता सुप्रसिद्ध पत्रकार आणि नाटककार कै. **अच्युत बळवंत कोल्हटकर** यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्री. सखारामपंत जोशी यांचे भाषण झाले.

'रुद्रवर्षा' नाटकावर चर्चा

रविवार दि. २३ जून रोजी सायं. ७ वा. गडकरी सभागृहात प्रा. महेश एलकुंचवार यांच्या 'रुद्रवर्षा' या नाटकावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कवी श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांनी स्वीकारले होते. सुरुवातीला नाट्यसमितीचे आमंत्रक श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी परिसंवादामागील पार्श्वभूमी विशद करून सांगितल्यावर सर्वश्री प्रभाकर पुराणिक, प्रभाकर सिरास, प्रा. या. वा. वडसकर, माऊ समर्थ, डॉ. द. भि. कुळकर्णी यांची भाषणे झाली.

मराठी रंगभूमी प्रदर्शन

नाट्यइतिहाससंशोधक श्री. के. टी. देशमुख (मुंबई) यांच्या नाट्यचित्र, ग्रंथ व वस्तूंचे प्रदर्शन श्रीशिवाजी ग्रंथालयाचे जागेत दि. १६ मे ते १ जून १९६८ पर्यंत आयोजित करण्यात आले.

या मराठी रंगभूमी प्रदर्शनाला अनेक प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, रसिक नागरिकांनी आणि अभ्यासूंनी भेट दिली.

दि. २६ मे १९६८ रोजी संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी कै. राम गणेश गडकरी यांच्या जयंतीनिमित्त श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात आयोजित केलेल्या मराठी रंगभूमी प्रदर्शनात ठेवलेल्या कै. रा. ग. गडकरी यांच्या छायाचित्राला हार अर्पण केला.

नाट्यवाचन

दि. २५ जुलै ६८ रोजी श्री. आनंद जोग आणि श्री. जयंत देवधर या दोघांनी अनुवादित केलेल्या 'ॲनिमी ऑफ दी पीपल' या नाटकाचे वाचन झाले.

दि. १७ ऑगस्ट ६८ रोजी प्रा. कृ. अं. आचार्य यांनी लिहिलेल्या 'सम्राट रामगुप्त' नाटकाचे वाचन झाले.

दि. २० ऑगस्ट रोजी श्री. प्रभाकर सिरास यांनी अल्बर्ट कामू यांनी लिहिलेल्या 'जस्ट असेसिन' या नाटकाचे 'युद्धाचा प्रसंग' या नावाने केलेल्या रूपांतराचे वाचन झाले.

नाट्याचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त सोमवार दि. २५ ऑगस्ट ६८ रोजी नाट्यइतिहाससंशोधक श्री. के. टी. देशमुख यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

रविवार दि. २७ ऑक्टोबर ६८ रोजी दुपारी ३–३० वाजता श्री. द. ग. गोडसे यांच्या 'राजियाचा पुत्र अपराधी देखा' ह्या नाटकाचे आणि सायंकाळी ६–३० वाजता मुंबईचे श्री. माधव वाटवे यांनी लिहिलेल्या 'नाटककाराचे शोधात सहा पात्रे' ह्या नाटकाचे वाचन झाले.

मराठी रंगभूमीचा १२५ वा वर्धापन–दिन

मंगळवार दि. ५ नोव्हेंबर ६८ रोजी मराठी रंगभूमीच्या १२५ व्या वर्धापनदिनानिमित्त सकाळी ११ वाजता रंगभूमीचे उपासक श्री. के. टी. देशमुख यांनी धनवटे रंगमंदिराच्या रंगमंचाची शास्त्रोक्त पद्धतीने पूजा केली. या पूजेचे पौरोहित्य नागपुरातील वयोवृद्ध नट वे. शा. सं. श्री. दाते गुरुजी यांनी केले.

सायं. ६–३० वाजता 'मराठी रंगभूमी दिन' धनवटे रंगमंदिरात संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी गुजराथी रंगभूमीचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक व नट श्री. कांती माडिया व मराठी रंगभूमीच्या सुप्रसिद्ध दिग्दर्शिका व नटी सौ. सुधा करमरकर यांची भाषणे झाली.

दि. २३ जानेवारी ६९ रोजी कै. राम गणेश गडकरी यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांचे 'एकच प्यालयातील सुधा–सिंधु : एक नवे चिंतन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

त्याच दिवशी प्रा. पटवर्धन हे संघाचे सरचिटणीस श्री. गलगलीकर व चिटणीस श्री. वा. के. अत्रे यांचेसमवेत सावनेरला जाऊन कै. गडकऱ्यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले.

स्मृतिदिनानिमित्त, अभ्यास मंडळाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी समग्र गडकरी वाङ्मय प्रदर्शन आकर्षक रीतीने मांडले होते.

'कै. गडकरी स्वगत–स्पर्धा'

कै. रा. ग. गडकरी यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेतर्फे रविवार, दि. २ फेब्रुवारी १९६९ रोजी दुपारी ४ वाजता कै. रा. ग. गडकरी यांच्या नाटकातील स्वगत–स्पर्धा धनवटे रंगमंदिरात झाली.

या स्पर्धेत महाविद्यालयीन गटात श्री. मोहन फाटे व श्री. विकास भावे यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच विद्यालयीन गटातून कुमार हर्षवर्धन निमखेडकर आणि कुमार चंद्रशेखर साल्पेकर यांचा अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक आला.

महाविद्यालयीन व विद्यालयीन गटातील प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविण्याकरिता स्पर्धकांना अनुक्रमे रुपये २० व रु. १५ ची रोख बक्षिसे दि. ५ फेब्रुवारी '६९ रोजी श्री. बाबुराव चिमोटे यांच्या हस्ते देण्यात आली.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. रा. पु. सगदेव, डॉ. डब्ल्यू. दामले व प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांनी सहकार्य दिल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

श्री. खोलकुटे आंतरमहाविद्यालयीन ढाल नाट्यस्पर्धा

श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत यावर्षी सीताबाई आर्ट कॉलेज, अकोला (सुंदर मी होणार), सुवालाल पाटणी कला–वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव (येग येग विठाबाई), जनता कला–वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर (प्रेमा तुझा रंग कसा), धनवटे नॅशनल कॉलेज (दिल्या घरी तू सुखी रहा), मेडीकल कॉलेज (काका किशाचा), हिस्लॉप कालेज (काका किशाचा), विज्ञान महाविद्यालय (तीन चोक तेरा), गो. से. अर्थवाणिज्य महाविद्यालय, नागपूर, (काका किशाचा), शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय (काका किशाचा) या महाविद्यालयांनी भाग घेतला.

ह्या स्पर्धेत मेडिकल कॉलेजने सादर केलेल्या 'काका किशाचा' या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या महाविद्यालयाला 'श्री. खोलकुटे रौप्य ढाल' मिळाली.

या वेळी श्री. विकास भावे यांना 'दिल्या घरी तू सुखी रहा' या नाटकातील 'मामा'च्या पुरुष भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल रु. १५ चे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. स्त्री भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिक कु. विद्या केळकर यांना 'तीन चोक तेरा' या नाटकातील 'स्वरूपा व श्यामला'ची भूमिका केल्याबद्दल रु. १५ चे मिळाले.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा

ही एकांकिका स्पर्धा दि. १, २, ३, ४ व ५ फेब्रुवारी ६९ रोजी रात्री ८–३० वा. धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत एकूण १४ नाट्यसंस्थांनी भाग घेतला. दि. ५ फेब्रुवारी रोजी एकांकिका स्पर्धा संपताच श्री. बाबुराव चिमोटे यांचे हस्ते खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा व एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला.

पद्माकर डावरे स्पर्धेत पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लबने सादर केलेल्या 'खलित्यांची लढाई (दुसरी)' या एकांकिकेला सर्वप्रथम क्रमांकाचे रु. ५० चे पारितोषिक व फिरती रौप्य ढाल मिळाली.

या मराठी रंगभूमी प्रदर्शनाला अनेक प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, रसिक नागरिकांनी आणि अभ्यासूंनी भट दिली.

दि. २६ मे १९६८ रोजी संघाध्यक्ष श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांनी कै. राम गणेश गडकरी यांच्या जयंतीनिमित्त श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात आयोजित केलेल्या मराठी रंगभूमी प्रदर्शनात ठेवलेल्या कै. रा. ग. गडकरी यांच्या छायाचित्राला हार अर्पण केला.

नाटचवाचन

दि. २५ जुलै ६८ रोजी श्री. आनंद जोग आणि श्री. जयंत देवधर या दोघांनी अनुवादित केलेल्या 'अेनिमी ऑफ दी पीपल' या नाटकाचे वाचन झाले.

दि. १७ ऑगस्ट ६८ रोजी प्रा. कृ. अं. आचार्य यांनी लिहिलेल्या 'सम्राट रामगुप्त' नाटकाचे वाचन झाले.

दि. २० ऑगस्ट रोजी श्री. प्रभाकर सिरास यांनी अल्बर्ट कामू यांनी लिहिलेल्या 'जस्ट असेसिन' या नाटकाचे 'युद्धाचा प्रसंग' या नावाने केलेल्या रूपांतराचे वाचन झाले.

नाटचाचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त सोमवार दि. २५ ऑगस्ट ६८ रोजी नाटचइतिहाससंशोधक श्री. के. टी. देशमुख यांचे सुश्राव्य व्याख्यान झाले.

रविवार दि. २७ ऑक्टोबर ६८ रोजी दुपारी ३–३० वाजता श्री. द. ग. गोडसे यांच्या 'राजियाचा पुत्र अपराधी देखा' ह्या नाटकाचे आणि सायंकाळी ६–३० वाजता मुंबईचे श्री. माधव वाटवे यांनी लिहिलेल्या 'नाटककाराचे शोधात सहा पात्रे' ह्या नाटकाचे वाचन झाले.

मराठी रंगभूमीचा १२५ वा वर्धापन–दिन

मंगळवार दि. ५ नोव्हेंबर ६८ रोजी मराठी रंगभूमीच्या १२५ व्या वर्धापनदिनानिमित्त सकाळी ११ वाजता रंगभूमीचे उपासक श्री. के. टी. देशमुख यांनी धनवटे रंगमंदिराच्या रंगमंचाची शास्त्रोक्त पद्धतीने पूजा केली. या पूजेचे पौरोहित्य नागपुरातील वयोवृद्ध नट वे. शा. सं. श्री. दाते गुरुजी यांनी केले.

सायं. ६–३० वाजता 'मराठी रंगभूमी दिन' धनवटे रंगमंदिरात संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

याप्रसंगी गुजराथी रंगभूमीचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक व नट श्री. कांती माडिया व मराठी रंगभूमीच्या सुप्रसिद्ध दिग्दर्शिका व नटी सौ. सुधा करमरकर यांची भाषणे झाली.

दि. २३ जानेवारी ६९ रोजी कै. राम गणेश गडकरी यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांचे 'एकच प्यालयातील सुधा–सिंधु : एक नवे चिंतन' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

त्याच दिवशी प्रा. पटवर्धन हे संघाचे सरचिटणीस श्री. गलगलीकर व चिटणीस श्री. वा. के. अत्रे यांचेसमवेत सावनेरला जाऊन कै. गडकऱ्यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले.

स्मृतिदिनानिमित्त, अभ्यास मंडळाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी समग्र गडकरी वाङमय प्रदर्शन आकर्षक रीतीने मांडले होते.

'कै. गडकरी स्वगत–स्पर्धा'

कै. रा. ग. गडकरी यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त संस्थेतर्फे रविवार, दि. २ फेब्रुवारी १९६९ रोजी दुपारी ४ वाजता कै. रा. ग. गडकरी यांच्या नाटकातील स्वगत–स्पर्धा धनवटे रंगमंदिरात झाली.

या स्पर्धेत महाविद्यालयीन गटात श्री. मोहन फाटे व श्री. विकास भावे यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. तसेच विद्यालयीन गटातून कुमार हर्षवर्धन निमखेडकर आणि कुमार चंद्रशेखर साल्पेकर यांचा अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक आला.

महाविद्यालयीन व विद्यालयीन गटातील प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविण्याकरिता स्पर्धकांना अनुक्रमे रुपये २० व रु. १५ ची रोख बक्षिसे दि. ५ फेब्रुवारी '६९ रोजी श्री. बाबुराव चिमोटे यांच्या हस्ते देण्यात आली.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. रा. पु. सगदेव, डॉ. डब्ल्यू. दामले व प्रा. डॉ. सुनील सुभेदार यांनी सहकार्य दिल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

श्री. खोलकुटे आंतरमहाविद्यालयीन ढाल नाट्यस्पर्धा

श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धेत यावर्षी सीताबाई आर्ट कॉलेज, अकोला (सुंदर मी होणार), सुवालाल पाटणी कला–वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव (येग येग विठाबाई), जनता कला–वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर (प्रेमा तुझा रंग कसा), धनवटे नॅशनल कॉलेज (दिल्या घरी तू सुखी रहा), मेडीकल कॉलेज (काका किशाचा), हिस्लॉप कालेज (काका किशाचा), विज्ञान महाविद्यालय (तीन चोक तेरा), गो. से. अर्थवाणिज्य महाविद्यालय, नागपूर, (काका किशाचा), शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय (काका किशाचा) या महाविद्यालयांनी भाग घेतला.

ह्या स्पर्धेत मेडिकल कॉलेजने सादर केलेल्या 'काका किशाचा' या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या महाविद्यालयाला 'श्री. खोलकुटे रौप्य ढाल' मिळाली.

या वेळी श्री. विकास भावे यांना 'दिल्या घरी तू सुखी रहा' या नाटकातील 'मामा'च्या पुरुष भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाबद्दल रु. १५ चे वैयक्तिक पारितोषिक मिळाले. स्त्री भूमिकेचे सर्वोत्कृष्ट अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिक कु. विद्या केळकर यांना 'तीन चोक तेरा' या नाटकातील 'स्वरूपा व श्यामला'ची भूमिका केल्याबद्दल रु. १५ चे मिळाले.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा

ही एकांकिका स्पर्धा दि. १, २, ३, ४ व ५ फेब्रुवारी ६९ रोजी रात्रौ ८–३० वा. धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत एकूण १४ नाट्यसंस्थांनी भाग घेतला. दि. ५ फेब्रुवारी रोजी एकांकिका स्पर्धा संपताच श्री. बाबुराव चिमोटे यांचे हस्ते खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा व एकांकिका स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला.

पद्माकर डावरे स्पर्धेत पोस्टल ऑडिट रिक्रिएशन क्लबने सादर केलेल्या 'खलित्यांची लढाई (दुसरी)' या एकांकिकेला सर्वप्रथम क्रमांकाचे रु. ५० चे पारितोषिक व फिरती रौप्य ढाल मिळाली.

धनवटे नॅशनल कॉलेजने सादर केलेल्या 'प्रयोग' या एकांकिकेला व रंजन कला मंदिराने सादर केलेल्या 'विचारे आप्पा बंड करतात' या एकांकिकेला द्वितीय पारितोषिकाची रु. ३० ची रक्कम दोन चमूत विभागून देण्यात आली.

वैयक्तिक अभिनयाचे रु. १५ चे पारितोषिक 'खलित्यांची लढाई'मध्ये श्री. गुणाकर घाटपांडेची भूमिका करणारे श्री. बळवंत वाघमारे यांना मिळाले.

द्वितीय क्रमांकाचे रु. १० चे पारितोषिक 'प्रयोग' एकांकिकेत डॉक्टरची भूमिका करणारे श्री. अनिल पेंडसे यांना मिळाले.

तृतीय क्रमांकाचे रु. ५ चे पारितोषिक 'विचारे आप्पा बंड करतात' या एकांकिकेत यमुनाची भूमिका करणाऱ्या सौ. शरयू टिपणीस यांना मिळाले.

या दोन्ही स्पर्धांचे परीक्षक म्हणून सर्वश्री वा. के अत्रे, मधुकरराव राजे, अ. गो. देशपांडे, आनंद जोग, प्रा. वा. वि. कुळकर्णी, वा. गो. चोरघडे व सौ. नलिनी दिवाडकर यांनी सहकार्य दिले.

वर्धापन–दिन

दि. १४ जानेवारी '६९ रोजी वि. सा. संघाचा वर्धापन दिन अतिशय थाटाने साजरा झाला.

वर्धापनदिनाचे प्रमुख अतिथी म्हणून मुंबईचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा. वि. ह. कुळकर्णी यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांचे अत्यंत सुश्राव्य भाषण झाले.

रात्रौ, मुंबईचे श्री. रंगनाथ कुळकर्णी यांचा 'एका गाढवाची कहाणी' हा एकपात्री कार्यक्रम सादर करण्यात आला.

दि. १५ जानेवारी रोजी परिसंवाद आयोजित करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. सुनील सुभेदार (समीक्षा), प्रा. म. ना. लोही (निबंध), प्रा. ना. कृ. शनवारे (कथा–कादंबरी), श्री. पु. व्यं. दारव्हेकर (नाटक), व प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे (काव्य) यांनी वाङ्मयीन पैलूंवर भाषणे केली. यावेळी अध्यक्षस्थान प्रा. वि. ह. कुळकर्णी यांनी मंडित केले होते.

रात्रौ ८–३० वाजता 'वैदर्भीय काव्यदर्शन' हा अभिनव कार्यक्रम सादर करण्यात आला. विदर्भातील दिवंगत व काही प्रतिथयश कवींच्या कविता गाऊन दाखविण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे संगीत नियोजन श्री. यशवंत देव, श्री. शरद सुतवणे, श्री. मधुकर गुळवणी, श्री. वसंत मांडे, मधुसूदन भावे, श्री. विजय जोशी, श्री. प्रभाकर गडकरी, श्री. वसंत अंधारे श्री. वसंत सहस्रबुद्धे व श्री. मधुकर ताम्हणकर यांनी केले.

या काव्यदर्शनात सौ. उषा पारखी, सौ. कुसुम चाफळे, सौ. उषा वडोदकर, सौ. देव, कु. मीना सातोकर, कु. प्रमोदिनी गडकरी, कु. शोभा कोठेकर व सर्वश्री शरद सुतवणे, मधु ताम्हणकर, वसंत मांडे, गोपाळ कौशिक, चन्द्रहास जोशी, त्रिंबक काळे, वसंत सहस्रबुद्धे, प्रभाकर गडकरी, राजाभाऊ कानगो व विजय जोशी यांनी सहकार्य दिले.

वाद्यवृंदात सर्वश्री शंकरराव पोपटकर, भैयाजी वडसमुद्रकर, दत्ता देशमुख, राजाभाऊ कानगो, प्रभाकर पिल्ले, प्रभाकर घोटकर, प्रभाकर गडकरी, वायवार, चंद्रहास, बाळ पुरोहित, प्रभाकर धारे, सतीश प्रधान, पुरुषोत्तम सामक, अरुण कोलते व श्री. पारखी यांनी भाग घेतला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईचे ख्यातनाम भावगीत गायक व एच्. एम्. व्ही. ह्या ग्रामोफोन रेकॉर्ड कंपनीचे संचालक श्री. जी. एन्. जोशी यांना पाचारण करण्यात आले होते.

यावेळी त्यांनी कार्यक्रमाचे आयोजन पाहून आनंद व्यक्त केला.

या कार्यक्रमासाठी तयार करण्यात आलेले निवेदन प्राचार्य डॉ. मा. गो. देशमुख यांनी लिहून दिले.

शोकसभा

म. म. साहित्याचार्य वाळशास्त्री हरदास यांच्या दुःखद निधनानिमित्त दि. १३ ऑगस्ट रोजी धनवटे रंगमंदिरात संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली.

यावेळी डॉ. श्री. भा. वर्णेकर, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, श्री. दि. व. पंडित, हृषिकेशजी शर्मा, डॉ. मा. गो. देशमुख व पुण्याचे श्री. रामभाऊ दाते आणि श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली.

संगीत केंद्रातर्फे रविवार दि. २७ आक्टोवर ६८ रोजी सुप्रसिद्ध गायक आणि अनेक श्रेष्ठ गायक-गायिकांचे गुरू कै. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्या दुःखद निधनानिमित्त प्रसिद्ध गायक व संगीत शिक्षक श्री. शंकरराव सुपारे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी सर्वश्री प्रभाकर चाफेकर, मधुसूदन भावे, राजेश्वर वोवडे, सौ. उषा पारखी, श्री. मधुकरराव गुळवणी, श्री. माधवराव डोंगरे व श्री. जयंतराव वाटवे यांनीही श्रद्धांजली अर्पण केली.

कै. न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा

वि. सा. संघ व वक्तृत्वोत्तेजक सभा (पुणे) या संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा दि. १३ व १४ सप्टेंवर '६८ रोजी धनवटे रंगमंदिरात आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत एकूण १९ महाविद्यालयांनी भाग घेतला व एकूण ३८ स्पर्धक होते. वादस्पर्धेचा विषयः—'भारताच्या सद्यःपरिस्थितीस अध्यक्षीय शासनपद्धती इष्ट आहे' हा ठेवण्यात आला होता. यावर्षी स्पर्धेची फिरती रौप्य ढाल वर्धा येथील जानकीदेवी वजाज महाविद्यालयाला मिळाली. विजेत्या स्पर्धकांना ॲड. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. रुपये १०० चे वैयक्तिक प्रथम पारितोषिक जानकीदेवी वजाज महाविद्यालयाच्या कु. माधुरी वापट हिने पटकाविले. तर रु. ७५ चे दुसरे पारितोषिक अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील कु. नीलिमा तेलंग हिला मिळाले.

कु. वापट, कु. तेलंग यांच्या खेरीज विश्वेश्वरय्या रिज. इंजिनियरिंग कॉलेजच्या श्री. मोहन फाटे यांना ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळाल्यावद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. परीक्षक म्हणून श्री. वि. रा. काटे, श्री. रा. पु. सगदेव आणि ॲड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी सहकार्य दिले.

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती (पुणे)

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती (पुणे) यांचे वतीने वि. सा. संघाच्या स्वाधीन केलेल्या निधीच्या रकमेवरील व्याजातून महाराष्ट्रातील विद्यापीठांतून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविण्याच्या विद्यार्थ्याला पारितोषिक देण्यात येते.

इ. स. १९६८-६९ मध्ये पुढीलप्रमाणे श्री. वि. सा. खांडेकर पारितोषिके देण्यात आली.

(१) श्री. नारायण वोंडकूजी इंगोले (गडचिरोली) नागपूर विद्यापीठ नागपूर.

(२) कु. कुंदा वामन गोडवोले (मुंवई) मुंवई विद्यापीठ, मुंवई.

(३) कु. मंगला नरहरराव पोहनेकर (औरंगावाद) मराठवाडा विद्यापीठ, औरंगावाद.

(४) कु. विजया माधवराव बापट (ठाणे) पुणे विद्यापीठ, पुणे.

(५) कु. सुमन वासुदेव बेलवलकर (सांगली) श्रीशिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

परीक्षा समितीतर्फे—

यावर्षी मराठी प्रवेश ते साहित्य स्नातक या परीक्षा घेण्यात आल्या.

दोन्ही सत्रांमध्ये एकूण २४२१ विद्यार्थी परीक्षेस बसले.

ऑक्टोबर '६८ सत्र — १२३३ विद्यार्थी ३३ केंद्रे

फेब्रुवारी '६९ सत्र — ११८८ विद्यार्थी ३० केंद्रे

पुस्तक देणगी

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाच्या अभ्यासमंडळाला श्री. अनंत नारायण देशपांडे यांनी आपल्या ग्रंथभांडारातून निवडक टीका ग्रंथ देणगीदाखल दिले व प्रा. भ. श्री. पंडित यांनी आपल्या खाजगी ग्रंथालयातील काही बहुमोल ग्रंथ ग्रंथालयास देणगीदाखल दिल्यावद्दल वि. सा. संघ या दोघांचाही अत्यंत आभारी आहे.

सत्कार

आचार्य प्र. के. अत्रे यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त वि. सा. संघाचे चिटणीस श्री. वा. के. अत्रे यांनी मुंबई येथे वि. सा. संघातर्फे आचार्य अत्रे यांना पुष्पमाला व गुच्छ अर्पण करून दीर्घायुरारोग्य चिंतिले. या प्रसंगी संस्थेचे माजी चिटणीस श्री. म. ल. देशमुख उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांच्या ६१व्या वाढदिवसानिमित्त रविवार दि. ८ सप्टेंबर ६८ रोजी सायं. ६–३० वाजता सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी प्रा. डॉ. सुनील सुभेदार, श्री. त्रि. गो. देशमुख, प्रा. म. ना. लोही, प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे आणि संघाध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची भाषणे झाली.

उत्तरादाखल डॉ. वि. भि. कोलते यांचे भाषण झाले.

नाटच-इतिहास-संशोधक श्री. के. टी. देशमुख यांनी (मुंबई) दि. ३० सप्टेंबर रोजी ५२ व्या वर्षात पदार्पण केल्यामुळे त्यांचे संस्थेतर्फे सकाळी १० वाजता पुष्पहार घालून अभीष्टचिंतन करण्यात आले. यावेळी श्री. भाऊ समर्थ, श्री. मधुकर गुळवणी यांची भाषणे झाली.

दि. २६–९–६९ रोजी चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांना शाल व श्रीफळ देऊन वि. सा. संघाच्या स्वरमंडळाने सत्कार केला. त्यांनी स्वरमंडळातर्फे झालेल्या स्मृति–उत्सवाच्या स्मरणिकेला आपले अत्याधुनिक चित्र देऊन तिला चिरंतनकाळ टिकणारे महत्त्व प्राप्त करून दिले.

शाखा वृत्त

कारंजा शाखा

कारंजा शाखेच्या वतीने शनिवार दि. १३ एप्रिल ६८ रोजी किराना घराण्याचे सुप्रसिद्ध गायक श्री. पंडित जयप्रकाश (मुंबई) यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम मुळजी जेठा हायस्कूल-मध्ये झाला.

वि. सा. संघ–कारंजा शाखा कार्यकारिणीची सभा गुरुवार दि. १८ जुलै ६८ रोजी रात्री ८ वाजता विवेकानंद हिंदी विद्यालयाच्या सभागृहात भरली. यावेळी ६८–६९ करिता खालील-प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली.

अध्यक्ष–डॉ. हेमचंद्र वैद्य, उपाध्यक्ष—सौ. कमल द. खजूरकर, कोषाध्यक्ष—प्रा. क. गो. पितांबरवाले, चिटणीस—प्रा. वा. सा. वारगळ, सहचिटणीस प्रा. अं. रं. असोलकर—अध्यक्ष प्रतिनिधी—श्री. वि. वि. ठाकूर, कारंजा शाखेच्या कार्यकारिणीवर केंद्रीय अध्यक्षांच्या वतीने श्री. बाळकृष्ण मुंदडा यांची नियुक्ती करण्यात आली.

—दि. २४ जानेवारी ६९ रोजी कै. राम गणेश गडकरी यांच्या ५० व्या पुण्यतिथी-निमित्त कंकुबाई कन्या शाळेत आंतर शालेय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी मुळजी जेठा हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. वामनराव मोकासदार हे होते.

दि. २५ जानेवारी रोजी धनवटे नॅशनल कॉलेजातील मराठीचे प्राध्यापक श्री. म. ना. लोही यांचे 'गडकरी व्यक्ति आणि वाङमय' या विषयावर सुश्राव्य भाषण झाल्यानंतर प्रा. लोही यांच्या हस्ते वक्तृत्वस्पर्धेचा बक्षीस समारंभ झाला.

वर्धा शाखा

वर्धा शाखा सभासदांची सर्वसाधारण सभा श्री. व. पं. तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ११ ऑगस्ट ६८ रोजी होऊन १९६८–६९ करिता खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष—प्रा. दे. गं. सोटे, उपाध्यक्ष—प्रा. कावळे, श्री. व. पं. तांदळे, कार्यवाह—श्री. प्र. वा. मंगरुळकर, सहकार्यवाह—श्री. पुरुषोत्तम चवडे, श्री. लक्ष्मणराव चुटके, सदस्य—प्रा. वर्णेकर, प्रा, जगताप, कु. माधुरी घारपुरे, सौ. रजनी गर्गे, श्री. भय्याजी देशमुख, श्री. प्रभाकर-राव वाळसराफ, प्रचार मंत्री—श्री. उमाशंकर शुक्ल. वर्धा शाखेच्या सभासदांच्या दि. १८–१०–६८ रोजी झालेल्या सभेत श्री. मंगरुळकर, कार्यवाह यांनी श्री. व्रिजलाल बियाणी, श्री. बाबासाहेब खापड व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी प्रा. दे. गं. साटे व श्री. देशमुख यांची भाषणे झाली.

यवतमाळ

यवतमाळ शाखा सभासदांची सभा १९ ऑगस्ट ६८ रोजी होऊन इ. स. ६८–६९ करिता खालील पदाधिकारी निवडण्यात आले.

अध्यक्ष—श्री. व. ना. एकबोटे, उपाध्यक्ष—सौ. श्रीखंडे, कार्यवाह—प्रा. दि व्यं. जहागीर-दार, सहकार्यवाह—प्रा. रमाकांत कोलते, सदस्य—डॉ. पंडित, सौ. पंडित, ॲड. श्री. बर्वे, सौ. बर्वे, प्रा. देशपांडे, प्रा. ब्रम्हे, प्रा. बक्षी, प्रा. शरच्चंद्र टोंगो, श्री. द. वा. महाजन, श्री. सदुभाऊ पांडे, सौ. गोळे.

वणी शाखा

(१) दि. १३ ऑगस्ट ६८ रोजी म. म बाळाशास्त्री हरदास यांच्या दु:खद निधनानिमित्त त्यांच्या स्मृतीला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभा घेण्यात आली.

(२) दि. १४ सप्टेंबर रोजी नागपूर येथील थोर विचारवंत श्री. मा. ज. कानेटकर यांचे 'साहित्य आणि चारित्र्य' या विषयावर व्याख्यान झाले.

(३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्वास्थ्याकरिता दि. १५ सप्टेंबर रोजी पू. पंडित महाराज यांच्या अध्यक्षतेखाली सामुदायिक प्रार्थना करण्यात आली.

अनुक्रमणिका

(४) दि. २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर पर्यंत पाच दिवस 'साहित्य आणि विनोद' या विषयावर प्राचार्य रामशेवाळकर यांची व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली.

(५) मराठी प्राध्यापक परिषदेच्या निमित्ताने वणीत एकत्रित आलेल्या सर्व मराठी प्राध्यापकांचा दि. १४ ऑक्टोबर '६८ रोजी सुप्रसिद्ध समीक्षक प्रा. वा. ल. कुळकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली भव्य सत्कार करण्यात आला.

(६) दि. १० नोव्हेंबर रोजी बगिच्यात कार्यकारिणीचे सहभोजन, 'अक्षर माधव' प्रकाशनाच्या रूपाने कै. लोकनायक अणे यांचे वाङमयीन स्मारक करण्याचा निर्णय येथेच घेण्यात आला.

(७) श्रीज्ञानदेव पुण्यतिथीनिमित्त दि. १९ रोजी प्रा. म. ना. सरपटवार, अमरावती यांचे व्याख्यान झाले.

(८) दि. १२ जानेवारी '६९ रोजी श्री. रंगनाथ कुळकर्णी, मुंबई यांच्या 'वने, वने, हा पहा आमचा संसार'च्या नाट्यपूर्ण वाचनाची मैफल चांगलीच रंगली.

(९) दि. जानेवारी '६९ रोजी स्व. लोकनायक अणे यांचा प्रथम वार्षिक श्राद्धदिन आणि त्याच दिवशी येणारा वि. सा. संघाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी 'स्वदेश'कार श्री. ब. ना. एकवोटे व स्व. बापूजींचे एकनिष्ठ शिष्य श्री. शंकरराव आगाशे यांची भाषणे झाली.

(१०) कै. राम गणेश गडकरी यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिनानिमित्त दि. २४ जानेवारी रोजी प्रा. भ. श्री. पंडित यांचे व्याख्यान झाले.

(११) दि. २९ जानेवारी ६९ रोजी कविवर्य सोपानदेव चौधरी, नाशिक यांच्या हस्ते 'पदाती' या श्री. ना. मा. सरपटदार यांच्या वणी शाखेने प्रकाशित केलेल्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले.

जळगाव-जामोद

दि. १० फेब्रुवारी '६९ रोजी जळगाव (जामोद) येथे वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या हस्ते वि. सा. संघाची शाखा सुरू करण्यात आली. याप्रसंगी वि. सा. संघाचे चिटणीसद्वय श्री. अ ल. लिमये आणि श्री. वा. के. अत्रे उपस्थित होते.

वि. सा. संघाला अनुदान

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे अनुदान प्राप्त झाले.

(अ) वार्षिक अनुदान	रु. ७५०० /–
(ब) नाट्यसमिती	रु. २००० /–
(क) 'युगवाणी' मासिकाकरिता	रु. ५००० /–

वि. सा. संघ शासनाचा अत्यंत आभारी आहे.

इ. स. १९६८–६९ मध्ये ज्या ज्या व्यक्तींनी सहकार्य दिले त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आपले

ग. त्र्यं. माडखोलकर
अध्यक्ष

(डॉ.) मा. गो. देशमुख
(प्रा.) राम शेवाळकर
उपाध्यक्ष

अ. ल. लिमये
वा. के. अत्रे
शांताराम पोटदुखे
चिटणीस

मा. नी. गलगलीकर
सरचिटणीस

म. गो. भांबूरकर
कोषाध्यक्ष

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका